वाटे तो सत्वगुण ॥ ८३ ॥ परभूषणें भूषण । परदूषणें दूषण । परदुःखें सिणे जाण । तो सत्वगुण ॥ ८४ ॥ आतां असो हें बहुत । देवीं धर्मीं ज्याचें चित्त । भजे कामनारहित । तो सत्वगुण ॥ ८५ ॥ ऐसा हा सत्वगुण सात्विक । संसारसागरीं तारक । येणें उपजे विवेक । ज्ञानमार्गाचा ॥ ८६ ॥ सत्वगुणें भगवद्भक्ती । सत्वगुणें ज्ञानप्राप्ती । सत्वगुणें सायोज्यमुक्ती । पाविजेते ॥ ८७ ॥ ऐसी सत्वगुणाची स्थिति । स्वल्प बोलिलें यथामती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ८८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सत्वगुणनाम समास सातवा ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका सद्विद्येचीं लक्षणें । परम शुद्ध सुलक्षणें । विचार घेतां बळेंचि बाणे । सद्विद्या आंगीं ॥ १ ॥ सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तमलक्षीं विशेष । त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ॥ २ ॥ भाविक सात्विक प्रेमळ । शांति क्षमा दयासीळ । लीन तत्पर केवळ । अमृतवचनी ॥ ३ ॥ परम सुंदर आणी चतुर । परम सबळ आणी धीर । परम संपन्न आणी उदार । अतिशयेंसीं ॥ ४ ॥ परम ज्ञाता आणी भक्त । महापंडित आणी विरक्त । महातपस्वी आणी शांत । अतिशयेंसीं ॥ ५ ॥ वक्ता आणी नैराश्यता । सर्वज्ञ आणी सादरता । श्रेष्ठ आणी नम्रता । सर्वत्रांसीं ॥ ६ ॥ राजा आणी धार्मिक । शूर आणी विवेक । तारुण्य आणी नेमक ।

करितो तो सत्त्वगुण होय (७९–८५). असा हा सत्त्वगुण संसारीं तारक आहे, ज्ञानविवेक ह्यानें स्फुरतो, भक्तिसुख ह्यानें मिळतें, सायुज्यमोक्ष अखेर हाच देतो (८६–८८). [द० २, स० ७].

मागें कुविद्येचीं लक्षणें सांगितलीं, आतां येथें सद्विद्येचीं लक्षणें सांगतों. हीं लक्षणें अत्यंत शुद्ध असून यांचा विचार करितां-करितांच हीं अंगांत बाणतात. सद्विद्येच्या मनुष्याच्या अंगीं हीं लक्षणें असतात ह्यामुळें त्याचे गुण ऐकतांना परम समाधान होतें. मागें सांगितलेले दया, क्षमा, लीनता, मधुर भाषण, सद्भाव, मृदुवचन इत्यादि सद्गुण त्याच्या अंगांत असतात (१–३). सद्विद्येचा पुरुष सुंदर असून चतुर, बळवंत असून धीर, संपन्न असून उदार, ज्ञाता असून भक्त, पंडित असून विरक्त, तपस्वी असून शांत, वक्ता असून आशारहित, सर्वज्ञ असून श्रवणतत्पर, श्रेष्ठ असून नम्र, सत्ताधारी असून धार्मिक, शूर असून विवेकी, तरुण असून नित्यनेमी असा असतो. (येथेंही 'आणि' ह्याचा अर्थ 'असून' असा केल्यानें विशेष सौंदर्य प्रगट होतें. थोडें स्पष्टीकरण करूं. जगांत बहुधा ज्ञान आणि भक्ति यांचें साहचर्य क्वचित् दिसतें. ज्ञाता असेल तर भक्त नसतो—तो भक्तीला एकप्रकारचें खूळ समजतो व भक्त हा ज्ञान आणि ज्ञानाहंकार एकच समजून ज्ञानाची हेळणा करितो; पण सद्विद्येचा पुरुष ज्ञान आणि भक्ति यांचें वर्म समजत असल्यामुळें तो 'ज्ञाता' असतो व 'भक्त'ही असतो, त्याच्या ठिकाणीं ज्ञान आणि भक्ति एकरूपतेनें नांदतात. हें वर्म 'ज्ञाता आणि भक्त' या पदांत आहे. असाच प्रकार 'तपस्वी आणि शांत' या पदांचा आहे. तपस्वी बहुधा रागीट असतो व जगाच्या ठोकरा खाऊन चेचड बनलेला पुरुष बाह्यतः तरी शांत असतो पण तपस्वी नसतो. म्हणून 'तपस्वी असून शांत' या पदांत दुहेरी सौंदर्य आहे. आणखी एक उदाहरण पाहूं : 'पंडित आणि विरक्त' किंवा 'वक्ता आणि आशारहित'. पंडित आणि वक्ता हे बहुधा धनमानाचे लोभी असतात, व विरक्त आणि आशारहित पुरुष हे पंडित आणि वक्ते असतातच असा नियम नाहीं; म्हणून पांडित्य आणि वैराग्य किंवा वक्तृत्व आणि

आतिशयेंसीं ॥ ७ ॥ वृद्धाचारी कुळाचारी । युक्ताहारी निर्विकारी । धन्वंतरी परोपकारी । पद्महस्ती ॥ ८ ॥ कार्यकर्ता निराभिमानी । गायक आणी वैष्णवजनी । वैभव आणी भगवद्भजनी । अत्यादरें ॥ ९ ॥ तत्वज्ञ आणी उदासीन । बहुश्रुत आणी सज्जन । मंत्री आणी सगुण । नीतिवंत ॥ १० ॥ साधु पवित्र पुण्यसीळ । अंतरशुद्ध धर्मात्मा कृपाळ । कर्मनिष्ठ स्वधर्में निर्मळ । निर्लोभ अनुतापी ॥ ११ ॥ गोडी आवडी परमार्थप्रीती । सन्मार्ग सत्क्रिया धारणा धृती । श्रुति स्मृती लीळा युक्ति । स्तुती मती परीक्षा ॥ १२ ॥ दक्ष धूर्त योग्य तार्किक । सत्य साहित्य नेमक भेदक । कुशळ चपळ चमत्कारिक । नाना प्रकारीं ॥ १३ ॥ आदर सन्मान तार्तम्य जाणे । प्रयोग समयो प्रसंग जाणे । कार्याकारण चिन्हें जाणे । विचक्षण बोलिका ॥ १४ ॥ सावध साक्षेपी साधक । आगमनिगमशोधक । ज्ञानविज्ञानबोधक । निश्चयकर्ते ॥ १५ ॥ पुरश्चरणी तीर्थवासी । दृढव्रती कायाक्लेसी । उपासक निग्रहासी । करूं जाणे ॥ १६ ॥ सत्यवचनी शुभवचनी । कोमळवचनी येकवचनी । निश्चयवचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ॥ १७ ॥ वासनातृप्त सखोल योगी । भव्य सुप्रसन्न वीतरागी । सौम्य सात्विक शुद्धमार्गी । निःकपट निर्वेसनी ॥१८॥ सुगड संगीत गुणग्राही । अनापेक्षी लोकसंग्रही । आर्जव सख्य सर्वेही । प्राणीमात्रांसी ॥ १९ ॥ द्रव्यसुची दारासुची । न्यायसुची अंतरसुची । प्रवृत्तिसुची निवृत्तिसुची । सर्वसुची निःसंगपणें ॥ २० ॥ मित्रपणें परहितकारी । वाग्माधुर्य परशोकहारी । सामर्थ्यपणें वेत्रधारी । पुरुषार्थें जगमित्र ॥ २१ ॥ संशयछेदक विशाळ वक्ता । सकळ क्लृप्त असोनि श्रोता । कथानिरूपणीं शब्दार्था । जाऊंच

नैराश्य या उभय गुणांचें एकीकरण अत्यंत गौरवास्पद होय. बाकीचीं पदें हीं ह्याच तऱ्हेनें लावावीत.) (४–७). सद्विद्येचा पुरुष हा वृद्धाचार व कुळाचार पाळतो, हा उत्तम धन्वंतरी असून वैद्यकज्ञानाचा उपयोग परोपकारार्थ करतो म्हणून तो यशस्वी (पद्महस्ती) होतो (८). असा पुरुष कार्यकर्ता असून निरभिमानी असतो. गायक व संपन्न असून भक्त असतो. तत्त्वज्ञ असून नीतिमंत असतो (९–१०). तो पुण्यशील, अंतरशुद्ध, स्वधर्मकर्मनिरत, धारणा-धृतिवंत, श्रुतिस्मृतींचा भोक्ता व लोकस्तुतीचा व लोकांच्या बुद्धीचा परीक्षक असतो. तो दक्ष, धूर्त, चिकित्सक, मर्मज्ञ (भेदक) व कलाकौशल्यांत कुशल असा असतो (११–१३). दुसऱ्याचा आदरसन्मान राखावा, समय प्रसंग जाणावा, कार्याकारण समजावें हें सर्व तो जाणत असून त्याचें भाषणचातुर्य विलक्षण असतें. तो स्वतः सावध व साक्षेपी असतो. वेदशास्त्रशोधक व ज्ञानविज्ञानबोधक असतो. सत्त्वगुणाचे इतर गुणही त्याच्या अंगांत असतात (१४–१८). तो चातुर्यानें कार्य करणारा (सुघड), निरपेक्ष, सर्वांशीं सख्यत्वानें वागणारा असा लोकसंग्रही असतो (१९). द्रव्य, दारा, न्याय, प्रपंच, परमार्थ ह्या सर्वांत तो वागत असतांना निःसंग आणि निर्मळ असतो (२०). तो मित्र म्हणून परहित करतो, मधुर वाणीनें दुसऱ्याचा शोक हरण करतो व सामर्थ्य असून लोकांचा सेवक (वेत्रधारी, काठी धारण करणारा) असा असून आपल्या पराक्रमानें (पुरुषार्थें) सर्व जगाला आपल्या भजनीं लावतो (२१). सर्वांचे संशय दूर करणारा तो अगाध वक्ता असतो, सर्व जाणत असून सर्वांचें ऐकून घेतो व कथाकीर्तनप्रसंगीं शब्दाचा पदपदार्थही सोडीत नाहीं (२२). तो सुखसंवाद

नेदी ॥ २२ ॥ वेवादरहित संवादी । संगरहित निरोपाधी । दुराशारहित अक्रोधी । निर्दोष निर्मत्सरी ॥ २३ ॥ विमळज्ञानी निश्चयात्मक । समाधानी आणी भजक । सिद्ध असोनी साधक । साधन रक्षी ॥ २४ ॥ सुखरूप संतोषरूप । आनंदरूप हास्यरूप । ऐक्यरूप आत्मरूप । सर्वत्रांसी ॥ २५ ॥ भाग्यवंत जयवंत । रूपवंत गुणवंत । आचारवंत क्रियावंत । विचारवंत स्थिती ॥ २६ ॥ यशवंत कीर्तिवंत । शक्तिवंत सामर्थ्यवंत । वीर्यवंत वरदवंत । सत्यवंत सुकृती ॥ २७ ॥ विद्यावंत कळावंत । लक्ष्मीवंत लक्षणवंत । कुळवंत सुचिष्मंत । बळवंत दयाळु ॥ २८ ॥ युक्तिवंत गुणवंत वरिष्ठ । बुद्धिवंत बहुधारिष्ट । दीक्षावंत सदा संतुष्ट । निस्पृह वीतरागी ॥ २९ ॥ असो ऐसे उत्तम गुण । हें सद्विद्येचें लक्षण । अभ्यासाया निरूपण । अल्पमात्र बोलिलें ॥ ३० ॥ रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहज गुणास न चले उपाये । कांहीं तरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ॥ ३१ ॥ ऐसी हे सद्विद्या बरवी । सर्वत्रांपासी असावी । परी विरक्त पुरुषें अभ्यासावी । अगत्यरूप ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सद्विद्यानिरूपणनाम समास आठवा ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ ऐका विरक्तांचीं लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें । जेणें आंगीं सामर्थ्य बाणे । योगियाचें ॥ १ ॥ जेणें सदकीर्ति वाढे । जेणें सार्थकता घडे । जेणें करितां महिमा चढे । विरक्तांसी ॥ २ ॥ जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे । जेणें विरक्ती दुणावे । विवेकेंसहित ॥ ३ ॥ जेणें सुख उचंबळे । जेणें सद्विद्या वोळे । जेणें भाग्यश्री प्रबळे । मोक्षेंसहित ॥ ४ ॥ मनोरथ

करतो पण वादाचें बंड उभारूं देत नाहीं. तो स्वतः संगरहित व साधा असतो. त्याला आशा नसते, क्रोध नसतो, मत्सर नसतो इतका तो स्वतः निर्दोष असतो (२३). त्याचें ज्ञान शुद्ध असून निश्चयाचें असतें, तो स्वतः आत्मसमाधान पावलेला असून देवाचें भजन करून साधनमार्गाचें रक्षण करतो (२४). सुख, संतोष, आनंद, हास्य, ऐक्य, भाग्य, जय, आचार-विचार, यश, कीर्ति, विद्या, कळा, लक्ष्मी, युक्ति, बुद्धि, दीक्षा म्ह० संप्रदाय इत्यादि गुणांनीं तो युक्त असतो. असे हे उत्तम गुण ज्यापाशीं आहेत तो सद्विद्येचा पुरुष आहे असें समजावें. ह्या गुणांचा श्रोत्यांनीं अभ्यास करावा म्हणून हें संक्षिप्त निरूपण केलें आहे. सौंदर्य अभ्यास करून येत नाहीं, सहज गुणांना कांहीं उपाय चालत नाहीं, म्हणून कांहींतरी आगंतुक गुण अभ्यास करून अंगीं आणावेत. हे सद्विद्येचे गुण सर्वांपाशीं असलेले चांगले ; तथापि विरक्त म्ह० निस्पृह लोककार्यकर्त्या पुरुषांनीं ह्या गुणांचा अभ्यास करून हे अगत्य अंगीं आणिले पाहिजेत. आतां अशा विरक्तांचीं लक्षणें काय आहेत तें पुढल्या समासांत पाहूं (२५–३२). [द. २, स. ८]

(सद्विद्येचा अभ्यास विरक्त पुरुषानें अवश्य केला पाहिजे असें मागील समासांत सांगितलें आहे. आतां विरक्ताचीं लक्षणें ह्या समासांत सांगतात. विरक्त म्ह. संसारपाशांतून सुटलेला व निःस्पृहपणानें लोककार्य करणारा पुरुष). आतां विरक्ताच्या अंगीं कोणते गुण असावेत म्हणजे त्याचे अंगीं योगसामर्थ्य बाणेल, त्याचा महिमा वाढेल, त्याचा परमार्थ सफळ होईल, त्याचा आनंद व वैराग्य वाढेल, त्याची मोक्ष आणि भाग्यश्री प्रबळ होईल, त्याचे सकळ मनोरथ पूर्ण होतील व त्याच्या

पूर्ण होती । सकळ कामना पुरती । मुखीं राहे सरस्वती । मधुर शब्दें बोलावया ॥ ५ ॥ हे लक्षणें श्रवण कीजे । आणी सदृढ जीवीं धरिजे । तरी मग विख्यात होईजे । भूमंडळीं ॥ ६ ॥ विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें । विरक्तें धारिष्ट धरावें । दमनविषईं ॥ ७ ॥ विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन । विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥ ८ ॥ विरक्तें भक्ती वाढवावी । विरक्तें शांती दाखवावी । विरक्तें येत्नें करावी । विरक्ती आपुली ॥ ९ ॥ विरक्तें सत्क्रिया प्रतिष्ठावी । विरक्तें निवृत्ति विस्तारावी । विरक्तें नैराशता धरावी । सदृढ जिवेंसी ॥ १० ॥ विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति अवलंबावी । विरक्तें क्षमा सांभाळावी । अत्यादरेंसी ॥ ११ ॥ विरक्तें परमार्थ उजळावा । विरक्तें विचार शोधावा । विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण ॥ १२ ॥ विरक्तें भाविकें सांभाळावीं । विरक्तें प्रेमळें निववावीं । विरक्ते साबडीं नुपेक्षावीं । शरणागतें ॥ १३ ॥ विरक्तें असावें परम दक्ष । विरक्तें असावें अंतरसाक्ष । विरक्तें वोढावा कैपक्ष । परमार्थाचा ॥ १४ ॥ विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा । विरक्तें वगतृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ १५ ॥ विरक्तें विमळ ज्ञान बोलावें । विरक्तें वैराग्य स्तवीत जावें । विरक्तें निश्चयाचें करावें । समाधान ॥ १६ ॥ पर्वें करावीं अचाटें । चालवावी भक्तांची थाटे । नाना वैभवें कचाटें । उपासनामार्गं ॥ १७ ॥ हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं । भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ॥ १८ ॥ बहुतांस करावे परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार । पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ॥ १९ ॥ स्नान संध्या जप ध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन । नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें ॥२०॥ दृढ निश्चयो धरावा ।

जिव्हेवर सरस्वती नांदेल, हें आतां सांगतों. विरक्तानें पुढील लक्षणें चित्तांत धरावींत म्हणजे तो भूमंडळावर विख्यात होईल (१–६). विवेक, अध्यात्म, इंद्रियजय, हे विरक्तापाशीं अवश्य पाहिजेत. विरक्तानें साधनमार्ग म्ह. ब्रह्मज्ञान व सगुणभक्ति प्रगट करावी. विरक्तानें शांति धरावी व आपली विरक्ति वाढवावी. त्यानें सदाचार प्रतिष्ठावा, निवृत्तिमार्ग विस्तारावा व अत्यंत नैराश्य धरावें. विरक्तानें धर्मस्थापना करावी, नीतीनें चालावें व क्षमावृत्तीनें सर्वांचीं मनें आकर्षून घ्यावीं. विरक्तानें परमार्थ उजळावा व विचार शोधावा. विरक्तानें भाविक, प्रेमळ व साबडे म्ह० भोळे लोक ह्यांना सांभाळून घ्यावें व सुखवावें. विरक्तानें सर्व कार्यांत दक्ष असावें, दुसऱ्यांचीं अंतरें जाणावींत व परमार्थमार्गाचा पुरस्कार करावा (७–१४) विरक्तानें स्वतः अभ्यासी व साक्षेपी असावें व आपल्या वक्तृत्वशक्तीनें मोडलेला परमार्थ उभा करावा. त्यानें ज्ञान-वैराग्य सांगावें व सर्वांस निश्चयाचें समाधान द्यावें. त्यानें टोलेजंग (अचाट) महोत्सव करावे, भक्तांचीं मंडळें उभारावीं व मोठ्या थाटा-माटानें व खटपटीनें (कचाट) उपासनामार्ग चालवावा. त्यानें सगुण हरिकथा करावी, अध्यात्मनिरूपणांची गर्दी उसळावी व भक्तिमार्गाचा जयजयकार करून निंदक व दुर्जन ह्यांना लाजवावें. त्यानें अनेकांवर उपकार करावे, सत्कर्मांचा जीर्णोद्धार करावा व पुण्यमार्गाचा विस्तार बुद्धिपुरस्सर (बळेंची) करावा. स्नान-संध्या, जप-ध्यान, तीर्थ-यात्रा, नित्यनेमाचें

संसार सुखाचा करावा। विश्व जन उद्धरावा। संसर्गमात्रें ॥ २१ ॥ विरक्तें असावें धीर। विरक्तें असावें उदार। विरक्तें असावें तत्पर। निरूपणविषईं ॥ २२ ॥ विरक्तें सावध असावें। विरक्तें शुद्धमार्गें जावें। विरक्तें झिजोन उरवावें। सदकीर्तीसी ॥ २३ ॥ विरक्तें विरक्त धुंडावे। विरक्तें साधु वोळखावे। विरक्तें मित्र करावे। संत योगी सज्जन ॥ २४ ॥ विरक्तें करावीं पुरश्चरणें। विरक्तें फिरावीं तीर्थाटणें। विरक्तें करावीं नाना स्थानें। परम रमणीय ॥ २५ ॥ विरक्तें उपाधी करावी। आणि उदास वृत्ति न संडावी। दुराशा जडों नेदावी। कोणयेकविषईं ॥ २६ ॥ विरक्तें असावें अंतरनिष्ठ। विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट। विरक्तें न व्हावें कनिष्ठ। पराधेनपणें ॥ २७ ॥ विरक्तें समय जाणाव। विरक्तें प्रसंग वोळखावा। विरक्त चतुर असावा। सर्व प्रकारें ॥ २८ ॥ विरक्तें येकदेसी नसावें। विरक्तें सर्व अभ्यासावें। विरक्तें अवघें जाणावें। ज्याचें त्यापरी ॥ २९ ॥ हरिकथा निरूपण। सगुणभजन ब्रह्मज्ञान। पिंडज्ञान तत्वज्ञान। सर्व जाणावें ॥ ३० ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग। ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग। प्रवृत्तिमार्ग निवृत्तिमार्ग। सकळ जाणावें ॥ ३१ ॥ प्रेमळ स्थिती उदास स्थिती। योगस्थिती ध्यानस्थिती। विदेह स्थिती सहज स्थिती। सकळ जाणावें ॥ ३२ ॥ ध्वनी लक्ष मुद्रा आसनें। मंत्र यंत्र विधी विधानें। नाना मतांचें देखणें। पाहोन सांडावें ॥ ३३ ॥ विरक्तें असावें जगमित्र। विरक्तें असावें स्वतंत्र। विरक्तें असावें विचित्र। बहुगणी ॥ ३४ ॥ विरक्तें असावें विरक्त। विरक्तें असावें हरिभक्त। विरक्तें असावें नित्यमुक्त। अलिप्तपणें ॥ ३५ ॥ विरक्तें शास्त्रें धांडोळावीं। विरक्तें मतें विभांडावीं। विरक्तें

भगवद्भजन करून अंतरशुद्ध असावें व सकळ लोक संसर्गमात्राने म्ह. समागमानें उद्धरावे (१५–२१). विरक्त धीर व उदार असावा व निरूपणाविषयीं तत्पर असावा. त्यानें सावधपणानें शुद्धमार्ग संभाळावा व देह परोपकारीं झिजवून सत्कीर्ति वाढवावी. विरक्तानें आपल्यासारखे दुसरे विरक्त असतील ते शोधावे, साधू ओळखावे व संत-सज्जनांशीं मैत्री जोडावी. विरक्तानें पुरश्चरणें करावीं व अत्यंत रमणीय अशीं अनेक स्थळें निर्माण करावींत. विरक्तानें उपाधि करावी पण आपली उदासीनता सोडूं नये व कोठेंच आशेचा दास बनूं नये. विरक्त अंतरनिष्ठ असावा, क्रियाभ्रष्ट नसावा व कोणाचाही पराधीनपणा पत्करून त्यानें आपलें महत्त्व कमी करून घेऊं नये. विरक्त सदा स्वतंत्र असावा, समय प्रसंग ओळखणारा चतुर असावा. त्यानें सर्व गोष्टींचा अभ्यास करावा व एकदेशी असूं नये. प्रत्येकाचे स्वभावधर्म जाणून ज्याचे त्यापरी त्याला वागतां आलें पाहिजे (२२–२९). सगुण हरिकथा व ब्रह्मज्ञाननिरूपण ह्या दोहोंत तो निष्णात असावा. त्याला पिंड-ब्रह्मांडाचें व तत्त्वांचें ज्ञान असावें म्ह. पंचीकरणविद्या त्याला अवगत असावी. कर्म, उपासना, ज्ञान, निश्चयाचें आत्मज्ञान व प्रवृत्ति-निवृत्ति सर्व कांहीं त्याला माहीत पाहिजे. प्रेमळस्थिति, उदासस्थिति, योगस्थिति, ध्यानस्थिति व सहजावस्था हें सर्व त्यानें जाणिलें पाहिजे. ध्यान, लक्ष्य, आसनें, मुद्रा, मंत्र, तंत्र, नाना मतांचें वर्म त्यानें पाहून ठेवावीं (३०–३३). विरक्त जगमित्र असावा, स्वतंत्र म्ह० आत्मतंत्र असावा, बहुगुणी असावा, हरिभक्त असावा, सर्व करून असंग असावा. त्यानें नाना शास्त्रें शोधावीं, पाखांडें खंडावीं व मुमुक्षुजनांस शुद्ध परमार्थमार्गास लावावें. त्यानें सकळांचे संशय छेदावे व सकळ लोक आपले म्हणावे.

मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गीं ॥ ३६ ॥ विरक्तें शुद्धमार्ग सांगावा । विरक्तें संशय छेदावा । विरक्तें आपला म्हणावा । विश्वजन ॥ ३७ ॥ विरक्तें निंदक वंदावे । विरक्तें साधक बोधावे । विरक्तें बद्ध चेववावे । मुमुक्षनिरूपणें ॥ ३८ ॥ विरक्तें उत्तम गुण घ्यावे । विरक्तें अवगुण त्यागावे । नाना अपाय भंगावे । विवेकबळें ॥ ३९ ॥ ऐसीं हीं उत्तम लक्षणें । ऐकावीं येकाग्र मनें । याचा अव्हेर न करणें । विरक्त पुरुषीं ॥ ४० ॥ इतुकें बोलिलें स्वभावें । त्यांत मानेल तितुकें घ्यावें । श्रोतीं उदास न करावें । बहु बोलिलें म्हणोनी ॥ ४१ ॥ परंतु लक्षणें ने घेतां । अवलक्षणें बाष्कळता । तेणें त्यास पढतमूर्खता । येवों पाहे ॥ ४२ ॥ त्या पढतमूर्खाचें लक्षण । पुढिलिये समासीं निरूपण । बोलिलें असे सावधान । होऊन ऐका ॥ ४३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विरक्तलक्षणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खांअंगीं चातुर्य बाणे । आतां परिसा शाहाणे । असोनि मूर्ख ॥१॥ तया नांव पढतमूर्ख । श्रोतीं न मानावें दुःख । अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये ॥ २ ॥ बहुश्रुत आणि व्युत्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान । दुराशा आणी अभिमान । धरी तो येक पढतमूर्ख ॥ ३ ॥ मुक्त क्रिया प्रतिपादी । सगुण भक्ति उच्छेदी । स्वधर्म आणी साधन निंदी । तो येक पढतमूर्ख ॥ ४ ॥ आपलेन ज्ञातेपणें । सकळांस शब्द ठेवणें । प्राणीमात्रांचें पाहे उणें । तो येक पढतमूर्ख ॥ ५ ॥ शिष्यास अवज्ञा घडे । कां तो संकटीं पडे । जयाचेनि शब्दें मन मोडे । तो येक पढतमूर्ख ॥ ६ ॥ रजोगुणी तमोगुणी । कपटी कुटिळ अंतःकर्णीं । वैभव देखोन वाखाणी ।

त्यानें निंदकांसही वंदावें. बद्ध असतील त्यांना मुमुक्षूचें गुण सांगून जागें करावें व साधनमार्गास लागले असतील त्यांना पूर्णबोध करावा. उत्तम गुण तेवढे घ्यावयाचे व दोषांचा त्याग करावयाचा असा विरक्ताचा स्वभाव बनला पाहिजे. विरक्तानें विवेकबळावर अपाय दूर करावेत (३४–३९). अशीं हीं उत्तम लक्षणें विरक्तानें एकाग्र मनानें ऐकावींत, त्यांचा अव्हेर करूं नये. फार बोललों म्हणून कंटाळूं नये. ह्या लक्षणांतील मानतील तीं घ्यावींत. हीं लक्षणें न घेतां ह्यांच्या उलट वाईट लक्षणें घेतलीं तर अशा बाष्कळ मनुष्याला पढतमूर्ख म्हणतील. पढतमूर्खाचीं लक्षणें आतां सांगतों (४०–४३). [द० २, स० ९]

मागें सद्विद्येचीं व विरक्ताचीं लक्षणें सांगितलीं तीं ऐकून मूर्खही चतुर होईल. आतां शहाणे असून मूर्ख कसे असतात तें सांगतों. शहाणे असून मूर्ख ह्याचें नांव पढतमूर्ख. पढतमूर्खाचे अवगुण ऐकून श्रोत्यांनीं वाईट वाटूं देऊं नये. कां कीं अवगुणांचा त्याग केला म्ह. सुख प्राप्त होतें (१–२). शास्त्राध्ययन केलेला व बहुश्रुत असून ब्रह्मज्ञानाचें प्रतिपादन उत्तम रीतीनें करतो पण पोटांत दुराशा आणि अभिमान धरतो तो एक पढतमूर्ख. मुक्तक्रियेच्या म्ह. सर्व निर्बंध सोडून स्वच्छंदानें मनास येईल तसें वागण्याचा जो उपदेश करतो, ज्ञानाच्या गोष्टी सांगून सगुण-भक्ति जो उडवतो व स्वधर्म आणि साधनमार्ग ह्यांची निंदा करतो, तो एक पढतमूर्ख. आपल्या ज्ञानाच्या गर्वानें जो सर्वांना नांवें ठेवतो व प्राणिमात्रांचें उणें पाहतो तो पढतमूर्ख. ज्याच्या आज्ञेनें वागतां आज्ञा मोडणें किंवा संकटांत पडणें असा प्रसंग शिष्यावर गुदरतो तो पढतमूर्खच

तो येक पढतमूर्ख ॥ ७ ॥ समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण । गुण सांगतां पाहे अवगुण । तो येक पढतमूर्ख ॥ ८ ॥ लक्षण ऐकोन मानी वीट । मत्सरें करी खटपट । नीति नायके उद्धट । तो येक पढतमूर्ख ॥ ९ ॥ जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे । क्रिया शब्दास अंतरे । तो येक पढतमूर्ख ॥ १० ॥ वक्ता अधिकारेंवीण । वग्तृत्वाचा करी सीण । वचन जयाचें कठीण । तो एक पढतमूर्ख ॥ ११ ॥ श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें । वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ॥ १२ ॥ दोष ठेवी पुढिलांसी । तेचि स्वयें आपणापासी । ऐसें न कळे जयासी । तो येक पढतमूर्ख । ॥ १३ ॥ अभ्यासाचेनि गुणें । सकळ विद्या जाणे । जनास निवऊं नेणे । तो एक पढतमूर्ख ॥ १४ ॥ हस्त बांधीजे ऊर्णतंतें । लोभें मृत्य भ्रमरातें । ऐसा जो प्रपंचीं गुंते । तो येक पढतमूर्ख ॥ १५ ॥ स्त्रियांचा संग धरी । स्त्रियांसी निरूपण करी । निंद्य वस्तु आंगिकारी । तो येक पढतमूर्ख ॥ १६ ॥ जेणें उणीव ये आंगासी । तेंचि दृढ धरी मानसीं । देहबुद्धि जयापासीं । तो येक पढतमूर्ख ॥ १७ ॥ सांडूनियां श्रीपती । जो करी नरस्तुती । कां दृष्टी पडिल्यांची वर्णी कीर्ती । तो येक पढतमूर्ख ॥ १८ ॥ वर्णी स्त्रियांचे आवेव । नाना नाटकें हावभाव । देवा विसरे जो मानव । तो येक पढतमूर्ख ॥ १९ ॥ भरोन वैभवाचे भरीं । जीवमात्रांस तुच्छ करी । पाखांड मत थावरी । तो येक पढतमूर्ख ॥ २० ॥ वित्पन्न आणी वीतरागी । ब्रह्मज्ञानी माहायोगी । भविष्य सांगों लागे जगीं । तो येक पढतमूर्ख ॥ २१ ॥ श्रवण होतां अभ्यंतरीं । गुणदोषाची चाळणा करी । परभूषण मत्सरी । तो येक पढतमूर्ख

होय (३–६). रजोगुणाचे, तमोगुणाचे किंवा कुविद्येचे जे दोष मागें सांगितले ते ज्या विद्वानाच्या अंगांत आहेत तो पढतमूर्खच होय. दुसऱ्याचें वैभव पाहिलें कीं स्तुति करावयाला लागणें, समग्र ग्रंथ पाहिल्यावांचून ग्रंथाला दूषण देणें, कोणी गुण सांगत असतां दोषच पाहणें, सद्गुणांचा वीट मानणें, मत्सरानें भल्याचा पाडाव करण्यास उद्युक्त होणें, न्याय-नीतीविषयीं बेफिकीर असणें, ज्ञानगर्वानें इरेस चढणें, क्रोधावेश न आवरणें, बोलण्याच्या उलट वागणें, अधिकारा-वांचून वक्तृत्व करणें, बहुश्रुतपणाच्या व वाचाळपणाच्या योगानें वक्त्याचा पाडाव करणें, दुसऱ्यांस दोष ठेवीत असतांना तेच दोष आपल्या ठायीं आहेत हें न कळणें, विद्याभ्यास चांगला केलेला असून जनाचें समाधान न करतां येणें, हत्ती कोळ्याच्या जाळ्यानें बांधावा किंवा भ्रमर कमळांत अडकून मरावा त्याप्रमाणें प्रपंचांत गुरफटून राहणें, बायकांची संगत धरून त्यांना उपदेश देणें, मद्य-मांसादि निंद्य वस्तूंचा अंगीकार करणें, जेणेंकरून अंगाशीं कमीपणा येईल तेंच मनांत दृढ धरणें, देहच मी अशी बुद्धि ठेवणें, देव सोडून मनुष्यांची स्तुति करणें, दृष्टि पडेल त्याची स्तुति करीत सुटणें, स्त्रियांच्या अवयवांचें वर्णन करून नाटकी हावभाव करणें, देवाला विसरणें, श्रीमंतीच्या डौलांत इतरांना तुच्छ करणें, पाखंड मताचें प्रतिपादन करणें हीं सर्व पढतमूर्खाचीं लक्षणें होत (७–२०). पंडित, वैराग्यसंपन्न ब्रह्मज्ञानी व योगी असून लोकांत भविष्यें सांगत फिरेल तर तो पढतमूर्खच होय (२१). चांगलं श्रवण घडत असतांना वक्त्याच्या गुण-दोषांचा विचार मनांत आणणें, दुसऱ्याच्या सत्कारानें मत्सर वाटणें, भक्ति-ज्ञान-वैराग्याची कांहींच क्रिया हातून घडत नसून ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी

॥ २२ ॥ नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन । क्रियेवीण बोले
ब्रह्मज्ञान । तो येक पढतमूर्ख ॥ २३ ॥ न मनी तीर्थ न मनी क्षेत्र । न मनी
वेद न मनी शास्त्र । पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ॥ २४ ॥
आदर देखोनि मन धरी । कीर्तीविण स्तुती करी । सवेंचि निंदी अनादरी ।
तो येक पढतमूर्ख ॥ २५ ॥ मागें येक पुढें येक । ऐसा जयाचा दंडक ।
बोले येक करी येक । तो येक पढतमूर्ख ॥ २६ ॥ प्रपंचविशीं सादर ।
परमार्थीं ज्याचा अनादर । जाणपणें घे अधार । तो येक पढतमूर्ख ॥ २७ ॥
येथार्थ सांडून वचन । जो रक्षून बोले मन । ज्याचें जिणें पराधेन । तो
येक पढतमूर्ख ॥ २८ ॥ सोंग संपादी वरीवरी । करूं नये तेंचि करी ।
मार्ग चुकोन भरे भरीं । तो येक पढतमूर्ख ॥ २९ ॥ रात्रंदिवस करी श्रवण ।
न संडी आपले अवगुण । स्वहित आपलें नेणे आपण । तो येक पढतमूर्ख
॥ ३० ॥ निरूपणीं भले भले । श्रोते येऊन बैसले । क्षुद्रें लक्षुनी बोले ।
तो येक पढतमूर्ख ॥ ३१ ॥ शिष्य जाला अनाधिकारी । आपली अवज्ञा
करी । पुन्हा त्याची आशा धरी । तो येक पढतमूर्ख ॥ ३२ ॥ होत असतां
निरूपण । देहास आलें उणेपण । क्रोधें करी चिणचिण । तो येक पढत-
मूर्ख ॥ ३३ ॥ भरोन वैभवाचे भरीं । सद्गुरूची उपेक्षा करी । गुरुपरंपरा
चोरी । तो येक पढतमूर्ख ॥ ३४ ॥ ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणाऐसा
सांची अर्थ । अर्थासाठीं लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ॥ ३५ ॥
वर्तल्यावीण सिकवी । ब्रह्मज्ञान लावणी लावी । पराधेन गोसावी । तो येक
पढतमूर्ख ॥ ३६ ॥ भक्तिमार्ग अवघा मोडे । आपणामधें उपंढर पडे । ऐसिये
कर्मीं पवाडे । तो येक पढतमूर्ख ॥ ३७ ॥ प्रपंच गेला हातींचा । लेश नाहीं

सांगणें, तीर्थ, क्षेत्र किंवा वेदशास्त्र ह्यांविषयीं मनांत आदर नसणें, पवित्र कुळांत जन्मून अपवित्रपणें वागणें, आपल्या-विषयीं जेथें आदर आहे तेथें मन ठेवणें, कीर्तीवांचून स्तुति करणें व त्याच तोंडानें निंदा व अनादर करणें, मागें एक पुढें एक असें वागणें, प्रपंचाचा आदर व परमार्थाचा अनादर धरणें, जाणत असून अजाणतेपणांत शिरणें, खरें सोडून मनधरणी-सारखें बोलणें, नित्य पराधीनपणांत राहणें, हीं पढतमूर्खाचीं लक्षणें होत (२२–२८). वरवर सोंग-संपादणी करून करूं नये तेंच करणें, मार्ग चुकून पुनः हट्टाला पेटणें, अहर्निश श्रवण करीत असून आपल्या दोषांचा त्याग न करणें, स्वहित न समजणें, श्रवणाला थोर-थोर श्रोते येऊन बसले असतां दुसऱ्यांच्या क्षुद्र मर्मांना अनुलक्षून टोंचून बोलणें, अनधिकारी व अवज्ञा करणाऱ्या शिष्याची आशा धरणें, श्रवण होत असतां देहाला कांहीं उणेपण आलें (वायु सरणें, ओक येणें इ०) तर रागानें फणफण करणें, श्रीमंतीच्या डौलांत सद्गुरूची उपेक्षा करणें, गुरुपरंपरा चोरणें, ज्ञान बोलत असून नीच स्वार्थ न सोडणें किंबहुना कृपणासारखें धनसंचयावर लक्ष ठेवणें, द्रव्यासाठीं परमार्थ लावणें, स्वतः वागत नसून दुसऱ्याला शिकविणें व ब्रह्मज्ञान सांगणें, गोसांवी (इंद्रियांचा स्वामी) असें आपणास म्हणवीत असून जिणें परस्वाधीन असणें, जेणेंकरून भक्तिमार्ग मोडतो किंवा आपल्या राहणींतली अव्यवस्था अगर ढोंग (उपंढर) प्रगट होतें अशीं कर्मे अंगावर घेणें,

परमार्थाचा । द्वेषी देवां-ब्राह्मणांचा । तो येक पढतमूर्ख ॥ ३८ ॥ त्यागावया अवगुण । बोलिलें पढतमूर्खाचें लक्षण । विचक्षणें नीउन पूर्ण । क्षमा केलें पाहिजे ॥ ३९ ॥ परम मूर्खांमाजीं मूर्ख । जो संसारीं मानी सुख । या संसारदुःखा-ऐसें दुःख । आणीक नाहीं ॥ ४० ॥ तेंचि पुढें निरूपण । जन्मदुःखाचें लक्षण । गर्भवास हा दारुण । पुढें निरोपिला ॥ ४१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पढतमूर्खलक्षणनिरूपणनाम समास दाहावा ॥ १० ॥

देव-ब्राह्मणांचा द्वेष करणें, हीं पढतमूर्खाचीं लक्षणें होत (२९–३८). अवगुणांचा त्याग व्हावा म्हणून हीं पढतमूर्खाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, ह्यांत कांहीं कमजास्त शब्द पडला असल्यास सूज्ञांनीं क्षमा करावी. मूर्खाचीं व पढतमूर्खाचीं लक्षणें सांगितलीं पण ह्या मूर्खांतला परममूर्ख तो कीं जो संसारांत सुख आहे असें मानतो. कां कीं, संसारदुःखाएवढें दुसरें कोणतेंच दुःख नाहीं. त्याचेंच म्ह. जन्म-मरणाचें दारुण दुःख पुढील दशकांत सांगतों (३९–४१). [द. २, स. १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ सगुणपरीक्षा दशक ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर । जन्म भयाचा डोंगर । चळेना ऐसा ॥ १ ॥ जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी । जन्म काळाची जाचणी । निच नवी ॥ २ ॥ जन्म कुविद्येचें फळ । जन्म लोभाचें कमळ । जन्म भ्रांतीचें पडळ । ज्ञानहीन ॥ ३ ॥ जन्म जिवासी बंधन । जन्म मृत्यासी कारण । जन्म हेंचि अकारण । गथागोवी ॥ ४ ॥ जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर । जन्म वासनाविस्तार । विस्तारला ॥ ५ ॥ जन्म जीवाची आवदसा । जन्म कल्पनेचा ठसा । जन्म लांवेचा वळसा । ममतारूप ॥ ६ ॥ जन्म मायेचें मैंदावें । जन्म क्रोधाचें विरावें । जन्म मोक्षास आडवें । विघ्न आहे ॥ ७ ॥ जन्म जीवाचें मीपण । जन्म अहंतेचा गुण । जन्म हेंचि विस्मरण । ईश्वराचें ॥ ८ ॥ जन्म विषयांची आवडी । जन्म दुराशेची बेडी । जन्म काळाची कांकडी । भक्षिताहे ॥ ९ ॥ जन्म हाचि विषम काळ । जन्म हेचि वोखटी वेळ । जन्म हा अति कुश्चीळ । नर्कपतन ॥ १० ॥ पाहातां शरीराचें मूळ । या ऐसें नाहीं अमंगळ । रजस्वलेचा जो विटाळ । त्यामधें जन्म यासी ॥ ११ ॥ अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा । तेथें निर्मळपणाचा सोहळा । केंवी घडे ॥ १२ ॥ रजस्वलेचा जो विटाळ । त्याचा

जन्म हा दुःखाचा अंकुर, शोकाचा समुद्र व भयाचा अचळ पर्वत आहे. जन्म ही कर्मांची मूस, पातकाची खाण व काळाचा नित्य नवा जाच आहे. जन्म हें कुविद्येचें फळ व अज्ञानरूप भ्रांतीचें पटल आहे. हें जीवाचें बंधन व मृत्यूचें कारण आहे. जीवाच्या मागें ही निष्कारण कटकट लागलेली आहे. स्वसुखाचा विसर व चिंतेचा भंवरा जन्मामुळें मागें लागतो. जन्म हा अनंत वासनांचा विस्तार आहे. जीवाची दुर्दशा म्ह० जन्म. जन्म हा ममतारूप जखिणीचा फेरा आहे. जन्म ही मायेची फसवणूक आहे. मोक्षाचें आडवें विघ्न म्ह० जन्म. जन्म हा जीवाचा अहंकार व देवाचें विस्मरण होय. जन्म म्ह० विषयांची दुराशा. जन्म म्ह० काळाच्या हातांतली खावयाची कांकडी! जन्म ही अत्यंत वाईट वेळ, जन्म म्हणजेच घाणेरें नरकपतन. नानाविध पातकांमुळें देहाची उत्पत्ति होते व जन्मापासून नानाविध दुःखपापें जीवाच्या मागें लागतात (१-१०). शरीरासारखें अमंगळ कांहींच नाहीं. ज्याला अत्यंत दोष अशा रजस्वला स्त्रीच्या विटाळांत ह्याचा जन्म! त्या विटाळाचा आळून जो गोळा होतो तो गोळा म्हणजेच हें शरीर. असा अशुद्धा (रक्त) पासून झालेला हा देह. ह्याला शुद्धपणाचा सोहळा

आळोन जाला गाळ । त्या गाळाचेंच केवळ । शरीर हें ॥ १३ ॥ वरिवरि दिसे वैभवाचें । अंतरीं पोतडें नर्काचें । जैसें झांकणें चर्मकुंडाचें । उघडितांच नये ॥ १४ ॥ कुंड धूतां शुद्ध होतें । यास प्रत्यईं धुईजेतें । तरी दुर्गंधी देहातें । शुद्धता नये ॥ १५ ॥ अस्तीपंजर उभविला । सीरानाडीं गुंडाळिला । मेदमांसें सरसाविला । सांदोसांदीं भरूनी ॥ १६ ॥ अशुद्ध शब्द शुद्ध नाहीं । तेंही भरलें असे देहीं । नाना व्याधी दुःखें तेंही । अभ्यांतरीं वसती ॥ १७ ॥ नर्काचें कोठार भरलें । आंत बाहेरी लिडीबिडिलें । मूत्रपोतडें जमलें । दुर्गंधीचें ॥ १८ ॥ जंत किडे आणी आंतडी । नाना दुर्गंधीची पोतडी । अमुप लवथविती कातडी । कांटाळवाणी ॥ १९ ॥ सर्वांगास सिर प्रमाण । तेथें बळसें वाहे प्राण । उठे घाणी फुटतां श्रवण । तें दुर्गंधी ने घवे ॥ २० ॥ डोळां निघती चिपडें । नाकीं दाटती मेकडें । प्रातःकाळीं घाणी पडे । मुखीं मळासारिखी ॥ २१ ॥ लाळ थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रबळ । तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखें ॥ २२ ॥ मुख ऐसें कुश्चीळ दिसे । पोटीं विष्ठा भरली असे । प्रत्यक्षास प्रमाण नसे । भूमंडळीं सर्वथा ॥ २३ ॥ पोटीं घालितां दिव्यान्न । कांहीं विष्ठा कांहीं वमन । भागीरथीचें घेतां जीवन । त्याची होये लघुशंका ॥ २४ ॥ एवं मळ मूत्र आणी वमन । हेंचि देहाचें जीवन । येणेंचि देह वाढे जाण । यदर्थीं संशय नाहीं ॥ २५ ॥ पोटीं नस्तां मळमूत्रवोक । तरी मरोन जाती सकळ लोक । जाला राव अथवा रंक । पोटीं विष्ठा चुकेना ॥ २६ ॥ निर्मळपणें काढूं जातां । तरी देह पडेल तत्वतां । एवं देहाची वेवस्ता । ऐसी असे ॥ २७ ॥ ऐसा हा घड असतां । येथाभूत पाहों जातां । मग ते दुर्दशा सांगतां । शंका बाधी ॥ २८ ॥ ऐसिये कारागृहीं वस्ती । नवमास भोगिल्या विपत्ती । नवही द्वारें

कसला घडणार? वरवर वस्त्रालंकारांची झकपक केली तरी आंत चर्मकुंडाचें झांकण जसें काढतां येत नाहीं तसें ह्याच्या आंत सारें नरकाचें पोतडें भरलेलें असतें. कुंड धुतां तरी येतें पण ह्यास रोज धुतलें तरी त्याची दुर्गंधी आपली कायमच! (११–१५). हाडांचा पिंजरा उभा केलेला, शिरा-नाडींनीं गुंडाळलेला, मेद-मांस सांदी-सांदींतून गच्च भरलेलें, अशुद्ध (रक्त) देहभर पसरलेलें, अनेक व्याधींचें आगर, नर्क-मूत्रांचें कोठार, जंतकिडे व आंतडीं ह्यांचा बुजबुजाट, नाकांस शेंबूड वाहणारा, कान फुटल्यास असह्य घाण सोडणारा, डोळ्यांतलीं चिपडें, नाकांतलीं मेकडें, अंथरुणावरून उठल्यावरची तोंडाची घाण, लाळ, थुंका, पित्त, कफ (श्लेष्मा) असें घाणेरें तोंड आणि अशा मुखाला कवि चंद्राची उपमा देतात! दिव्यान्नाची बनलेली विष्टा, निर्मळ गंगोदक घेतलें तरी त्याची बनणारी लघवी असा मळ-मूत्र-वमनांचा हा देह मळ-मूत्र-वमनानेंच वाढणारा! मळ, मूत्र, ओक नसल्यास लोक मरून जातील. राजा असो रंक असो पोटांत विष्टा चुकावयाचीच नाहीं. देहशुद्धीसाठीं कोणी ती काढूं म्हणेल तर तात्काळ देहच पडेल. असा हा प्रकार शरीर चांगलें चालत असतांना असतो, मग तो बिघडल्यास त्याची काय दशा होते हें सांगावयाला मनही माघार घेतें! (१६–२८). अशाला कारागृहांत वसती करून ९ महिने अनंत

निरोधती। वायो कैंचा तेथें ॥२९॥ वोकानरकाचे रस झिरपती। ते जठराग्नीस्तव तापती। तेणें सर्वही उकडती। अस्थिमांस ॥ ३० ॥ त्वचेविण गर्भ खोळे। तव मातेस होती डोहळे। कटवतीक्ष्णें सर्वांग पोळे। तया बाळकाचें ॥ ३१ ॥ बांधलें चर्माचें मोटाळें। तेथें विष्ठेचें पेटाळें। रसउपाय वंकनाळें। होत असे ॥ ३२ ॥ विष्ठा मूत्र वांती पीत। नाकीं तोंडी निघती जंत। तेणें निर्बुजलें चित्त। अतिशयेंसी ॥ ३३ ॥ ऐसिये कारागृहीं प्राणी। पडिला अत्यंत दाटणी। कळवळोन म्हणे चक्रपाणी। सोडवीं येथून आतां ॥ ३४ ॥ देवा सोडविसी येथून। तरी मी स्वहित करीन। गर्भवास हा चुकवीन। पुन्हा न ये येथें ॥ ३५ ॥ ऐसी दुखवोन प्रतिज्ञा केली। तंव जन्मवेळ पुढें आली। माता आक्रंदों लागली। प्रसूतकाळीं ॥ ३६ ॥ नाकीं तोंडीं बैसलें मांस। मस्तकद्वारें सांडी स्वास। तेंहि बुजलें विशेष। जन्मकाळीं ॥ ३७ ॥ मस्तकद्वार तें बुजलें। तेणें चित्त निर्बुजलें। प्राणी तळमळूं लागले। चहूंकडे ॥ ३८ ॥ स्वास उस्वास कोंडला। तेणें प्राणी जाजावला। मार्ग दिसेनासा जाला। कासावीस ॥ ३९ ॥ चित्त बहु निर्बुजलें। तेणें आडभरीं भरलें। लोक म्हणती आडवें आलें। खांडून काढा ॥ ४० ॥ मग ते खांडून काढिती। हस्तपाद छेदून घेती। हातां पडिलें तेंचि कापिती। मुख नासिक उदर ॥ ४१ ॥ ऐसे टवके तोडिले। बाळकें प्राण सोडिले। मातेनेंही सांडिलें। कळेवर ॥ ४२ ॥ मृत्य पावला आपण। मातेचा घेतला प्राण। दुःख भोगिलें दारुण। गर्भवासीं ॥ ४३ ॥ तथापी सुकृतेंकरूनी।

आपत्ती भोगाव्या लागतात. तेथें नऊही द्वारें म्ह. इंद्रियें बंद असल्यामुळें श्वासापुरता वायुही मिळत नाहीं. ओका-नरकाचे रस पाझरतात व ते जठराग्नीमुळें तप्त होऊन गर्भाचीं सारीं हाडें आणि मांस पोळून काढतात. त्वचेशिवायच गर्भ जरा हालचाल करतो तेव्हां आईला डोहाळे लागतात व ती कडू व तिखट पदार्थ खाते. त्याच्या रसानें सारें अंग होरपळून निघतें. कातड्याच्या मोटाळयाला विष्टेचा गुंडाळा (पेटाळें) असतो व त्याला नाळाच्या द्वारें रस पोंचत असतो. विष्टा, मूत्र, वांती, पित्त व नाकीं-तोंडीं निघणारे जंत ह्यांमुळें गर्भस्थ बालक अतिशय घाबरून जातें (२९–३३). अशा बंदिवासाच्या अडचणींत प्राणी सांपडला म्हणजे कळवळून भगवंतास म्हणतो, "हे चक्रपाणी! मला ह्यांतून आतां सोडवा. देवा, ह्यांतून मला सोडवशील तर मी स्वहित साधीन. हा गर्भवास चुकवीन व पुन्हां येथें येणार नाहीं." अत्यंत दुःख भोगून अशी प्रतिज्ञा केली तों जन्माची वेळ येऊन ठेपली. इतक्यांत प्रसूतिवात होऊन माता मोठमोठ्यानें ओरडूं लागली. बालकाच्या नाका-तोंडांत मांस बसलें, अत्यंत मृदु अशा मस्तकाच्या द्वारें तें श्वास सोडीत होतें पण ती टाळूही जन्मकाळीं बुजून गेली. तेव्हां जीव अत्यंत घाबरला, त्याचा प्राण चहूंकडून कासावीस झाला, त्याचा श्वास कोंडला, त्यामुळें तो घाबरला व त्याला मार्ग दिसेनासा झाला. तो अत्यंत कासावीस झाला. तें पोर आडमार्गाला भरलें. "मूल आडवें आलें, त्याला कापून काढा," असें लोक म्हणूं लागले. त्याचे खांडून खांडून तुकडे काढले, हातपाय छेदून घेतले, तोंड, नाक किंवा पोट ह्यांतलें जें हाताला आलें तें कापून टाकलें. ह्याप्रमाणें अंगाचे तुकडेतुकडे करून काढले असतां बाळकानें प्राण सोडले व आई मरण पावली. गर्भवासाचें दारुण दुःख भोगून शेवटीं आपण मेला व आईचाही प्राण घेतला! (३४–४३). ह्याप्रमाणें लक्षावधि प्राणी

मार्ग सांपडला योनी । तऱ्ही आडकला जाउनी । कंठस्कंदीं मागुता ॥ ४४ ॥ तये संकोचित पंथीं । बळेंचि वोढून काढिती । तेणें गुणें प्राण जाती । बाळकाचे ॥ ४५ ॥ बाळकाचे जातां प्राण । अंतीं होये विस्मरण । तेणें पूर्वील स्मरण । विसरोन गेला ॥ ४६ ॥ गर्भी म्हणे सोहं सोहं । बाहेरी पडत म्हणे कोहं । ऐसा कष्टी जाला बहु । गर्भवासीं ॥ ४७ ॥ दुःखा वरपडा होता जाला । थोरा कष्टीं बाहेरी आला । सवेंच कष्ट विसरला । गर्भवासाचे ॥ ४८ ॥ सुंन्याकार जाली वृत्ती । कांहीं आठवेना चित्तीं । अज्ञानें पडिला भ्रांती । तेणें सुखचि मानिलें ॥ ४९ ॥ देह विकार पावलें । सुखदुःखें झळंबलें । असो ऐसें गुंडाळलें । मायाजाळीं ॥ ५० ॥ ऐसें दुःख गर्भवासीं । होत प्राणीमात्रांसी । म्हणोनियां भगवंतासी । शरण जावें ॥ ५१ ॥ जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त । ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ॥ ५२ ॥ ऐशा गर्भवासीं विपत्ती । निरोपिल्या येथामती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ५३ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे जन्मदुःखनिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ । मागां बोलिली तळमळ । गर्भवासाची ॥ १ ॥ गर्भवासीं दुःख जालें । तें बाळक विसरलें । पुढें वाढों लागलें । दिवसेंदिवस ॥ २ ॥ बाळपणीं त्वचा कोंवळी । दुःख होतांचि तळमळी । वाचा नाहीं तये काळीं । सुखदुःख सांगावया ॥ ३ ॥ देहास कांहीं दुःख जालें । अथवा क्षुधेनें पीडलें । तरी तें

गर्भांतच मरतात. इतक्यांतूनही पुण्यबलानें योनींतून मार्ग सांपडला तथापि गर्भ गळ्या-खांद्याला कोठेंतरी अडकतो. मग त्या संकुचित मार्गांतून त्याला बळेंच ओढून काढतात व त्यामुळें मुलाचा प्राण जातो. प्राण जाण्याच्या वेळीं पुनः भूल पडून मध्येंच देवाचें झालेलें स्मरण हा विसरून जातो. गर्भांत असतांना सोऽहं सोऽहं म्हणतो पण बाहेर पडतांच कोऽहं कोऽहं म्हणून बरळूं लागतो ह्याप्रमाणें गर्भवासाचीं थोर दुःखें भोगून तो बाहेर आलाच तर गर्भवासाचीं सर्व दुःखें विसरून जातो ! वृत्ति शून्याकार होऊन स्मरणाचें विस्मरण होतें व अज्ञानभ्रांतीनें जीव त्यांतच सुख मानूं लागतो. देहाला बाल्य, तारुण्य, इ. विकार लागतात. मन सुखदुःखानें व्यापतें. असो. ह्याप्रमाणें जीव मायाजाळांत गुरफटतो. हें गर्भवासाचें दुःख प्राणिमात्राला भोगावें लागतें. म्हणून त्यांतून सुटण्यासाठीं भगवंताला शरण जावें. भगवद्भक्त जन्मापासूनच मुक्त असतो. आत्मज्ञानबळानें तो सर्वदा सर्वांपासून उदासीन राहतो. गर्भवासाचीं दारुण दुःखें ह्याप्रमाणें यथामति सांगितलीं. ह्यापुढचें जीवाचें चरित्र श्रोत्यांनीं सावधान चित्तानें ऐकावें (४४–५३). [द. ३, स. १]

संसार हा सर्व दुःखाचें मूळ आहे, ह्यामुळें दुःखाचे निखारे जीवाचें अंग भाजून काढतात. असो. मागें गर्भवासाची कहाणी सांगितली, आतां पुढचा मार्ग पाहूं. बाळक हळूहळू वाढूं लागलें, बाळपणीं त्वचा कोंवळी असते, त्यामुळें पदोपदीं देहाला त्रास होतो. पण तो सांगावयाला त्याला वाचा नसते व आईला त्याच्या मनांतलें कळत नाहीं. ती वरवर कुरवाळते,

परम आक्रंदलें। परी अंतर नेणवे ॥ ४ ॥ माता कुरवाळी वरी। परी जे पीडा जाली अंतरीं। ते मायेसी नकळे अभ्यंतरीं। दुःख होये बाळकासी ॥ ५ ॥ मागुतें मागुतें फुंदे रडे। माता बुझावी घेऊन कडे। वेथा नेणती बापुडें। तळमळी जीवीं ॥ ६ ॥ नाना व्याधींचे उमाळे। तेणें दुःखें आंदोळे। रडे पडे कां पोळे। अग्निसंगें ॥ ७ ॥ शरीर रक्षितां नये। घडती नाना अपाये। खोडी अधांतरीं होये। आवेवहीन बाळक ॥ ८ ॥ अथवा अपाय चुकले। पूर्व पुण्य पुढें ठाकलें। मातेस वोळखों लागलें। दिवसेंदिवस ॥ ९ ॥ क्षणभरी मातेस न देखे। तरी आक्रंदे रुदन करी दुःखें। ते समईं मातेसारिखें। आणीक कोणीच नाहीं ॥ १० ॥ आस करून वास पाहे। मातेविण कदा न राहे। वियोग पळमात्र न साहे। स्मरण जालिया नंतरें ॥ ११ ॥ जरी ब्रह्मादिक देव आले। अथवा लक्ष्मीनें अवलोकिलें। तरी न वचे बुझाविलें। आपले मातेवांचुनी ॥ १२ ॥ कुरूप अथवा कुलक्षण। सकळांहूनि करंटेपण। तरी नाहीं तीसमान भूमंडळीं कोणी ॥ १३ ॥ ऐसें तें केंविलवाणें। मातेविण दिसे उणें। रागें परतें केलें तिनें। तरी आक्रंदोनि मिठी घाली ॥ १४ ॥ सुख पावे मातेजवळी। दुरी करितांचि तळमळी। अति प्रीति तये काळीं। मातेवरी लागली ॥ १५ ॥ तंव ते मातेस मरण आलें। प्राणी पोरटें जालें। दुःखें झुरणी लागलें। आई आई म्हणोनी ॥ १६ ॥ आई पाहातां दिसेना। दीनरूप पाहे जना। आस लागलिसे मना। आई येईल म्हणोनी ॥ १७ ॥ माता म्हणोन मुख पाहे। तव ते आपुली माता नव्हे। मग हिंवासलें राहे। दैन्यवाणें ॥ १८ ॥ मातावियोगें कष्टलें। तेणें मानसीं दुःख जालें। देहहि क्षीणत्व पावलें। अतिशयेंसीं ॥ १९ ॥ अथवा माताही वांचली। मायलेंकुरा भेटी जाली। बाळदशा ते राहिली। दिवसेंदिवस ॥ २० ॥ बाळपण जालें उणें। दिवसेंदिवस होये शाहाणें। मग

पण त्याच्या देहाचें किंवा मनांतलें दुःख तिला कळत नाहीं. तें रडतें, ती वरवर समजावते पण त्याची व्यथा तिला कळत नाहीं. पडतें, रडतें, व्याधीच्या उमाळ्यानें ओरडतें. त्याला देह रक्षवत नाहीं, तें अग्नीनें भाजतें, मध्येंच कांहीं अपघात होतो. एखादा अवयव व्यंग होतो (१–८). बरें, त्यांतून निभावलेंच तर आईला ओळखूं लागतें. आई क्षणभर दिसली नाहीं कीं रडूं लागतें. त्या वेळीं आईसारखें कोणीच प्रिय वाटत नाहीं. मोठ्या आशेनें वाट पाहावी. आठवण झाली व ती जवळ नसली कीं घाबरें व्हावें. ब्रह्मादि देव आले किंवा प्रत्यक्ष लक्ष्मीनें कृपादृष्टि टाकली तरी आईवांचून त्याची समजच पडत नाहीं. आई कुरूप, कुलक्षणी किंवा करंटी असली तरी आईसारखें त्रैलोक्यांत कोणी नाहीं ही त्याची कल्पना. आई-वांचून तें दीन दिसतें. तिनें झिडकारलें तरी तिच्याच गळ्याला मिठी मारावी! सुख काय तें आई जवळ असतांना व दुःख ती दूर गेली म्हणजे. बाळाची त्या वयांत आईवर अति प्रीति असते (९–१५). आई मेली तर तें पोरटें होऊन 'आई' 'आई' करीत झुरणीला लागतें. 'ही माझी आई आहे काय?' म्हणून आया-बायांच्या तोंडाकडे पाहतें व आई नाहीं असें दिसलें कीं हिरमुष्टी होऊन बापुडवाणें होऊन क्षीण होऊन जातें. अथवा आई ही वांचली व भेटली म्हणजे बाल्य संपून शाहणें

ते मायेचें अत्यंत पेखणें । होतें तें राहिलें ॥ २१ ॥ पुढें लो लागला खेळाचा । कळप मेळविला पोरांचा । आल्या गेल्या डायाचा । आनंद शोक वाहे ॥ २२ ॥ मायबापें सिकवितीं पोटें । तयाचें परम दुःख वाटे । चट लागली न सुटे । संगती लेंकुरांची ॥ २३ ॥ लेंकुरांमधें खेळतां । नाठवे माता आणी पिता । तंव तेथेंही अवचिता । दुःख पावला ॥ २४ ॥ पडिले दांत फुटला डोळा । मोडले पाय जाला लुळा । गेला माज अवकळा । ठाकून आली ॥ २५ ॥ निघाल्या देवी आणी गोवर । उठलें कपाळ लागला ज्वर । पोटसुळीं निरंतर । वायगोळा ॥ २६ ॥ लागलीं भूतें जाली झडपणी । जळींच्या मेसको मायेराणी । मुंज्या झोटिंग करणी । म्हैसोबाची ॥ २७ ॥ वेताळ खंकाळ लागला । ब्रह्मगिन्हो संचरला । नेणों चेडा वोलांडिला । कांहीं कळेना ॥ २८ ॥ येक म्हणती बीरदेव । येक म्हणती खंडेराव । येक म्हणती सकळ वाव । हा ब्राह्मणसमंध ॥ २९ ॥ येक म्हणती कोणें केलें । आंगीं देवत घातलें । येक म्हणती चुकलें । सटवाईचें ॥ ३० ॥ येक म्हणती कर्मभोग । आंगीं जडले नाना रोग । वैद्य पंचाक्षरी चांग । बोलाऊन आणिले ॥ ३१ ॥ येक म्हणती हा वांचेना । येक म्हणती हा मरेना । भोग भोगितो यातना । पापास्तव ॥ ३२ ॥ गर्भदुःख विसरला । तो त्रिविधतापें पोळला । प्राणी बहुत कष्टी जाला । संसारदुःखें ॥ ३३ ॥ इतकेंही चुकोन वांचला । तरी मारमारूं शाहाणा केला । लौकिकीं नेटका जाला । नांव राखे ऐसा ॥ ३४ ॥ पुढें मायेबापीं लोभास्तव । संभ्रमें मांडिला विव्हाव । दाऊनियां सकळ वैभव । नोवरी पाहिली ॥ ३५ ॥ वऱ्हाडी वैभव दाटलें । देखोन परम सुख वाटलें । मन हें रंगोन गेलें । सासुरवाडीकडे ॥ ३६ ॥ मायबापीं भलतैसें असावें । परी सासुरवाडीस नेटकें जावें । द्रव्य नसेल तरी घ्यावें । रुण कळांतरें

होऊं लागतें (१६–२१). शहाणपणाची पहिली खूण ही. आईची वाट पाहणें (पेंखणें) संपवून त्याला खेळाचा छंद (लो) लागतो. मुलांचा घोळका जमवावा, डाव जिंकला किंवा हरला कीं आनंद किंवा खेद मानावा हाच नाद. आई-बाप पोटींच्या कळवळ्यानें शिकवूं लागतात, त्याचें ह्याला दुःख होतें. मुलांत खेळाव्याची चट सुटत नाहीं, खेळतांना माय-बाप आठवतही नाहींत. खेळांतही कांहीं आपदा उद्भवतात. दांत पडतात, डोळा फुटतो, पाय मोडून लंगडा होतो, मस्ती जाऊन कळाहीन होतो. (२२–२५) देवी, गोवर, डोकेंदुखी, ताप, पोटशूळ, वायगोळा, भूतांची झडपणी, जळदेवता, मुंजा, झोटिंग, वेताळ, ब्रह्म-समंध, चेटूक (चेडा), ह्यांपैकीं कांहीं ना कांहीं तरी पाठीस लागून ह्याला पीडा होते. लोकही असेच नाना संबंध जोडतात. कोणी म्हणतात, 'ह्याच्या अंगांत दैवत घातलें', कोणी म्हणतात, 'सटवाईचें कांहीं चुकलें', कोणी म्हणतात, 'याचा कर्मभोग!' वैद्य, पंचाक्षरी चालले आहेत! इतकेंही करून वांचला व मारमारून शहाणा केला, लौकिक राखण्यासारखा झाला. (२६–३४). आईबापांनीं थाटमाटानें (संभ्रमें) लग्न केलें. हाही वऱ्हाड व वस्त्रपात्र पाहून सुखावला, सासुरवाडीकडे मन रंगून गेलें. आईबापांनीं कसेंही असावें, सासुरवाडीकडे ह्याला नटून-सजून (नेटकें) गेलेंच पाहिजे, पैसे नसतील तर व्याजानें

॥ ३७ ॥ अंतर्भाव ते सासुरवाडीं । मायेबापें राहिलीं बापुडीं । होतातीं सर्वस्वें कुडकुडीं । तितुकेंच कार्य त्यांचें ॥ ३८ ॥ नोवरी आलियां घरा । अती हव्यास वाटे बरा । म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं ॥ ३९ ॥ मायबाप बंधु बहिणी । नोवरी न दिसतां वाटे काणी । अत्यंत लोधला पापिणी । अविद्येनें भुलविला ॥ ४० ॥ संभोग नस्तां इतुका प्रेमा । योग्य जालियां उलंघी सीमा । प्रीती वाढविती कामा । करितां प्राणी गुंतला ॥ ४१ ॥ जरी न देखे क्षण येक डोळां । तरी जीव होय उताविळा । प्रीतिपात्र अंतर्कळा । घेऊन गेली ॥ ४२ ॥ कोंवळे कोंवळे शब्द मंजुळ । मर्यादा लज्या मुखकमळ । वक्त्रलोकनें केवळ । ग्रामज्याचे मैंदावें ॥ ४३ ॥ कळवळा येतां सांवरेना । शरीर विकळ आवरेना । अनेत्र वेवसाई क्रमेना । हुरहुर वाटे ॥ ४४ ॥ वेवसाय करितां बाहेरी । मन लागलेंसे घरीं । क्षणक्षणां अभ्यांतरीं । स्मरण होये कामिनीचें ॥ ४५ ॥ तुम्ही माझिया जीवांतील जीव । म्हणौनि अत्यंत लाघव । दाऊनियां चित्त सर्व । हिरोन घेतलें ॥ ४६ ॥ मैंद सोइरीक काढिती । फांसे घालून प्राण घेती । तैसें आयुष्य गेलियां अंतीं । प्राणीयांस होये ॥ ४७ ॥ प्रीति कामिनीसीं लागली । जरी तयेसी कोणीं रागेजली । तरी परम क्षिती वाटली । मानसीं गुप्तरूपें ॥ ४८ ॥ तये भार्येचेनि कैवारें । मायेबापासीं नीच उत्तरें । बोलोनियां तिरस्कारें । वेगळा निघे ॥ ४९ ॥ स्त्रीकारणें लाज सांडिली । स्त्रीकारणें सखीं सोडिलीं । स्त्रीकारणें विघडिलीं । सकळहि जिवलगें ॥ ५० ॥ स्त्रीकारणें देह विकिला । स्त्रीकारणें सेवक जाला । स्त्रीकारणें सांडवला । विवेकासी ॥ ५१ ॥ स्त्रीकारणें लोलंगता । स्त्रीकारणें अतिनम्रता । स्त्रीकारणें

(कळांतरें) कर्ज काढलें पाहिजे. ओढा (अंतर्भाव) सारा सासुरवाडीकडे. बिचारे आई-बाप वस्त्रहीन कष्टी होऊन राहतात, पण आतां त्यांचें काय राहिलें. त्यांचें कार्य संपलें (३५–३८). बायको घरीं आली, संसाराचा हव्यास धरला, आतां माझ्यासारखा सभाग्य मीच असें ह्याला वाटूं लागलें. आई-बाप, बहीण-भाऊ सारीं तुच्छ (काणी) झालीं, अविद्येनें भुरळ घातल्यामुळें हा स्त्रीप्रेमांत गुरफटला गेला. संभोग झाला नाहीं तोंच हें प्रेम. संयोग झाल्यावर मग काय विचारतां ? सारी मर्यादा सुटली. अशा प्रकारें कामपाशांत हा सांपडला. स्त्री क्षणभर डोळ्यांपुढें दिसली नाहीं तर ह्याला खपत नाहीं. स्त्रीनें ह्याचें चित्त (अंतर्कळा) हिरोन नेलें. तिचे कोवळे मंजुळ शब्द, मर्यादा व लज्जा ह्यांच्या छटांनीं मोहक दिसणारें तिचें मुखकमळ, ह्यांच्यामुळें त्याची पशुवासना बळावली. तिचें प्रेम आवरत नाहीं, शरीर क्षीण होत चाललेलें धरवत नाहीं, अन्य व्यवसायांत चित्त रमत नाहीं, क्षणभर वियोग सोसत नाहीं असा हा कामुक बनला. कामानिमित्त बाहेर गेला तरी चित्त सारें घरीं. सर्वकाळ चिंतन कामिनीचें. ‘ तुम्ही माझे प्राणेश्वर ’ इ. आर्जवाचे (लाघव) शब्द बोलून तिनें ह्याचें मन हिरून नेलें. ठक लोक नसतीं नातीं जुळवून पाशांत अडकवून प्रवाशाचा प्राण घेतात, तसाच प्रकार आयुष्य संपल म्हणजे जीवांचा होतो. स्त्रीला कोणी रागानें दोन शब्द बोललें तर ह्याचा मनांत जळफळाट होतो, बायकोचा कैवार घेऊन हा आई-बापांना उणीं उत्तरें बोलून संतापानें वेगळा निघतो. स्त्रीसाठीं स्नेह व लाज सोडून हा साऱ्या जिवलगांशीं वांकडा होतो. स्त्रीला देह विकून हा कामांध तिचा दास बनतो, विवेकभ्रष्ट होतो. तिच्यापुढें लुटपुटतो, नम्र होतो. तिच्यासाठीं दुसऱ्याचा

पराधेनता । अंगिकारिली ॥ ५२ ॥ स्त्रीकारणें लोभी जाला । स्त्रीकारणें धर्म सांडिला । स्त्रीकारणें अंतरला । तीर्थयात्रा स्वधर्म ॥ ५३ ॥ स्त्रीकारणें सर्वथा कांहीं । शुभाशुभ विचारलें नाहीं । तनु मनु धनु सर्वही । अनन्यभावें अर्पिलें ॥ ५४ ॥ स्त्रीकारणें परमार्थ बुडविला । प्राणी स्वहितास नाडला । ईश्वरीं कानकोंडा जाला । स्त्रीकारणें कामबुद्धी ॥ ५५ ॥ स्त्रीकारणें सोडिली भक्ती । स्त्रीकारणें सोडिली विरक्ती । स्त्रीकारणें सायुज्य मुक्ती । तेहि तुच्छ मानिली ॥ ५६ ॥ येके स्त्रियेचेनि गुणें । ब्रह्मांड मानिलें ठेंगणें । जिवलगें तीं पिसुणें । ऐसीं वाटलीं ॥ ५७ ॥ ऐसी अंतरप्रीति जडली । सर्वस्वाची सांडी केली । तव ते मरोन गेली । अकस्मात भार्या ॥ ५८ ॥ तेणें मनीं शोक वाढला । म्हणे थोर घात जाला । आतां कैंचा बुडाला । संसार माझा ॥ ५९ ॥ जिवलगांचा सोडिला संग । अवचिता जाला घरभंग । आतां करूं मायात्याग । म्हणे दुःखें ॥ ६० ॥ स्त्री घेऊन आडवी । ऊर बडवी पोट बडवी । लाज सांडून गौरवी । लोकां देखतां ॥ ६१ ॥ म्हणे माझें बुडालें घर । आतां न करी हा मंसार । दुःखें आक्रंदला थोर । घोर घोषें ॥ ६२ ॥ तेणें जीव वारयावेघला । सर्वस्वाचा उबग आला । तेणें दुःखें जाला । जोगी कां माहात्मा ॥ ६३ ॥ कां तें निघोन जाणें चुकलें । पुन्हां मागुतें लग्न केलें । तेणें अत्यंतचि मग्न जालें । मन द्वितीय संमंधीं ॥ ६४ ॥ जाला द्वितीय संमंध । सर्वेंचि मांडिला आनंद । श्रोतीं व्हावें सावध । पुढिले समासीं ॥ ६५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणपरीक्षानाम समास दुसरा ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ द्वितीय संमंध जाला । दुःख मागील विसरला । सुख मानून राहिला । संसाराचें ॥ १ ॥ जाला अत्यंत कृपण । पोटें न खाय

ताबेदार होतो. स्वधर्म, तीर्थयात्रा, परमार्थ, स्वहित, शुभाशुभ वेळ हें कांहीं पाहत नाहीं; तन मन धन सर्व अनन्यभावानें तिला वाहतो. स्त्रीआसक्तीमुळें देवांकडेही लक्ष देत नाहीं. वैराग्य, भक्ति, मोक्ष, ह्यांवर तिच्यासाठीं पाणी सोडून ब्रह्मांड ठेंगणें मानतो. ह्याप्रमाणें चित्तांत स्त्रीची आसक्ति अपार वाढल्यामुळें ह्यानें सर्वस्वाची हानि केली. पण इतक्यांत ती स्त्रीही अकस्मात् मरण पावली (३९–५८). मग ह्याचा शोक काय विचारावा ? " थोर घात झाला, सारा संसार बुडाला, जिवलग दुरावले, अवचित माझें घर बुडालें, आतां देहत्यागच केला पाहिजे. " असा शोक करून स्त्रीचें प्रेत मांडीवर घेऊन ऊर बडवतो व लोकलाज सोडून तिचे गुण वर्णूं लागतो. " आतां पुन्हां संसारांत पडणार नाहीं " असें म्हणून मोठमोठ्यानें विलाप करतो त्या विरहदुःखामुळें त्याचा जीव वायुचक्रासारखा भ्रमण करूं लागून सर्वस्वाचा वीट (उबग) येऊन तो एक तर साधु बैरागी होऊन निघून जातो किंवा पुन्हां लग्न करून संसारगर्तेंत अधिकच खोल पडतो. द्वितीय संबंध करून आनंदानें संसारांत पडल्यावर पुढें काय प्रकार होतो तो पुढल्या समासांत पाहूं (५९–६५). [द० ३, स० २]

दुसरें लग्न झालें. हा मागील दुःख विसरून संसारीं सुख मानून राहिला. पूर्वी उधळ्या होता, दुसऱ्या संबंधानंतर

अन्न । रुक्याकारणें सांडी प्राण । येकसरा ॥ २ ॥ कदा कल्पांतीं न वेची । सांचिलेंचि पुन्हां सांची । अंतरीं असेल कैंची । सद्वासना ॥ ३ ॥ स्वयें धर्म न करी । धर्मकर्त्यासहि वारी । सर्वकाळ निंदा करी । साधुजनाची ॥ ४ ॥ नेणे तीर्थ नेणे व्रत । नेणे अतित अभ्यागत । मुंगीमुखींचें जें सीत । तेंहि वेंचून सांची ॥ ५ ॥ स्वयें पुण्य करवेना । केलें तरी देखवेना । उपहास करी मना । नये म्हणोनी ॥ ६ ॥ देवांभक्तांस उच्छेदी । आंगबळें सकळांस खेदी । निष्ठुर शब्दें अंतर भेदी । प्राणीमात्रांचें ॥ ७ ॥ नीति सांडूनिया मागें । अनीतीनें वर्तों लागे । गर्व धरूनियां फुगे । सर्वकाळ ॥ ८ ॥ पूर्वजांस सिंतरिलें । पक्षश्राद्धहि नाहीं केलें । कुळदैवतही ठकिलें । कोणेपरी ॥ ९ ॥ आक्षत भरिली भाणा । दुजा ब्राह्मण मेहुणा । आला होता पाहुणा । स्त्रियेसी मूळ ॥ १० ॥ कदा नावडे हरिकथा । देव नलगे सर्वथा । स्नानसंध्या म्हणे वृथा । कासया करावी ॥ ११ ॥ अभिलाषें सांची वित्त । स्वयें करी विश्वासघात । मदें मातला उन्मत्त । तारुण्यपणें ॥ १२ ॥ तारुण्य आंगीं भरलें । धारिष्ट नवचे धरिलें । करूं नये तेंचि केलें । माहापाप ॥ १३ ॥ स्त्री केली परी धाकुटी । धीर न धरवेचि पोटीं । विषयलोभें सेवटीं । वोळखी सांडिली ॥ १४ ॥ माय-बहिण न विचारी । जाला पापी परद्वारी । दंड पावला राजद्वारीं । तरी पालटेना ॥ १५ ॥ परस्त्री देखतांचि दृष्टीं । अभिलाष उठे पोटीं । अकर्तव्यें हिंपुटी । पुन्हां होये ॥ १६ ॥ ऐसें पाप उदंड केलें । शुभाशुभ नाहीं उरलें । तेणें दोषें दुःख भरलें । अकस्मात आंगीं ॥ १७ ॥ व्याधी भरली सर्वांगीं । प्राणी जाला क्षयरोगी । केले दोष आपुले भोगी । सीघ्र काळें ॥ १८ ॥ दुःखें सर्वांग फुटलें । नासिक अवघेंचि बैसलें । लक्षण जाऊन जालें । कुलक्षण ॥१९॥

कृपण झाला, लोभ वाढला, कवडीसाठीं प्राण टाकूं लागला. खर्चावयाला नको, सारी संचय करावयाचीच बुद्धि, धर्मवासना बुडाली, स्वतः धर्म न करितां धर्म करणाऱ्यांसही निवारूं लागला. मुंगीमुखींचें शीतही वेंचण्यापर्यंत तो नष्ट झाला. पुण्य-कर्में स्वतः करावयाचीं नाहींत, दुसऱ्यानें केलेलीं पाहावयाचीं नाहींत. पुण्यकर्मांचीच निंदा करूं लागला. देवा भक्तांना उडवणें, उन्मत्तपणानें निष्ठुर शब्दांनीं प्राणिमात्रांचा मर्मभेद करणें, पक्ष-श्राद्ध करणें सोडून पितरांस फसविणें, कुळधर्मत्याग हें सर्व करूं लागला. ब्राह्मण-सुवासिनी सांगावयाची पाळी आलीच तर बहिणीला (भाणा) जेवावयाचो अक्षत देणें म्ह० बोलावणें व स्त्रीला माहेरीं न्यायला तिचा भाऊ आलेला त्यालाच ब्राह्मण म्हणूनच समजणें, ह्याप्रमाणें देवांशीं वंचना करूं लागला. (१–१०). देवधर्म, हरिकथेची अनावड, द्रव्यसंचयाचा लोभ व त्यासाठीं विश्वासघात बेडरपणानें करून पुन्हां तारुण्यमदाची धुंदी ! इंद्रियजय होईना, करूं नये तें पाप केलें. बायको धाकटी म्हणून माय-बहिणींची ओळख विसरला. विषयकर्दमांत पापी रुतला. राजद्वारीं शिक्षा झाल्या तरी निर्लज्ज वर्तनांत फरक नाहीं. परस्त्री पाहिली कीं दुराचाराला प्रवृत्त होऊन दुष्कर्में केलीं व त्याबद्दल परोपरीचे दंड भोगून कष्टी झाला. शरीरांत नाना व्याधि उद्भवल्या, क्षयरोगानें पछाडला, सर्वांगावर व्याधी फुटली, नाक फुटून विद्रूप झाला, खंगला, सर्वांगीं कळा लागल्या, हात-पाय झडले, किडे पडले, लोक

देहास क्षीणता आली । नाना वेथा उद्भवली । तारुण्यशक्ती राहिली । खंगला प्राणी ॥ २० ॥ सर्वांगीं लागल्या कळा । देहास आली अवकळा । प्राणी कांपे चळचळां । शक्ति नाहीं ॥ २१ ॥ हस्तपादादिक झडले । सर्वांगीं किडे पडिले । देखोन थुंकों लागले । लहानथोर ॥ २२ ॥ जाली विष्टेची सारणी । भोंवती उठली वढांणी । अत्यंत खंगला प्राणी । जीव न वचे ॥ २३ ॥ आतां मरण दे गा देवा । बहुत कष्ट जाले जीवा । जाला नाहीं नेणों ठेवा । पातकाचा ॥ २४ ॥ दुःखें घळघळां रडे । जों जों पाहे आंगाकडे । तों तों दैन्यवाणें बापुडें । तळमळी जीवीं ॥ २५ ॥ ऐसे कष्ट जाले बहुत । सकळ जालें वाताहात । दरवडा घालून वित्त । चोरटीं नेलें ॥ २६ ॥ जालें आरत्र ना परत्र । प्रारब्ध ठाकलें विचित्र । आपला आपण मळमूत्र । सेविला दुःखें ॥ २७ ॥ पापसामग्री सरली । दिवसेंदिवस वेथा हरली । वैद्यें औषधें दिधलीं । उपचार जाला ॥ २८ ॥ मरत मरत वांचला । यास पुन्हां जन्म जाला । लोक म्हणती पडिला । माणसांमधें ॥ २९ ॥ येरें स्त्री आणिली । पुन्हां घरवात मांडिली । अति स्वार्थबुद्धी धरिली । पुन्हां मागुती ॥ ३० ॥ कांहीं वैभव मेळविलें । पुन्हां सर्वही संचिलें । परंतु गृह बुडालें । संतान नाहीं ॥ ३१ ॥ पुत्रसंतान नस्तां दुःखी । वांज नांव पडिलें लौकिकीं । तें न फिटे म्हणोनी लेंकी । तरी तो आतां ॥ ३२ ॥ म्हणोन नाना सायास । बहुत देवांस केले नवस । तीर्थें व्रतें उपवास । धरणीपारणीं मांडिलीं ॥ ३३ ॥ विषयसुख तें राहिलें । वांजपणें दुःखी केलें । तव तें दैवत पावलें । जाली वृद्धी ॥ ३४ ॥ त्या लेंकुरावरी अति प्रीती । दोघेंहि क्षण येक न विसंभती । कांहीं जाल्यां आक्रंदती । दीर्घस्वरें ॥ ३५ ॥ ऐसी

तोंडावर थुंकूं लागले. अन्नपचन होईनासें झाल्यामुळें अतिसार झाला, भोंवतीं दुर्गंधी (वढांणी) सुटली, प्राण जाईना तेव्हां देवापाशीं मरण मागूं लागला. देहाकडे पाहून ढळढळां रडूं लागला. सारें वाताहत झालें. चोरट्यांनीं दरवडा घालून वित्तही नेलें. ना स्वार्थ ना परमार्थ. प्रारब्धाची विचित्र कळा. आपलें मळ-मूत्र आपणच सेवूं लागला! (११–२७). (हजारों प्राण्यांची इतिश्री येथेंच होते.) पण हा ह्यांतून वांचला. पापसामुग्री सरल्यामुळें वैद्याचे उपचार यथायोग्य होऊन हा मरतां-मरतां वांचला, पुनर्जन्म झाला, पुन्हां माणसांत येऊन पडला. माहेराहून बायको आणली. छान प्रपंच थाटला. अतिस्वार्थबुद्धीनें पुन्हां पैसे मिळविले. पण 'पोटीं संतान नाहीं' हेंच दुःख करूं लागला. लोक वांझड म्हणतात तर मुलगी तरी होवो असें त्यास होऊन गेलें. पोरासाठीं नवस, धरणें-पारणें, व्रतें-उपवास सर्व करूं लागला. वांझपणाचें दुःखही फिटलें. कुळदेव प्रसन्न होऊन वंशाची वृद्धि झाली. लेंकरावर दोघांची अति प्रीति जडली, त्याला त्यांनीं क्षणही विसंबूं नये, त्याला जरा कांहीं झालें कीं ह्यांनीं मोठा शोक करावा (२८–३५). पोर जगावें म्हणून ते नाना दैवतें पूजूं लागले, पण तें पोर आपल्या

ते दुःखिस्ते । पूजीत होती नाना दैवतें । तव तेंही मेलें अवचितें । पूर्वपापेंकरूनी ॥ ३६ ॥ तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरंधें पडिलें । म्हणती आम्हांस कां ठेविलें । देवें वांज करूनी ॥ ३७ ॥ आम्हांस द्रव्य काये करावे । तें जावें परी अपत्य व्हावें । अपत्यालागीं त्यजावें । लागेल सर्व ॥ ३८ ॥ वांजपण संदिसें गेलें । तों मरतवांज नांव पडिलें । तें न फिटे कांहीं केलें । तेणें दुःखें आक्रंदती ॥ ३९ ॥ आमुची वेली कां खुंटिली । आहा देवा वृत्ती बुडाली । कुळस्वामीण कां क्षोभली । विझाला कुळदीप ॥ ४० ॥ आतां लेंकुराचें मुख देखेन । तरी आनंदें राडीं चालेन । आणी गळही टोंचीन । कुळस्वामिणीपासीं ॥ ४१ ॥ आई भुता करीन तुझा । नांव ठेवीन केरपुंजा । वेसणी घालीन माझा । मनोरथ पुरवीं ॥ ४२ ॥ बहु देवांस नवस केले । बहुत गोसावी धुंडिले । गटगटां गिळिले । सगळे विंचु ॥ ४३ ॥ केले समंधाचे सायास । राहाणें घातलें बहुवस । केळें नारिकेळें ब्राह्मणास । आम्रदानें दिधलीं ॥ ४४ ॥ केलीं नाना कवटालें । पुत्रलोभें केलीं ढालें । तरी अदृष्ट फिरलें । पुत्र नाहीं ॥ ४५ ॥ वृक्षाखालें जाऊन नाहाती । फळतीं झाडें करपती । ऐसे नाना दोष करिती । पुत्रलोभाकारणें ॥ ४६ ॥ सोडून सकळ वैभव । त्यांचा वारयावेघला जीव । तव तो पावला खंडेराव । आणी कुळस्वामिणी ॥ ४७ ॥ आतां मनोरथ पुरती । स्त्रीपुरुषें आनंदती । सावध होऊन श्रोतीं । पुढें अवधान द्यावें ॥ ४८ ॥

इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणपरीक्षानाम समास तृतीय ॥ ३ ॥

पूर्वपापानें अकस्मात् मेलें. घर ओस झालें. मोठा शोक केला. “देवा! आम्हांस वांझ कां केलेंस ? अपत्य दे. त्यासाठीं सर्वस्व गेलें तरी चालेल. आतां लोक मरतवांझ म्हणूं लागले आहेत. अहा देवा! आमची वृत्ति बुडावयाची वेळ आली आहे. वंशवेली खुंटली. आमचा कुळदीप (मूल) विझाला! आतां लेंकरूं होईल तर मी निखाऱ्यांवरून (राडी) चालत जाईन व जय कुळस्वामिणी, मी तुझ्यापुढें गळहो टोंचून घेईन. मी आपल्या मुलाला तुझा सेवक (भुत्या) करून तुला वाहीन, त्याचें नांव केरपुंजा ठेवीन, त्याच्या नाकांत नथणी घालीन, पण मला एकदां मुलगा दे.” असो. असे नवस आणिक दैवतांस केले, गोसावी शोधले, सबंध विंचू गटगटां गिळिले, समंध पूजिले, अंगांत दैवत (राहणें) घातलें, ब्राह्मणांना केळीं, नारळ, आंबे ह्यांचीं वायनें दिलीं. अशीं नानाविध जादु-टोणा वगैरे (कौटाळें) व व्रताभिषेकादि (ढाळें) पुत्रलोभासाठीं केलीं, पण दुर्दैवानें पुत्र झाला नाहीं. झाडाखालीं अमावास्येच्या मध्यरात्रीं जाऊन नग्न स्नानें केलीं त्यामुळें फळतीं झाडेंही करपलीं. पुत्रलोभासाठीं अशीं अनेक पातकें केलीं. सर्व वैभवांविषयीं ते उदासीन झाले, त्यांचा जीव वाऱ्यावर टांगल्यासारखा झाला. शेवटीं एकदाचा खंडेराव पावला, कुळस्वामिणीही पावली. त्यांचे मनोरथ पुरले, स्त्री-पुरुष कांहीं काळ आनंदांत संसार करूं लागलीं (३६–४८). [द० ३, स० ३]

॥ श्रीराम ॥ लेंकुरें उदंड जालीं । तों लक्ष्मी निघोन गेली । बापडीं भिकेसी लागलीं । खावया अन्न मिळेना ॥ १ ॥ लेंकुरें खेळती धाकुटीं । येकें रांगती येकें पोटीं । ऐसी घरभरी जाली दाटी । कन्या आणी पुत्रांची ॥ २ ॥ दिवसेंदिवस खर्च वाढला । यावा होता तो खुंटोन गेला । कन्या उपवरी जाल्या त्यांला । उजवावया द्रव्य नाहीं ॥ ३ ॥ मायेबापें होतीं संपन्न । त्यांचें उदंड होतें धन । तेणें करितां प्रतिष्ठा मान । जनीं जाला होता ॥ ४ ॥ भरम आहे लोकाचारीं । पहिली नांदणूक नाहीं घरीं । दिवसेंदिवस अभ्यांतरीं । दरिद्र आलें ॥ ५ ॥ ऐसी घरवात वाढली । खातीं तोंडें मिळालीं । तेणें प्राणीयांस लागली । काळजी उद्वेगाची ॥ ६ ॥ कन्या उपवरी जाल्या । पुत्रांस नोवऱ्या आल्या । आतां उजवणा केल्या । पाहिजेत कीं ॥ ७ ॥ जरी मुलें तैसींच राहिलीं । तरी पुन्हा लोकलाज जाली । म्हणती कासया व्याली । जन्मदारिद्रें ॥ ८ ॥ ऐसी लोकलाज होईल । वडिलांचें नांव जाईल । आतां रुण कोण देईल । लग्नापुरतें ॥ ९ ॥ मागें रुण ज्याचें घेतलें । त्याचें परतोन नाहीं दिल्हें । ऐसें आभाळ कोसळलें । उद्वेगाचें ॥ १० ॥ आपण खातों अन्नासी । अन्न खातें आपणांसी । सर्वकाळ मानसीं । चिंतातुर ॥ ११ ॥ पती अवघीच मोडली । वस्तभाव गाहाण पडिली । अहा देवा वेळ आली । आतां दिवाळ्याची ॥ १२ ॥ कांहीं केला ताडामोडा । विकिला घरींचा पाडारेडा । कांहीं पैका रोकडा । कळांतरें काढिला ॥ १३ ॥ ऐसें रुण घेतलें । लोकिकीं दंभ केलें । सकळ म्हणती नांव राखिलें । वडिलांचें ॥ १४ ॥ ऐसें रुण उदंड जालें । रिणाइतीं वेढून घेतलें । मग प्रयाण आरंभिलें । विदेशाप्रती ॥ १५ ॥ दोनी वरुषें बुडी मारिली । नीच सेवा अंगीकारिली । शरीरें आपदा भोगिली । अतिशयेंसीं ॥ १६ ॥ कांहीं मेळविलें विदेशीं । जीव लागला मनुष्यांपासीं । मग

मुलें व्हावयाला लागलीं तेव्हां पुष्कळ झालीं, पण इतक्यांत योग असा आला कीं द्रव्य संपून बापडीं भिकेला लागलीं. त्यांना पोटभर खावयालाही मिळेना. कांहीं पोटीं, कांहीं पाठीं, कांहीं खेळतीं अशी घरभर मुलां-मुलींची गर्दी झाली. खर्च वाढला, मिळकत (यावा) कमी झाली. कन्या उपवर झाल्या. त्यांच्या लग्नाला पैसा जवळ नाहीं. वडिलांच्या वेळीं घरीं संपत्ति पुष्कळ होती तेव्हांच्या लौकिकाचा लोकांत भ्रम मात्र होता, पण तेव्हांची राहणी राहिली नाहीं. आंत दारिद्र्य शिरलें. घरप्रपंच वाढला, खातीं तोंडें एकत्र मिळालीं, तेव्हां काळजी लागून राहिली. सुना सांगून आल्या, जांवई धुंडणें अवश्य झालें, ह्या साऱ्या लग्नांना पैसे तर पाहिजेत, नाहीं तर "जन्मदरिद्री हीं, ह्यांनीं इतकीं पोरें कशाला करून ठेविलीं" असें म्हणावयाला लोक कमी करावयाचे नाहींत! वडिलांचें नांव जाईल हा लोकापवादाची भीति मारूं लागली. आतां कर्ज कोण देणार ही चिंता. मागचें कर्ज फिटलें नाहीं त्यामुळें पत कमी झालेली, वस्तभाव गहाण पडून दिवाळें निघण्याची वेळ आलेली; त्यांत लग्नकार्यें व्हावयाचीं कशीं? अन्न गोड लागेना, उद्वेगाचें आभाळ फाटलें. कांहीं मोडतोड केली, गुरें-ढोरें विकलीं, कांहीं कर्ज काढून कार्यें थाटांत केलीं, वडिलांचें नांव राखिलें! (१–१४) असें कर्ज वाढतच चाललें तेव्हां सावकारांचे तगादे सुरू झाले म्हणून देशांतर केलें. दोन वर्षें तोंड चुकविलें, परदेशीं हलकीं कामें केलीं, शरीरकष्ट फार सोसावे लागले.

पुसोनियां स्वामीसी । मुरडता जाला ॥ १७ ॥ तव तें अत्यंत पीडावलीं । वाट पाहों बैसलीं । म्हणती दिवसगती कां लागली । काय करणें देवा ॥ १८ ॥ आतां आम्ही काये खावें । किती उपवासीं मरावें । ऐसियाचे संगतीस देवें । कां पां घातलें आम्हांसी ॥ १९ ॥ ऐसें आपुलें सुख पाहाती । परी त्याचें दुःख नेणती । आणी शक्ति गेलिया अंतीं । कोणीच कामा न येती ॥ २० ॥ असो ऐसी वाट पाहतां । दृष्टीं देखिला अवचिता । मुलें धांवती ताता ताता । भागलासी म्हणौनी ॥ २१ ॥ स्त्री देखोन आनंदली । म्हणे आमचीं दैन्यें फिटलीं । तंव येरें दिधली । गांठोडी हातीं ॥ २२ ॥ सकळांस आनंद जाला । म्हणती आमुचा वडील आला । तेणें तरी आम्हांला । आंग्या टोप्या आणिल्या ॥ २३ ॥ ऐसा आनंद च्यारी दिवस । सवेंच मांडिली कुसमुस । म्हणती हें गेलियां आम्हांस । पुन्हां आपदा लागती ॥ २४ ॥ म्हणौनी आणिलें तें असावें । येणें मागुतें विदेशास जावें । आम्ही हें खाऊं न तों यावें । द्रव्य मेळऊन ॥ २५ ॥ ऐसी वासना सकळांची । अवघीं सोइरीं सुखाचीं । स्त्री अत्यंत प्रीतीची । तेही सुखाच लागली ॥ २६ ॥ विदेसीं बहु दगदगला । विश्रांति घ्यावया आला । स्वासहि नाहीं टाकिला । तों जाणें वोढवलें ॥ २७ ॥ पुढें अपेक्षा जोसियांची । केली विवंचना मुहूर्ताची । वृत्ति गुंतली तयाची । जातां प्रशस्त न वाटे ॥ २८ ॥ मायामात्रा सिद्ध केली । कांहीं सामग्री बांधली । लेंकुरें दृष्टीस पाहिलीं । मार्गस्त जाला ॥ २९ ॥ स्त्रियेसी अवलोकिलें । वियोगें परम दुःख वाटलें । प्रारब्धसूत्र तुटलें । रुणानुबंधाचें ॥ ३० ॥ कंठ सद्गदित जाला । न सांवरेच गहिंवरला । लेंकुरां आणी पितयाला । तडातोडी जाली ॥ ३१ ॥ जरी रुणानुबंध असेल । तरी मागुती भेटी होईल । नाहीं तरी संगती पुरेल । येचि भेटीनें

चार पैसे हातांत येतांच घरच्या माणसांकडे जीव ओढला. धन्याला विचारून परत स्वदेशीं आला (१५–१७). घरीं येऊन पाहतो तों घरचीं माणसें फार आपदा भोगून वाट पाहत बसलीं होतीं. "देवा! इतके दिवस कां लागले बरें? आम्ही किती उपासमार सोसावी? अशा करंट्याच्या संगतीला आम्हांला कां घातलेंस रे!" ह्याप्रमाणें तीं आपलेंच सुख पाहत होतीं, पण त्याच्या दुःखाची जाणीव कोणाला होती? शरीर थकलें कीं कोणी कामाला येत नाहीं (१८–२०). असो. वाट पाहतां-पाहतां एकदाची स्वारी आली. स्त्रीला आनंद झाला. आंगड्या-टोपड्या आणल्या म्हणून मुलें सभोंवतीं बागडलीं. चार दिवस आनंद झाला. तों हें संपलें म्हणजे काय खावयाचें ह्या विचारानें कुरकुर सुरू झाली. ह्यानें आणलें आहे तें येथें ठेवून परदेशीं पुन्हां जावें व हें आम्हीं खाऊन संपण्यापूर्वी आणखी द्रव्य मिळवून आणावें, ही स्त्रीसुद्धां सर्वांची इच्छा. सारीं सुखाचीं सोयरीं हेंच खरें. विदेशीं कष्ट करून विश्रांति घ्यावयाला घरीं आला तों पुन्हां जाणें प्राप्त झालें. ज्योतिष्याला पुसून प्रयाणाचा मुहूर्तही पाहिला, पण ह्याचें घरीं गुंतलेलें मन ह्याला बाहेर पाऊल टाकूं देईना. पडशी सिद्ध केली, कांहीं सामानसुमान घेतलें. डोळे भरून लेंकरांकडे पाहिलें, मार्गाला लागला. स्त्रीकडे पाहिलें, वियोगदुःख वाटलें. प्रारब्धाचें सूत्र तुटलें. इतकाच ऋणानुबंध होता त्यास उपाय काय? गळा भरून आला, गहिंवरला, बाप-लेंकरांची ताटातूट झाली. "ऋणानुबंध असेल तर पुन्हां भेट होईल नाहीं तर हीच शेवटची भेट." असें बोलून निघाला. फिरफिरून मार्गी

तुमची ॥ ३२ ॥ ऐसें बोलोन स्वार होये । मागुता फीरफिरों पाहे । वियोग-दुःख न साहे । परंतु कांहीं न चले ॥ ३३ ॥ आपुला गांव राहिला मागें । चित्त भ्रमलें संसारउद्वेगें । दुःखवला प्रपंचसंगें । अभिमानास्तव ॥ ३४ ॥ ते समई माता आठवली । म्हणे धन्य धन्य ते माउली । मजकारणें बहुत कष्टली । परी मी नेणेंचि मूर्ख ॥ ३५ ॥ आजी जरी ते असती । तरी मजला कदा न विसंभती । वियोग होतां आक्रंदती । ते पोटागि वेगळीच ॥ ३६ ॥ पुत्र वैभवहीन भिकारी । माता तैसाचि अंगिकारी । दगदगला देखोनि अंतरीं । त्याच्या दुःखें दुःखवे ॥ ३७ ॥ प्रपंच विचारें पाहातां । हें सकळ जोडे न जोडे माता । हें शरीर जयेकरितां । निर्माण जालें ॥ ३८ ॥ लांव तरी ते माया । काय कराव्या सहस्र जाया । परी भुलोन गेलों वायां । मकरध्वजाचेनी ॥ ३९ ॥ या येका कामाकारणें । जिवलगांसिं द्वंद घेणें । सखीं तींच पिसुणें । ऐसीं वाटतीं ॥ ४० ॥ म्हणौन धन्य धन्य ते प्रपंची जन । जे मायेबापाचें भजन । करिती न करिती मन । निष्ठुर जिवलगांसीं ॥ ४१ ॥ संगती स्त्रीबाळकाची । आहे साठी जन्माची । परी मायेबापें कैंचीं । मिळतील पुढें ॥ ४२ ॥ ऐसें पूर्वीं होतें ऐकिलें । परी ते समई नाहीं कळलें । मन हें बुडोन गेलें । रतिसुखाचे डोहीं ॥ ४३ ॥ हे सखीं वाटतीं परी पिसुणें । मिळालीं वैभवाकारणें । रितें जातां लाजिरवाणें । अत्यंत वाटे ॥ ४४ ॥ आतां भलतैसें करावें । परि द्रव्य मेळऊन न्यावें । रितें जातां स्वभावें । दुःख आहे ॥ ४५ ॥ ऐसी वेवर्धना करी । दुःख वाटलें अंतरीं । चिंतेचिये माहापुरीं । बुडोन गेला ॥ ४६ ॥ ऐसा हा देह आपुला । असतांच पराधेन

पाहूं लागला. वियोगदुःख अनावर झालें पण उपाय नाहीं. गांव मागें राहिला. संसारभ्रमानें चित्त भ्रमलें. देहगेहाभिमानामुळें प्रपंचसंगानें विषण्ण झाला (२१–३४). त्या वेळीं आईचें स्मरण झालें. "धन्य माझी आई. मजसाठीं तिनें फार कष्ट सोसले, पण म्यां मूर्खानें ते जाणले नाहींत. ती आज हयात असती तर मुलींच दूर जाऊं देती ना. माझा वियोग होतांच तिनें हंबरडा फोडला असता. तो पोटजाळ कांहीं निराळाच खरा. भिकारी दरिद्री मुलगा असला तरी मातेला आवडतोच, त्याचे कष्ट पाहून तिला अपार दुःख होतें. प्रपंचाचा विचार पाहिला तर हें सारें मिळेल पण हें नरशरीर जिच्यापासून मिळालें ती आई पुन्हां मिळावयाची नाहीं. कजाग असली तरी आई ती आईच. हजार बायका घेऊन काय करावयाचें आहे ? पण मी कामलंपट होऊन वायां गेलों. एका कामासाठीं जिवलगांशीं भांडलों. खरे मित्र होते त्यांनाच शत्रु करून बसलों. म्हणून प्रपंचांत ते पुरुष धन्य कीं जे माय-बापांचें भजन करितात व जिवलगांशीं कठोरपणानें वागत नाहींत ! स्त्री-बाळकांची संगत जन्माची आहे, पण आई-बाप पुन्हां मिळावयाचे नाहींत. हें सारें पूर्वीं ऐकत होतों, पण हें उमजावयाला पाहिजे होतें तेव्हां उमजलें नाहीं. मन रतिसुखाच्या डबक्यांत बुडून आंधळा झालों. पुत्रकलत्रादि जीवाचे जिवलग वाटतात, पण हीं सारीं ठक आहेत, वैभवासाठीं एकत्र मिळालीं आहेत. असो. बाहेर पडलोंच आहोंत तर चार पाट्या कोठेंतरी टाकून द्रव्य मिळवूनच घरीं जावें हें बरें, नाहींतर लोकांत फजिती होऊन दुःखाला तें कारण होईल" असे विचार मनांत येऊन त्याला दुःख झालें व तो चिंतेच्या महापुरांत बुडून गेला (३५–४६). देह आपला असून ह्याप्रमाणें तो त्यानें पराधीन केला व ईश्वराला विमुख

केला । ईश्वरीं कानकोंडा जाला । कुटुंबकाबाडी ॥ ४७ ॥ या येका कामासाठीं । जन्म गेला आटाटीं । वय वेंचल्यां सवटीं । येकलेंचि जावें ॥ ४८ ॥ ऐसा मनीं प्रस्तावला । क्षण एक उदास जाला । सवेंचि प्राणी झळंबला । मायाजाळें ॥ ४९ ॥ कन्यापुत्रें आठवलीं । मनीहुनि क्षिती वाटली । म्हणें लेंकुरें अंतरलीं । माझीं मज ॥ ५० ॥ मागील दुःख आठवलें । जें जें होतें प्राप्त जालें । मग रुदन आरंभिलें । दीर्घ स्वरें ॥ ५१ ॥ अरण्यरुदन करितां । कोणी नाहीं बुझाविता । मग होये विचारिता । आपुले मनीं ॥ ५२ ॥ आतां कासया रडावें प्राप्त होतें तें भोगावें । ऐसें बोलोनियां जीवें । धारिष्ट केलें ॥ ५३ ॥ ऐसा दुःखें दगदगला । मग विदेशाप्रती गेला । पुढें प्रसंग वर्तला । तो सावध ऐका ॥ ५४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे सगुणपरीक्षानाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ पुढें गेला विदेशासी । प्राणी लागला व्यासंगासी । आपल्या जीवेसीं सोसी । नाना श्रम ॥ १ ॥ ऐसा दुस्तर संसार । करितां कष्टला थोर । पुढें दोनी च्यारी संवत्सर । द्रव्य मेळविलें ॥ २ ॥ सवेंचि आला देशासी । तों आवर्षण पडिलें देसीं । तेणें गुणें मनुष्यांसीं । बहुत कष्ट जाले ॥ ३ ॥ येकांच्या बैसल्या अमृतकळा । येकांस तंद्री लागली डोळां । येकें कांपतीं चळचळां । दैन्यवाणीं ॥ ४ ॥ येकें दीनरूप बैसलीं । येकें सुजलीं येकें मेलीं । ऐसीं कन्या पुत्रें देखिलीं । अकस्मात डोळां ॥ ५ ॥ तेणें बहुत दुःखी जाला । देखोनियां उभड आला । प्राणी आक्रंदों लागला । दैन्यवाणा ॥ ६ ॥ तंव तीं अवघीं सावध जालीं । म्हणती बाबा बाबा जेऊं घालीं । अन्नालागीं मिडकलीं । झडा

होऊन कुटुंबाचा ताबेदार झाला. एका कामामुळें त्याचा जन्म कष्टांत (आटाटी) गेला. आयुष्य संपल्यावर जीवाला शेवटीं एकट्यालाच सर्व सांडून जावें लागतें, असा तो पस्तावून क्षणभर उदास झाला. पण पुन्हां मायाजाळांत गुरफटला गेला. कन्या-पुत्रांचें स्मरण होऊन मनांत दुःखी झाला, लेंकरें अंतरल्याचा खेद वाटला. मागें भोगलेलीं सर्व दुःखें आठवून मोठमोठ्यानें रडला, पण 'अरण्यांत रुदन केलें तरी समजूत पाडण्यास कोण येणार? रडून उपयोग काय?' असा मनाशीं विचार करून जीवाचा धडा केला. दुःखानें दगदगलेल्या त्या जीवाचें परदेशांत पुढें काय झालें तें ह्यापुढें सांगण्यांत येईल (४७–५४). [द० ३, स० ४]

पुढें तो परदेशांत जाऊन उद्योगधंद्याला लागला व हर तऱ्हेचे कष्ट घेऊन चार दोन-वर्षें जीवापाड मेहनत करून द्रव्य मिळविलें व लगेच स्वदेशीं परत आला. आपल्या गांवीं येऊन पाहतो तों साऱ्या देशांत अवर्षण पडल्यामुळें घरचीं माणसें अत्यंत हालांत होतीं, एकाचीं गालफडें बसलीं होतीं, एकाचे डोळे फिरले होते, एकाला दीनपणामुळें चळकांप सुटला होता, कोणाचें अंग सुजलें होतें, कोणी मेलें होतें, असा तो कन्या-पुत्रांचा भयानक देखावा त्यानें पाहिला. दुःखानें त्याचा कंठ भरून आला व दीन होऊन तो ओक्साबोक्शीं रडूं लागला (१–६). कांहीं वेळानें मुलें शुद्धीवर आलीं व 'बाबा, जेवूं घाला' म्हणून म्हणूं लागलीं. अन्नासाठीं तीं हपापलींच होतीं. हावरेपणानें

घालिती ॥ ७ ॥ गांठोडें सोडून पाहाती । हातां पडिलें तेंचि खाती । कांहीं तोंडीं कांहीं हातीं । प्राण जाती निघोनी ॥ ८ ॥ तांतडी तांतडी जेऊं घाली । तों तें जेवितां जेवितां कांहीं मेलीं । कांहीं होतीं धादावलीं । तेंहि मेलीं अजीर्णें ॥ ९ ॥ ऐसीं बहुतेकें मेलीं । येक दोनी मुलें उरलीं । तेंहि दैन्यवाणीं जालीं । आपले मातेवांचुनी ॥ १० ॥ ऐसें आवर्षण आलें । तेणें घरचि बुडालें । पुढें देसीं सुभिक्ष जालें । आतिशयेंसी ॥ ११ ॥ लेंकुरां नाहीं वाढवितें । अन्न करावें आपुले हातें । बहु त्रास घेतला चित्तें । स्वयंपाकाचा ॥ १२ ॥ लोकीं भरीस घातलें । पुन्हां मागुतें लग्न केलें । द्रव्य होतें तें वेचलें । लग्नाकारणें ॥ १३ ॥ पुन्हां विदेशासी गेला । द्रव्य मेळऊन आला । तंव घरीं कळहो लागला । सावत्र पुत्रांसी ॥ १४ ॥ स्त्री जाली न्हातीधुती । पुत्र देखों न सकती । भ्रताराची गेली शक्ती । वृद्ध जाला ॥ १५ ॥ सदा भांडण पुत्रांचें । कोणी नायकती कोणाचें । वनिता अत्यंत प्रीतीचें । प्रीतिपात्र ॥ १६ ॥ किंत बैसला मना । येके ठाईं पडेना । म्हणोनियां पांचा जणा । मेळविलें ॥ १७ ॥ पांच जण वांटे करिती । तों ते पुत्र नायेकती । निवाडा नव्हेचि अंतीं । भांडण लागलें ॥ १८ ॥ बापलेंका भांडण जालें । लेकीं बापास मारिलें । तंव ते मातेनें घेतलें । शंखतीर्थ ॥ १९ ॥ ऐकोनि मिळाले लोक । उभे पाहाती कौतुक । म्हणती बापास लेक । कामा आले ॥ २० ॥ ज्या कारणें केले नवस । ज्या कारणें केले सायास । ते पुत्र पितयास । मारिती पाहा ॥ २१ ॥ ऐसी आली पापकळी । आश्चर्य मानिलें सकळीं । उभे तोडिती कळी । नगरलोक ॥ २२ ॥ पुढें बैसोन पांच जण । वांटे केले तत्समान । बापलेकांचें भांडण । तोडिलें तेहीं ॥ २३ ॥ बापास वेगळें घातलें ।

त्यांनीं बापाचें गांठोडें सोडलें व जें हातीं आलें तेंच खाऊं लागलीं. एक घांस हातांत व एक तोंडांत अशांतच कांहींचे प्राण गेले. तो घाईघाईनें मुलांना जेवूं घालूं लागला तेव्हां कांहीं जेवतां-जेवतांच मेलीं व कांहीं धादावलीं होतीं तीं अजीर्ण होऊन मेलीं. ह्याप्रमाणें बहुतेक मुलें मेलीं. एक दोन राहिलीं तीं आई नाहीं म्हणून दीनवाणीं झालीं. ह्याप्रमाणें अवर्षणानें त्याचें घर बुडालें. असो. पुढें पाऊस पाणी होऊन देशांत सुबत्ता झाली (७–११). आतां लेंकरांचें संगोपन करावयाला घरांत कोणी नाहीं, ह्याला हातानें स्वयंपाक करावा लागला. हा त्याला कंटाळला. लोकांनींही भर दिली. पुन्हां लग्न केलें व त्यापायीं आणलेलें द्रव्य सारें खर्चून गेलें. पुन्हां चार वर्षें परदेशांत गेला, पैसे मिळवून आणले, इतक्यांत घरांत सावत्र आई व तिच्याच वयाचीं मुलें ह्यांचे तंटे होऊं लागले. बायको वयांत आलेली; मुलांचें तिचें बिनसलेलें, ह्याची शक्ति जाऊन हा वृद्ध झालेला. रोज घरांत भांडणें, बायको आवडीची. उभयपक्षीं मनांत अढी (किंतु) बसली. एकत्र पटेना म्हणून चार शेजारी बोलावून वांटण्या केल्या. मुलें ऐकेनात. निकाल न होतां भांडण लागलें. लेकांनीं बापाला मारलें तेव्हां आईनें शंखवाद्य सुरू केलें! लोक तमाशा पाहूं लागले. "बापाला म्हातारपणीं लेक चांगले उपयोगीं पडले!" असें लोक म्हणूं लागले. ज्या लेकरांसाठीं नवस-सायास केले तेच बापास म्हातारपणीं मारतात पाहा! काय आश्चर्य तरी! असें म्हणत

जाचणी । मांगिजेल पुढें ॥ ५६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सगुणपरीक्षा नाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ तापत्रयाचें लक्षण । आतां सांगिजेल निरूपण । श्रोतीं करावें श्रवण । येकाग्र होऊनी ॥ १ ॥ जो तापत्रयीं पोळला । तो संतसंगें निवाला । आर्तभूत तोषला । पदार्थ जेवी ॥ २ ॥ क्षुधाक्रांतासी मिळे अन्न । तृषाक्रांतासी जीवन । बंदीं पडिल्याचें बंधन । तोडितां सुख ॥ ३ ॥ माहापुरें जाजावला । तो पैलतीरास नेला । कां तो स्वप्नींचा चेइला । स्वप्नदुःखी ॥ ४ ॥ कोणी येकासी मरण । येतां दिलें जीवदान । संकटासी निवारण । तोडितां सुख ॥ ५ ॥ रोगियास औषध । सप्रचित आणि शुद्ध । तयासी होय आनंद । आरोग्य होतां ॥ ६ ॥ तैसा संसारें दुःखवला । त्रिविधतापें पोळला । तोचि येक अधिकारी जाला । परमार्थासी ॥ ७ ॥ ते त्रिविध ताप कैसे । आतां बोलिजेती तैसे । येविषईं येक असे । वाक्याधार ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥ देहेंद्रियमनःप्राणैः सुखं दुःखं यदाप्यते ।
इममाध्यात्मिकं तापं विजानीयाद्धि देहिनाम् ॥ १ ॥

सर्वभूतैर्देहयोगात् सुखं दुःखं यदाप्यते ।
द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ २ ॥

शुभाशुभैः कर्मभिश्च देहांते यमयातना ।
स्वर्नरकादि भोक्तव्यमिदं विद्धयाधिदैविकम् ॥ ३ ॥

येक ताप आध्यात्मिक । दुजा तो आधिभौतिक । तिसरा आधिदैविक । ताप जाणावा ॥ ९ ॥ आध्यात्मिक तो कोण । कैसी त्याची वोळखण । आधिभौतिकाचें लक्षण । जाणिजे कैसें ॥ १० ॥ आधिदैविक तो कैसा । कवण तयाची दशा । हेंहि विशद कळे ऐसा । विस्तार कीजे ॥ ११ ॥ हां जी म्हणोनि वक्ता । जाला कथा विस्तारिता । आध्यात्मिक ताप आतां । सावध ऐका ॥ १२ ॥

यातायात टळत नाहीं. जन्मापासून मरणापर्यंत जीवांना जे अनंत क्लेश भोगावे लागतात त्यांची त्रिविधतापवर्णनरूपानें आतां संपूर्ण कथा सांगतों (५२–५६). [द० ३, स० ५]

तापत्रयाचें लक्षण सांगतों तें सावधानपणानें ऐका. आशाळभूताला (आर्तभूत) त्याचा इष्ट पदार्थ मिळाला कीं जसा तो संतोष पावतो, त्याप्रमाणें तापत्रयानें पोळून निघालेला मनुष्य शेवटीं सत्संगतींत आराम पावतो. भुकेल्यास अन्न, ताहनेल्यास उदक, बंदिस्तास स्वातंत्र्य, बुडत्यास पैलतीर, स्वप्नदुःखितास जागृति, आसन्नमरणास जीवदान, संकटग्रस्तास मुक्तता, रोग्यास प्रचीतीचें व शुद्ध औषध ह्याप्रमाणें ज्याला जेव्हां जें पाहिजे त्याला तेव्हां तें मिळाल्यानें जसा अत्यंत आनंद होतो त्याप्रमाणेंच तापत्रयसंतप्तास सत्संगतीपासून परमानंद प्राप्त होतो. संसारदुःखानें व तापत्रयानें जो पोळला जातो तोच परमार्थाचा अधिकारी होतो (१–७). असो. आतां तापत्रयाचीं लक्षणें ग्रंथवचनाधारें सांगतों. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे तीन प्रकारचे ताप आहेत. त्यांचीं लक्षणें यथाक्रम ३ समासांत सांगतों (८–१२). देह, इंद्रिय व

देह इंद्रिय आणी प्राण । यांचेनि योगें आपण । सुखदुःखें सिणे जाण । या नांव आध्यात्मिक ॥ १३ ॥ देहामधून जें आलें । इंद्रियेप्राणें दुःख जालें । तें आध्यात्मिक बोलिलें । तापत्रई ॥ १४ ॥ देहामधून काय आलें । प्राणें कोण दुःख जालें । आतां हें विशद केलें । पाहिजे कीं ॥ १५ ॥ खरुज खवंडे[1] पुळिया नारु । नखरुडें[2] मांजऱ्या[3] देवी गोवरु । देहामधील विकारु । या नांव आध्यात्मिक ॥ १६ ॥ काखमांजरी केशतोड । वोखटें[4] वर्ण काळफोड । व्याधी मूळव्याधी माहाजड[5] । या नांव आध्यात्मिक ॥ १७ ॥ अंगुळवेडे गालफुगी । कंड सुटे जे वाउगी । हिरडी सुजे भेरे[6] बैलंगी[7] । या नांव आध्यात्मिक ॥ १८ ॥ वाउगे फोड उठती । कां ते सुजे आंगकांती । वात आणी तिडका लागती । या नांव आध्यात्मिक ॥ १९ ॥ नाइटे अंदु[8] गजकर्ण । पेहांचें[9] पोट विस्तीर्ण । बैसलें टाळें फुटती कर्ण । या नांव आध्यात्मिक ॥२०॥ कुष्ट आणि वोला कुष्ट[10] । पंड्यारोग अतिश्रेष्ठ । क्षयरोगाचे कष्ट । या नांव आध्यात्मिक ॥ २१ ॥ वांटी[11] वटक[12] वायेगोळा । हातींपाईं लागती कळा । भोवंडी[13] लागे वेळोवेळां । या नांव आध्यात्मिक ॥ २२ ॥ वोलांडा[14] आणी वळ । पोटसुळाची तळमळ । अर्धशिसी उठे कपाळ । या नांव आध्यात्मिक ॥ २३ ॥ दुखे माजें[15] आणि मान । पुष्ठी ग्रीवा आणि वदन । अस्थिसांदे दुखती जाण । या नांव आध्यात्मिक ॥ २४ ॥ कुळिक[16] तरळ[17] कामिणी[18] । मुरमा सुंठरें[19] मोळिणी[20] । विदेसीं लागलें पाणी । या नांव आध्यात्मिक ॥ २५ ॥ जळसोस आणी हिंवारें[21] । गिरगिरी आणि अंधारें । ज्वर पोचाव[22] आणी शोरें[23] । या नांव आध्यात्मिक ॥ २६ ॥ शैत्य उष्ण आणी तृषा । क्षुधा निद्रा आणी दिशीं[24] । विषयतृष्णेची दुर्दशा । या नांव आध्यात्मिक ॥ २७ ॥ आळसी मूर्ख आणी

प्राण ह्यांच्या योगानें सुखदुःखादि ज्या यातना होतात त्यांना आध्यात्मिक ताप असें म्हणतात (१३–१५). येथून पुढें शरीर, प्राण, इंद्रियें व मन ह्यांच्या योगानें ज्या सुखदुःखादि यातना होतात त्यांचें सविस्तर वर्णन ह्या समासांत शेवटपर्यंत केलें आहे. सामान्यतः १६व्या ओंवीपासून २६व्या ओंवीपर्यंत शारीरिक व्याधींचीं नांवें आहेत ; पुढें प्राण व इंद्रियें ह्यांपासून होणारीं दुःखें सांगितलीं आहेत. ५२।५३ मध्यें मनाच्या आधींचें दिग्दर्शन केलें आहे. शरीराच्या व्याधि व मनाच्या व्याधि मिळून आध्यात्मिक ताप होय. ह्या ओंव्यांचा अर्थ देण्याचें कारण नाहीं, कठीण शब्दांवर टीपा दिल्या आहेत. [द. ३, स. ६]

१ डोक्यांतली खरूज. २ नखाला वस्तरा लागून होणारे ताप. ३ खाकमांजऱ्या. ४ वाईट डाग. ५ दुःसह. ६ (दांतांत) भेरे. ७ कळा निघणें. ८ पायहंसळी, हाड्यावर्ण. ९ पोटफुगी. १० महारोग, गलितकुष्ट. ११ गुडघी रोग. १२ लहान मूल दूध प्याल्यावर त्या दुधाच्या गोळ्या बनून रोग होतो. १३ भोंवळ. १४ उपदंश झालेल्याची लघवी ओलांडून गेल्यानें होणारे विकार. १५ कंबर. १६ मोडशी. १७ अजीर्णापासून होणारी हागओक. १८ कावीळ. १९ पिवळ्या फडक्यांत सात किंवा पांच जोंधळे बांधून फोडावरून उतरून रस्त्यांत टाकितात, ते ओलांडल्यापासून होणारीं गळवें. २० नाकांतील गळवें. २१ हिंवताप. २२ उलटलेला ताप. २३ शारे, शहारे. २४ आमांश.

अपेसी । भय उद्धवे मानसीं । विसराळु दुश्चित्त आहिर्निशीं । या नांव आध्यात्मिक ॥ २८ ॥ मूत्रकोंडें आणी परमें । रक्तपिती रक्तपरमें । खडांचढाचेनि[1] श्रमे । या नांव आध्यात्मिक ॥ २९ ॥ मुरडा हागवण उन्हाळे । दिशा कोंडतां आंदोळे[2] । येक वेथा असोन न कळे । या नांव आध्यात्मिक ॥ ३० ॥ गांठी ढळली जाले जंत । पडे आव आणी रक्त । अन्न तैसेंचि पडत । या नांव आध्यात्मिक ॥ ३१ ॥ पोटफुगी आणी तडस । भरला हिरें[3] लागला घांस । फोंडी[4] लागतां कासावीस । या नांव आध्यात्मिक ॥ ३२ ॥ उचकी लागली उसितं[5] गेला । पित उसळलें उलाट जाला । खरे[6] पडसा आणि खोकला । या नांव आध्यात्मिक ॥ ३३ ॥ उसळला दमा आणी धाप । पडाजिभ ढांस आणी कफ । मोवाज्वरं[7] आणी संताप । या नांव आध्यात्मिक ॥ ३४ ॥ कोणी सेंदुर घातला । तेणें प्राणी निर्बुजला । घशामध्यें फोड जाला । या नांव आध्यात्मिक ॥ ३५ ॥ गळसोट्या[8] आणी जीभ झडे । सदा मुखीं दुर्गंधी पडे । दंतहीन लागती किडे । या नांव आध्यात्मिक ॥ ३६ ॥ जरंडी[9] घोलाणा गंडमाळा । अवचिता स्वयें फुटे डोळा । आपणाचि कापी अंगुळा । या नांव आध्यात्मिक ॥ ३७ ॥ कळा तिडका लागती । कां ते दंत उन्मळती । अधर जिव्हा रगडती । या नांव आध्यात्मिक ॥ ३८ ॥ कणदुःख नेत्रदुःख । नानादुःखें घडे शोक । गर्भांध आणी नपुंसक । या नांव आध्यात्मिक ॥ ३९ ॥ फुलें वडस आणी पडंळें[10] । कीडगर्ता रातांधळें । दुश्चित्त भ्रमिष्ट आणी खुळें । या नांव आध्यात्मिक ॥ ४० ॥ मुकें बधीर रांखोंडें[11] । थोटें चळलें आणी वेडें । पांगुळ कुंन्हे[12] आणी पांवडें[13] । या नांव आध्यात्मिक ॥ ४१ ॥ तांरसें[14] धुंलें[15] काणें कैरें[16] । गारोळें[17] जामुनें[18] टोंफरें[19] । शडांगुळें गेंगाणें विंदरें[20] । या नांव आध्यात्मिक ॥ ४२ ॥ दांतिरें बोचिरें धेंनाळ[21] । घ्राणहीन श्रोत्रहीन बरळ । अति कृश अति स्थूळ । या नांव आध्यात्मिक ॥ ४३ ॥ तोंतरें बोबडें निर्बळ । रोगी कुरूप कुटीळ । मत्सरी खादाड तपीळें[22] । या नांव आध्यात्मिक ॥ ४४ ॥ संतापी अनुतापी मत्सरी । कामिक हेवा तिरस्कारी । पापी अवगुणी विकारी । या नांव आध्यात्मिक ॥ ४५ ॥ उठवण ताठा

१ शौचास खडा होणें. २ शौच कोंडून खालवर होतो. ३ लचक. ४ लहान फोड. ५ मानेंत घास अडकणें, ठसका लागणें. ६ जीभकांटे. ७ तापाचा प्रकार. ८ घटसर्प. ९ पानथरी. १० मोतीबिंदु. ११ ओंठतुटकें. १२ कुबडें. १३ पाय-तुटकें. १४ तारवटलेल्या डोळ्यांचा. १५ मान बांकडी करून पाहणारें. १६ तिरवें. १७ घारडोळें. १८ अति ठेंगणें. १९ ठेंचाळत चालणारें. २० कुरूप. २१ लांबनाक्या. २२ रागीट.

करकं[1]। आवटळे[2] आणी लचक। सुजी आणि चौलक[3]। या नांव आध्यात्मिक ॥ ४६ ॥ सलं[4] आडवें गर्भपात। स्तनगुंते[5] सन्निपात। संसारकोंडे अपमृत्य। या नांव आध्यात्मिक ॥ ४७ ॥ नखविख आणि हिंगुडें। बासट[6] आणी वावडें उगीच दांतखिळ पडे। या नांव आध्यात्मिक ॥ ४८ ॥ झडती पातीं सुजती भंवया। नेत्रीं होती रांझणवडीया। चाळसी लागे प्राणियां। या नांव आध्यात्मिक ॥ ४९ ॥ वांगं तिळ सुरमें लांसें। चामखिळ गलंडें मंसें। चुकुंर[11] होइजे मानसें। या नांव आध्यात्मिक ॥५०॥ नाना फुग आणि आवाळें। अंगीं दुर्गंधी प्रबळे। धोंईचाटी[12] लाळ गळे। या नांव आध्यात्मिक ॥ ५१ ॥ नाना चिंतेची काजळी। नाना दुःखें चित्त पोळी। व्याधीवांचून तळमळी। या नांव आध्यामिक ॥ ५२ ॥ वृद्धपणीच्या आपदा। नाना रोग होती सदा। देह क्षीण सर्वदा। यां नांव आध्यात्मिक ॥ ५३ ॥ नाना व्याधी नाना दुःखें। नाना भोग नाना खांडकें। प्राणी तळमळी शोकें। या नांव आध्यात्मिक ॥ ५४ ॥ ऐसा आध्यात्मिक ताप। पूर्व पापाचा संताप। सांगतां सरेना अमूप। दुःखसागर ॥ ५५ ॥ बहुत काय बोलावें। श्रोतीं संकेतें जाणावें। पुढें बोलिजे स्वभावें। आधिभौतिक ॥ ५६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आध्यात्मिकतापनिरूपणनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण। आध्यात्मिकाचें लक्षण। आतां आधिभौतिक तो कोण। सांगिजेल ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ सर्वभूतैर्देहयोगात् सुखं दुःखं यदाप्यते।
द्वितीयं तं विजानीयात्संतापं चाधिभौतिकम् ॥ १ ॥

सर्व भूतांचेनि संयोगें। सुखदुःख उपजों लागे। ताप होतां मन भंगे। या नांव आधिभौतिक ॥ २ ॥ तरी या आधिभौतिकाचें लक्षण। प्रांजळ करूं निरूपण। जेणें अनुभवास ये पूर्ण। वोळखी तापत्रयाची ॥ ३ ॥ ठेंचा लागती मोडती कांटे। वाजती शस्त्रांचे घायटे[13]। सलं[14] सिलकीं[15] आणी सरांटे। या नांव आधिभौतिक ॥ ४ ॥ अंग्यो[16] आणी कांचकुहिरी[17]। आवचटा लागे शरीरीं।

१ उसण. २ मान आवटळणें. ३ चाळपुळी. ४ वृद्धि न पावतां पोटांत राहिलेला गर्भ. ५ स्तनांत दुधाच्या गुठळ्या बनून होणारा रोग. ६ ओशट व शिळें अन्न खाल्ल्यानें होणारा रोग. ७ काळसर पुळ्या. ८ शिबें, पांढरे चट्टे. ९ बेंड. १० व्रण. ११ भ्रमिष्ट. १२ केंस गळून पडणें. १३ घाव, घायवटा = जखम. १४ शरीरांत घस शिरणें. १५ चुया. १६ आग्या, खाजकुइली, अंगाची आग करणारी वनस्पति. १७ अंगाला खाज आणणारी शेंग.

गांधील येऊन दंश करी । या नांव आधिभौतिक ॥ ५ ॥ मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दंशी । सोटे[1] जळु लागे यासी । आधिभौतिक बोलिजे ॥ ६ ॥ पिसा पिसोळे चांचण । कुसळें[2] मुंगळे ढेंकुण । विसीफे[3] भोंवर गोंचिड जाण । या नांव आधिभौतिक ॥ ७ ॥ गोंबी[4] विंचु आणि विखार[5] । व्याघ्र लांडिगे आणि सूकर[6] । गौसायेळ[7] सामर । या नांव आधिभौतिक ॥ ८ ॥ रानगाई रानम्हैसे । रानशकटें आणी रिसें । रानहस्ती लॉवपिसें । या नांव आधिभौतिक ॥ ९ ॥ सुसरीनें वोढून नेलें । कां तें आवचितें बुडालें । कां तें खळालीं पडिलें । या नांव आधिभौतिक ॥ १० ॥ नाना विखारें आजगर । नाना मगरें जळचर । नाना वनचरें अपार । या नांव आधिभौतिक ॥ ११ ॥ अश्व वृषभ आणी खर । स्वान शूकर जंबुक मार्जर । ऐसीं बहुविध क्रूर । या नांव आधिभौतिक ॥ १२ ॥ ऐसीं कर्कशें भयानकें । बहुविध दुःखदायकें । दुःखें दारुणें अनेकें । या नांव आधिभौतिक ॥ १३ ॥ भिंती माळवदें[9] पडती । कडे भुयेरीं कोंसळती । वृक्ष आंगावरी मोडती । या नांव आधिभौतिक ॥ १४ ॥ कोणी येकाचा श्राप जडे । कोणी येकें केलें चेडें । आधांतरी होती वेडे । या नांव आधिभौतिक ॥ १५ ॥ कोणी येकें चाळविलें । कोणी येकें भ्रष्टविलें । कोणी येकें धरून नेलें । या नांव आधिभौतिक ॥ १६ ॥ कोणी येकें दिलें वीष । कोणी येकें लाविले दोष । कोणी येकें घातले पाश । या नांव आधिभौतिक ॥ १७ ॥ अवचिता सेर लागला । नेणो बिबवा चिडला । प्राणी धुरें जाजावला । या नांव आधिभौतिक ॥ १८ ॥ इंगळांवरी[10] पाय पडे । शिळेखालें हात सांपडे । धावतां आडखुळे पडे । या नांव आधिभौतिक ॥ १९ ॥ वापी कूप सरोवर । गर्ता[11] कडा नदीतीर । आवचितें पडे शरीर । या नांव आधिभौतिक ॥ २० ॥ दुर्गाखालें कोंसळती । झाडावरून पडती । तेखें दुःखें आक्रंदती । या नांव आधिभौतिक ॥ २१ ॥ सीतें[12] वोठ तरकती । हात पाव टांका फुटती । चिखल्या[13] जिव्हाळ्या लागती । या नांव आधिभौतिक ॥ २२ ॥ अशनपानाचिये वेळे । उष्ण रसें जिव्हा पोळे । दांत करकर आणि हरळे[14] । या नांव आधिभौतिक

१ चावरा किडा. २ कुसानें चावणारे. ३ इसब. ४ गोमी. ५ विषारी सर्प. ६ डुकरें. ७ एक पक्षी. ८ डांकिणीपासून लागणारें वेड. ९ धाबीं. १० अग्नीवर. ११ खड्डे. १२ थंडीनें. १३ बोटांच्या सांधीमधील जागा सतत पाणी लागल्यामुळें सडून पांढरी होते, त्याला चिखली म्हणतात. १४ दांतांत फटी पडणें.

॥ २३ ॥ पराधेन बाळपणीं । कुशब्दमारजाचणी । अन्नवस्त्रेंवीण आळणी । या नांव आधिभौतिक ॥ २४ ॥ सासुरवास गोलोरे[1] । ठुणके लासणें चिमोरे । आलें रुदन न धरे । या नांव आधिभौतिक ॥ २५ ॥ चुकतां कान पिळिती । कां तो डोळां हिंग घालिती । सर्वकाळ धारकीं धरिती । या नांव आधिभौतिक ॥ २६ ॥ नाना प्रकारीचे मार । दुर्जन मारिती अपार । दुरी अंतरे माहेर । या नांव आधिभौतिक ॥ २७ ॥ कर्ण नासिक विंधिलें । बळेंचि धरून गोंधिलें । खोडी जालियां पोळविलें । या नांव आधिभौतिक ॥ २८ ॥ परचक्रीं धरून नेलें । नीच यातीस दिधलें । दुर्दशा होऊन मेलें । या नांव आधिभौतिक ॥ २९ ॥ नाना रोग उद्भवले । जे आध्यात्मिकीं बोलिले । वैद्य पंचाक्षरी आणिले । या नांव आधिभौतिक ॥ ३० ॥ नाना वेथेचें निर्शन । व्हावया औषध दारुण । बळात्कारें देती जाण । या नांव आधिभौतिक ॥ ३१ ॥ नाना वल्लीचे रस । काढे गर्गोड कर्कश । घेतां होये कासावीस । या नांव आधिभौतिक ॥ ३२ ॥ ढाळ आणी उखाळ[2] देती । पथ्य कठीण सांगती । अनुपान चुकतां विपत्ती । या नांव आधिभौतिक ॥ ३३ ॥ फाड रक्त फांसणी[3] । गुल्लडागांची[4] जाचणी । तेणें दुःखें दुखवे प्राणी । या नांव आधिभौतिक ॥ ३४ ॥ रुंचिक[5] बिबवे घालती । नाना दुःखें दडपे देती । सिरा तोडिती जळवा लाविती । या नांव आधिभौतिक ॥ ३५ ॥ बहु रोग बहु औषधें । सांगतां अपारें अगाधें । प्राणी दुखवे तेणें खेदें । या नांव आधिभौतिक ॥ ३६ ॥ बोलाविला पंचाक्षरी । धूरमार पीडा करी । नाना यातना चतुरीं । आधिभौतिक जाणिजे ॥ ३७ ॥ दरवडे घालूनियां जना । तस्कर करिती यातना । तेणें दुःख होये मना । या नांव आधिभौतिक ॥ ३८ ॥ अग्नीचेनि ज्वाळें पोळे । तेणें दुःखें प्राणी हरंबळे । हानी जालिया विवळे । या नांव आधिभौतिक ॥ ३९ ॥ नाना मंदिरें सुंदरें । नाना रत्नांचीं भांडारें । दिव्यांबरें मनोहरें । दग्ध होती ॥ ४० ॥ नाना धान्यें नाना पदार्थ । नाना पशु नाना स्वार्थ । नाना पात्रें नाना अर्थ । मनुष्यें भस्म होती ॥ ४१ ॥ अग्नि लागला सेतीं । धान्यें बणंब्या[6] आणी खडकुंती[7] । इक्षुदंड जळोन

---

१ गालगुच्चे, ठोसे, लासणें, चिमटे, हे सासुरवासिनीच्या छळाचे प्रकार होत. २ वांतीचें औषध. ३ शस्त्रानें बेंडावर किंवा गांठीवर चिरा पाडणें. ४ चोंच. ५ रुईचा चीक. ६ गवताच्या गंजी. कणसांतील दाणे काढल्यावर जें भुसकट राहतें त्यास खानदेशांत "बणग्या" म्हणतात. ७ हा शब्द वऱ्हाडांत प्रचलित आहे. धान्य मळून नेल्यावर शेतांत उरलेलें कुटार.

जाती । अकस्मात ॥ ४२ ॥ ऐसा अग्नि लागला । अथवा कोणी लाविला । हानी जाली कां पोळला । या नांव आधिभौतिक ॥ ४३ ॥ ऐसे सांगतां बहुत । होती वन्हीचे आघात । तेणें दुःखें दुःखवे चित्त । या नांव आधिभौतिक ॥ ४४ ॥ हारपे विसरे आणी सांडे । नासे गाहाळे फुटे पडे । असाध्य होये कोणीकडे । या नांव आधिभौतिक ॥ ४५ ॥ प्राणी स्थानभ्रष्ट जालें । नाना पशूतें चुकलें । कन्यापुत्र गाहाळले । या नांव आधिभौतिक ॥ ४६ ॥ तस्कर अथवा दावेदार । अवचिता करिती संव्हार । लुटिती घरें नेती खिल्लार । या नांव आधिभौतिक ॥ ४७ ॥ नाना धान्यें केळी कापिती । पानमळां मीठ घालिती । ऐसे नाना आघात करिती । या नांव आधिभौतिक ॥ ४८ ॥ मैंदे[1] उचले खाणोरी[2] । सुवर्णपंथी[3] भुररेकरी[4] । ठकु सिंतरु वरपेकरी[5] । वरपा घालती ॥ ४९ ॥ गठीछोडे[6] द्रव्य सोडिती । नाना आळंकार काढिती । नाना वस्तु मूषक नेती । या नांव आधिभौतिक ॥ ५० ॥ वीज पडे हिंव पडे । प्राणी प्रभंजनीं[7] सांपडे । कां तो माहापुरीं बुडे । या नांव आधिभौतिक ॥ ५१ ॥ भोंवरे वळणें आणी धार । वोसांणें[8] लाटा अपार । वृश्चिक गोंबी आजगर । वाहोन जाती ॥ ५२ ॥ तयामधें प्राणी सांपडला । खडकीं बेटीं आडकला । बुडत बुडत वांचला । या नांव आधिभौतिक ॥ ५३ ॥ मनासारिखा नसे संसार । कुरूप कर्कश स्त्री क्रूर । विधवा कन्या मूर्ख पुत्र । या नांव आधिभौतिक ॥ ५४ ॥ भूत पिशाच्य लागलें । आंगावरून वारें गेलें । अंबद्ध[9] मंत्रें प्राणी चळलें । या नांव आधिभौतिक ॥ ५५ ॥ ब्राह्मण समंध शरीरीं । बहुसाल पीडा करी । शनेश्वराचा धोका धरी । या नांव आधिभौतिक ॥ ५६ ॥ नाना ग्रहे काळवार । काळतिथी घातचंद्र । काळवेळ घातनक्षत्र । या नांव आधिभौतिक ॥ ५७ ॥ सिंक पिंगळा आणी पाली । वोखटें होला काक कलाली[10] । चिंता काजळी लागली । या नांव आधिभौतिक ॥ ५८ ॥ दिवटा[11] सरवदा[12] भाकून गेला । अंतरीं धोका लागला । दुःस्वप्नें जाजावला । या नांव आधिभौतिक ॥ ५९ ॥ भालु[13] भुंके स्वान रडे । पाली आंगावरी पडे । नाना चिन्हें चिंता पवाडे । या नांव आधिभौतिक ॥ ६० ॥ बाहेरीं निघतां

१ ठक. २ काळीजखाऊ. ३ किमयागार. ४ भुरळ पाडणारे. ५ लुटारू. ६ भामटे, गांठ सोडणारे. ७ प्रभंजन, वावटळ. ८ पुराबरोबर वाहणारीं लांकडें, केरकचरा. ९ पिशाच्यादि साधनांचा मंत्र चुकून वेडे झाले. १० हे सारे अशुभ पक्षी होत. ११ खुडबुड जोशी. १२ सरोदा, भविष्य सांगणारा. १३ कोल्हीं.

अपशकुन । नाना प्रकारें विच्छिन्न । तेणें गुणें भंगे मन । या नांव आधिभौतिक ॥ ६१ ॥ प्राणी बंदीं सांपडला । यातने वरपडा जाला । नाना दुःखें दुःखवला । या नांव आधिभौतिक ॥ ६२ ॥ प्राणी राजदंड पावत । जेरबंद चाबुक वेत । दरेमारें[2] तळवेमार[3] होत । या नांव आधिभौतिक ॥ ६३ ॥ कोरडे पारंब्या फोक । बहु प्रकारें अनेक । बहु ताडिती आधिभौतिक । या नांव बोलिजे ॥ ६४ ॥ मोघरीमार[4] बुधलेमार[5] । चौखरून[6] डंगारणेमार । बुक्या गचांड्या गुडघेमार । या नांव आधिभौतिक ॥ ६५ ॥ लाता चपराखा सेणमार । कानखडेदगड मार । नाना प्रकारींचे मार । या नांव आधिभौतिक ॥ ६६ ॥ टांगणें टिपऱ्या[7] पिंछोडे[8] । बेडी बुधनाळें[9] कोलदांडे । रक्षणनिग्रह[10] चहूंकडे । या नांव आधिभौतिक ॥ ६७ ॥ नाकवणी[11] चुनवणी । मीठवणी रायवणी[12] । गुळवण्याची जाचणी । या नांव आधिभौतिक ॥ ६८ ॥ जळामध्यें बुचकुळिती । हस्तीपुढें बांधोन टाकिती । ह्याकिती छळिती यातायाती । या नांव आधिभौतिक ॥ ६९ ॥ कर्णछेद घ्राणछेद । हस्तछेद पादछेद । जिव्हाछेद अधरछेद । या नांव आधिभौतिक ॥ ७० ॥ तीरमार सुळीं देती । नेत्र वृषण काढिती । नखोनखीं सुया मारिती । या नांव आधिभौतिक ॥ ७१ ॥ पारड्यांमध्यें[13] घालणें । कां कडेलोट करणें । कां भांड्यांमुखें[14] उडवणें । या नांव आधिभौतिक ॥ ७२ ॥ कानीं खुंट्या आदळिती । अपानीं मेखा मारिती । साल काढून टाकिती । या नांव आधिभौतिक ॥ ७३ ॥ भोतें[15] आणि बोटबोटी[16] । अथवा गळ घालणें कंठीं । सांडस लाऊन आटाटी । या नांव आधिभौतिक ॥ ७४ ॥ सिसें पाजणें विष देणें । अथवा सिरछेद करणें । कां पायातळीं घालणें । या नांव आधिभौतिक ॥ ७५ ॥ सरडे[17] मांजरें[18] भरिती । अथवा फांसीं नेऊन देती । नानापरी पीडा करिती । या नांव आधिभौतिक ॥ ७६ ॥ स्वानप्रळये व्याघ्रप्रळये । भूतप्रळये सुसरीप्रळये । शस्त्रप्रळये विझप्रळये । या नांव आधिभौतिक ॥ ७७ ॥ सीरा वोढून घेती । टेंभे[19] लाऊन भाजिती । ऐशा

---

१ आश्रयभूत, पात्र. २ दरींत लोटून देऊन मारणें. ३ तापल्या तव्यावर उभें करून मारणें. ४ अपानद्वारीं मेख ठोकून मारणें. ५ दारू भरलेल्या बुधल्याशीं बांधून त्या दारूस आग लावून मारणें. ६ चारी बाजूंस ताणून बडगेमार देणें. ७ चाप लावणें. ८ मागले बाजूनें हात वळवून बांधणें. ९ झाडाच्या बुंधाशीं नाल्याकृति करून बांधून मारणें. १० पहारा ठेवून बंदी करणें. ११ नाकांत ओतावयाचे तीक्ष्ण पदार्थ. १२ मोहऱ्यांचें पाणी. १३ प्रतिदिवशीं वजन करून कमी भरत जाईल असे हाल करणें. १४ तोफेच्या तोंडीं. १५ नखशिखांत आंगाचें कातडें काढणें. १६ टोंचून मारणें. १७ ज्याला शिक्षा करावयाची त्याला विजार नेसवून त्या विजारींत सरडा सोडून विजार सर्व बाजूंनीं बंद करतात, याचें नांव सरड भरणें. १८ क्षुब्ध मांजराला व मनुष्याला एका खोलींत घालून त्या मांजराकडून मनुष्य मारविणें. १९ मशाली, कांकडे.

नाना विपत्ती । या नांव आधिभौतिक ॥ ७८ ॥ मनुष्यहानी वित्तहानी । वैभवहानी महत्वहानी । पशुहानी पदार्थहानी । या नांव आधिभौतिक ॥ ७९ ॥ बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता । वृद्धपणीं मृत्य सुता । या नांव आधिभौतिक ॥ ८० ॥ दुःख दारिद्र आणी रुण । विदेशपळणी नागवण । आपदा अनुपत्ति कदान्न । या नांव आधिभौतिक ॥ ८१ ॥ आकांत वाखाप्रळय । युद्ध होतां पराजय । जिवलगांचा होय क्षय । या नांव आधिभौतिक ॥ ८२ ॥ कठीण काळ आणी दुष्काळ । साशंक आणी वोखटी वेळ । उद्वेग चिंतेचे हळहळ । या नांव आधिभौतिक ॥ ८३ ॥ घाणा चरखीं सिरकला । चाकाखालें सांपडला । नाना वन्हींत पडिला । या नांव आधिभौतिक ॥ ८४ ॥ नाना शस्त्रें भेदिला । नाना स्वापदीं भक्षिला । नाना बंदीं पडिला । या नांव आधिभौतिक ॥ ८५ ॥ नाना कुवासें निर्बुजे । नाना अपमानें लाजे । नाना शोकें प्राणी झिजे । या नांव आधिभौतिक ॥ ८६ ॥ ऐसे सांगतां अपार । आहेत दुःखाचे डोंगर । श्रोतीं जाणावा विचार । आधिभौतिकाचा ॥ ८७ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आधिभौतिक-तापनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

श्रीराम । मागां बोलिला आध्यात्मिक । त्याउपरी आधिभौतिक । आतां बोलिजेल आधिदैविक । तो सावध ऐका ॥ १ ॥

॥ श्लोक ॥ शुभाशुभैः कर्मभिश्च देहांते यमयातना ॥
स्वर्नरकादि भोक्तव्यमिदं विद्धयाधिदैविकम् ॥ १॥

शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं यमयातना । स्वर्ग नर्क भोग नाना ।

आतां आधिभौतिक तापाचें लक्षण सांगतों. सर्व भूतांच्या संयोगानें सुखदुःख प्राप्त होऊन जो मनस्ताप होतो त्याला आधिभौतिक ताप म्हणतात. भूतें म्ह० पंचभूतें व पंचभूतात्मक सर्व जीवजंतु. अर्थ सुलभ असल्यामुळें कठीण शब्दांवर टीपा दिल्या आहेत. यांत नाना जीवजंतु, पशुपक्षी, माणसें व या सर्वांपासून होणाऱ्या तापांचें सविस्तर वर्णन केलें आहे. ह्या जगांत माणसांत जी कठोरता व निर्दयता भरलेली कोठें कोठें दिसून येते ती या समासांत स्पष्ट दाखविली आहे. सास्वा सुनांना किती प्रकारें छळतात हें ओंव्या २४ पासून वर्णिलें आहे. हे सुनांचे छळ अलीकडे पुष्कळ कमी झाले आहेत व समर्थांचे वेळींही हे प्रकार सार्वत्रिक होते असें नाहीं. पण कोणताही विषय पुढें आला कीं त्याचें सर्वांगपरिपूर्ण सविस्तर वर्णन करणें हा समर्थांच्या उपदेशपद्धतीचा विशेष इतर अनेक स्थळांप्रमाणें येथेंही स्पष्ट दिसतो. तसेंच त्यांच्या वेळेपूर्वीं-पासून चाललेले राजदंडांचे अमानुष प्रकार ओंव्या ६२ ते ७९ पर्यंत पहावेत. [द. ३, स. ७].

आतां आधिदैविक तापाचें लक्षण ऐका. प्राण्यानें पुण्यकर्में किंवा पापकर्में जीं केलीं असतील त्या कर्मानुसार देहपातानंतर जे स्वर्गभोग किंवा नरकयातना त्याला भोगाव्या लागतात त्यांना आधिदैविक ताप असें म्हणतात. प्राणी मदानें अंध होऊन

---

१ अनुपत्ति, विपत्ति.

या नांव आधिदैविक ॥ २ ॥ नाना दोष नाना पातकें । मदांधपणें अविवेकें । केलीं परी तें दुःखदायकें । यमयातना भोगविती ॥ ३ ॥ आंगबळें द्रव्यबळें । मनुष्यबळें राजबळें । नाना सामर्थ्याचेनि बळें । अकृत्य करिती ॥ ४ ॥ नीति सांडूनियां तत्वतां । करूं नये तेंचि करितां । यमयातना भोगितां । जीव जाये ॥ ५ ॥ डोळे झांकून स्वार्थबुद्धी । नाना अभिलाष कुबुद्धी । वृत्ति भूमिसीमा साधी । द्रव्य दारा पदार्थ ॥ ६ ॥ मातलेपणें उन्मत्त । जीवघात कुटुंबघात । अप्रमाण क्रिया करीत । म्हणोनी यमयातना ॥ ७ ॥ मर्यादा सांडूनि चालती । ग्रामा दंडी ग्रामाधिपती । देशा दंडी देशाधिपती । नीतिन्याय सांडितां ॥ ८ ॥ देशाधिपतीस दंडिता रावो । रायास दंडिता देवो । राजा न करितां नीतिन्यावो । म्हणोनी यमयातना ॥ ९ ॥ अनीतीनें स्वार्थ पाहे । राजा पापी होऊन राहे । राज्या अंतीं नर्क आहे । म्हणोनियां ॥ १० ॥ राजा सांडितां राजनीति । तयास यम गांजिती । यम नीति सांडितां धांवती । देवगण ॥ ११ ॥ ऐसी मर्यादा लावली देवें । म्हणोनी नीतीनें वर्तावें । नीतिन्याय सांडितां भोगावें । यमयातनेसी ॥ १२ ॥ देवें प्रेरिले यम । म्हणोनी आधिदैविक नाम । तृतीय ताप दुर्गम । यमयातनेचा ॥ १३ ॥ यमदंड यमयातना । शास्त्रीं बोलिले प्रकार नाना । तो भोग कदापि चुकेना । या नांव आधिदैविक ॥ १४ ॥ यमयातनेचे खेद । शास्त्रीं बोलिले विशद । शरीरीं घालून अप्रमाद । नाना प्रकारें ॥ १५ ॥ पापपुण्याचीं शरीरें । स्वर्गीं असती कळेवरें । त्यांत घालून नाना प्रकारें । पापपुण्य भोगविती ॥ १६ ॥

अविवेकानें अनेक पापें करितो किंवा दोष (धर्मबाह्य आचरण) करितो, पण ते त्याला यमयातना भोगायला लावतात. शक्तिमद, द्रव्यमद, मनुष्यबळाचा मद, राजबळाचा मद, इ. अनेक प्रकारच्या सामर्थ्यबळांच्या योगानें प्राणी वाईट कृत्यें करितात, नीतिमार्ग सोडून स्वैरपणें वागतात आणि मग यमाच्या यातना भोगतांना परम दुःखी होतात. डोळे झांकून दुर्बुद्धि धरितात व स्वार्थलोभानें दुसऱ्याचीं परंपरेचीं वतनें (वृत्ति) व जमिनी बुडवून गिळंकृत करितात व आपलीं बायकापोरें, संपत्ति व अनेक पदार्थ यांचा भोग घेतात. मदोन्मत्तपणानें त्यांना दुसऱ्यांचे प्राण घेणें किंवा त्यांच्या कुटुंबांचा नाश करणें यांत कांहीं वाटत नाहीं व अशा गैरवर्तनानें शेवटीं यमयातना भोगतात. मर्यादा (नेम, कायदे) सोडून वागल्यास गांवचा अधिकारी (पाटील) गांवास दंड करितो, देशाधिकारी (देशमुख) देशाला शिक्षा करितो, त्याला राजा शिक्षा करितो, व राजा नीतिन्याय सोडून वागतो म्हणून त्याला यमयातना भोगाव्या लागतात; याच अर्थानें 'राज्यांतीं नरक' असें म्हटलें आहे. राजानें न्यायनीति सोडली तर त्याला यम शिक्षा करितो पण यम चुकेल तर त्यालाही शिक्षा लावणारे देवगण आहेत. अशी ही मर्यादा देवानेंच घालून दिली आहे. म्हणून नीतिन्यायानें वागावें व नीतिन्याय सोडल्यास यमयातना भोगाव्या. देवानें यमाला दंडनीति सांगितली म्हणून या घोर तापाला आधिदैविक ताप म्हणतात. यमदंड यमयातना इ. नानाप्रकार शास्त्रांत सांगितले आहेत, ते भोग कोणाला सुटत नाहींत (१–१४). यमयातनेचीं दुःखें शास्त्रांत स्पष्ट करून सांगितलीं आहेत. पापपुण्यात्मक शरीरांत अनेक प्रकारचे गैरसावधपणाचे दोष (अप्रमाद) घालून स्वर्गनरकांतील अनेक पापपुण्याचे सुखदुःखभोग भोगविले जातात. पुण्यकर्मांनीं विलासभोग व पापकर्मांनीं दुःखक्लेश भोगावे लागतात,

नाना पुण्यें नाना विळास । नाना दोषें यातना कर्कश । शास्त्रीं बोलिलें
अविश्वास । मानूंच नये ॥ १७ ॥ वेदाज्ञेनें न चालती । हरिभक्ति न करिती ।
त्यास यमयातना करिती । या नांव आधिदैविक ॥ १८ ॥ अक्षोभ नरकीं
उदंड जीव । जुनाट किडे करिती रवरव । बांधोन टाकिती हातपाव । या नांव
आधिदैविक ॥ १९ ॥ उदंड पैस लहान मुख । कुंभाकार कुंड येक । दुर्गंधी
उकाडा कुंभपाक । या नांव आधिदैविक ॥ २० ॥ तप्त भूमिका ताविती । जळत
स्तंभ पोटाळविती । नाना सांडस लाविती । या नांव आधिदैविक ॥ २१ ॥
यमदंडाचे उदंड मार । यातनेची सामग्री अपार । भोग भोगिती पापी नर ।
या नाव आधिदैविक ॥ २२ ॥ पृथ्वीमध्यें मार नाना । त्याहून कठीण
यमयातना । मारितां उसंतचि असेना । या नांव आधिदैविक ॥ २३ ॥ चौघे
चौंकडे वोढिती । येक ते झोंकून पाडिती । ताणिती मारिती वोढूनि नेती ।
या नांव आधिदैविक ॥ २४ ॥ उठवेना बैसवेना । रडवेना पडवेना ।
यातनेवरी यातना । या नांव आधिदैविक ॥ २५ ॥ आक्रंदे रडे आणि फुंजे ।
धकाधकीनें निर्बुजे । झुर्झुरों पंजर होऊन झिजे । या नांव आधिदैविक ॥ २६ ॥
कर्कश वचनें कर्कश मार । यातनेचे नाना प्रकार । त्रास पावती दोषी नर ।
या नांव आधिदैविक ॥ २७ ॥ मागां बोलिला राजदंड । त्याहून येमदंड उदंड ।
तेथील यातना प्रचंड । भीमरूप दारुण ॥ २८ ॥ आध्यात्मिक आधिभौतिक ।
त्याहूनि विशेष आधिदैविक अल्प संकेतें कांहींयेक । कळावया बोलिलें ॥ २९ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आधिदैविकतापनाम समास अष्टम ॥ ८ ॥

हें सर्व शास्त्रांत सांगितलें आहे त्यावर विश्वास ठेवावा. जे वेदाज्ञा पाळीत नाहींत, हरिभक्ति करीत नाहींत, त्यांना यमयातना भोगाव्या लागतात (१५–१८). त्या यातनांचे कांहीं प्रकार पहा. अक्षोभ नरकांत अनंत किडे हातपाय बांधून टाकल्यामुळें रवरव करीत असतात, आंत जागा ऐसपैस व तोंड लहान असें कुंभाकार कुंड आहे त्याला कुंभपाक नरक म्हणतात. तप्तभूमीवर लोळवितात, जळत्या खांबाला वेटाळें घालायला लावतात, अनेक चिमटे अंगाला लावतात, अनेक प्रकारचे दंडमार देतात, अशी यमापाशीं यातनेची सामग्री अपार आहे; व पापी जीवांना या यातना भोगाव्या लागतात. मनुष्यलोकीं अनेक मार आहेत त्याहून हे फारच भयंकर आहेत. यमदूतांना फुरसत नसते. चौघे चहूंकडे ओढतात, कोणी झोकून आपटतात, ताणतात, मारतात, ओढतात. जीवांना उठवत नाहीं, बसवत नाहीं, पडवत नाहीं, रडवत नाहीं, यातनेवर यातना असा सारखा क्रम चालू असतो. प्राणी रडतो, फुंदतो, आरडतो, धकाधकीनें कासावीस होतो, झुरून त्याचे अस्थिपंजर राहतात. कठोर शब्द बोलून निर्दयपणें मार देतात. पापी जीव बेजार होतात, भय पावतात (१९–२७). मागें राजदंड सांगितले त्याहून हे यमदंड फारच भयंकर व दुःखकारक आहेत. मागच्या दोन्ही तापांपेक्षां हे आधिदैविक ताप अधिक उग्र आहेत. हे कळण्यासाठीं संक्षेपानें संकेतार्थ सांगितले आहेत (२८–२९). [द. ३, स. ८]

॥ श्रीराम ॥ संसार म्हणिजे सवेंच स्वार । नाहीं मरणासी उधार । मापीं लागलें शरीर । घडीनें घडी ॥ १ ॥ नित्य काळाची संगती । नकळे होणाराची गती । कर्मासारिखे प्राणी पडती । नाना देशीं विदेशीं ॥ २ ॥ सरतां संचिताचें शेष । नाहीं क्षणाचा अवकाश । भरतां न भरतां निमिष । जाणें लागे ॥३॥ अवचितें काळाचे म्हणियारे । मारित सुटती येकसरें । नेऊन घालिती पुढारें । मृत्यपंथें ॥ ४ ॥ होतां मृत्याची आटाटी । कोणीं घालूं न सकती पाठीं । सर्वत्रांस कुटाकुटी । मागेंपुढें होतसे ॥ ५ ॥ मृत्यकाळ काठी निकीं । बैसे बळियाचे मस्तकीं । महाराजे बळिये लोकीं । राहों न सकती ॥ ६ ॥ मृत्य न म्हणे कीं हा क्रूर । मृत्य न म्हणे हा झुंझार । मृत्य न म्हणे संग्रामशूर । समरंगणीं ॥ ७ ॥ मृत्य न म्हणे कीं हा कोपी । मृत्य न म्हणे हा प्रतापी । मृत्य न म्हणे उग्ररूपी । महांखळ ॥ ८ ॥ मृत्य न म्हणे हा बळाढ्य । मृत्य न म्हणे धनाढ्य । मृत्य न म्हणे आढ्य । सर्वगुणें ॥ ९ ॥ मृत्य न म्हणे हा विख्यात । मृत्य न म्हणे हा श्रीमंत । मृत्य न म्हणे हा अद्भुत । पराक्रमी ॥ १० ॥ मृत्य न म्हणे हा भूपती । मृत्य न म्हणे हा चक्रवर्ती । मृत्य न म्हणे हा करामती । कैवाड जाणे ॥ ११ ॥ मृत्य न म्हणे हयपती । मृत्य न म्हणे गजपती । मृत्य न म्हणे नरपती । विख्यात राजा ॥१२॥ मृत्य न म्हणे वरिष्ठ जनीं । मृत्य न म्हणे राजकारणी । मृत्य न म्हणे वेतनी । वेतनधर्ता ॥ १३ ॥ मृत्य न म्हणे देसाई । मृत्य न म्हणे व्यवसाई । मृत्य न म्हणे ठाईं ठाईं । पुंडराजे ॥ १४ ॥ मृत्य न म्हणे मुद्राधारी । मृत्य न म्हणे व्यापारी । मृत्य न म्हणे परनारी । राजकन्या ॥ १५ ॥ मृत्य न म्हणे कार्याकारण । मृत्य न म्हणे वर्णावर्ण । मृत्य न म्हणे

संसार म्हणजे प्राण्याच्या जन्मापासूनच त्याच्या पाठोपाठ आलेला मृत्यूचा दूत होय. मरणाला उधारी नाहीं. प्रत्येक क्षणीं शरीराला माप लागलें असून तें क्षरत आहे (१). शरीराला काळाची संगति निरंतर आहे, पुढच्या क्षणीं काय होईल हें कळत नाहीं. कर्माप्रमाणें प्राणी स्वदेशीं किंवा विदेशीं पडतात (मृत्यु पावतात). संचित कर्म संपतांक्षणींच काळ झडप घालतो व निमिषाचा अवकाश देत नाहीं. काळाचे दूत मालकाचा हुकूम सुटतांच त्याला पुढें घालून मारीत मृत्युपंथानें घेऊन जातात. मृत्यूची धांदल सुरू झाली कीं कोणीही पाठी घालूं शकत नाहीं. सर्वांना मागेंपुढें त्याचा मारा खावाच लागतो. मृत्यूचा सोटा मोठमोठ्या बलिष्ठांच्या मस्तकीं पडल्यावर तेही क्षणभरसुद्धां राहूं शकत नाहींत (२-६). मृत्यु सर्वांच्याच पाठीमागें लागला आहे, त्याला हा कोण, हा विचार नाहीं. क्रूर, झुंजार म्ह. योद्धे, कोपी, प्रतापी, उग्र, खळ, बलाढ्य, धनाढ्य, गुणाढ्य, अद्भुत पराक्रमी, भूपति, चक्रवर्ती, करामती म्ह. कलाकुशल, राजकारणी, परसेवक, पुंड, देसाई, व्यवसाई, व्यापारी, मुद्राधारी राजा व राजकन्या या सर्वांवर मृत्यूचा नडाखा सारखाच बसतो (७-१५). कार्यकारण,

हा ब्राह्मण । कर्मनिष्ठ ॥ १६ ॥ मृत्य न म्हणे व्युत्पन्न । मृत्य न म्हणे संपन्न । मृत्य न म्हणे विद्वज्जन । समुदाई ॥ १७ ॥ मृत्य न म्हणे हा धूर्त । मृत्य न म्हणे बहुश्रुत । मृत्य न म्हणे हा पंडित । महा भला ॥ १८ ॥ मृत्य न म्हणे पुराणिक । मृत्य न म्हणे हा वैदिक । मृत्य न म्हणे हा याज्ञिक । अथवा जोसी ॥ १९ ॥ मृत्य न म्हणे अग्नहोत्री । मृत्य न म्हणे हा श्रोत्री । मृत्य न म्हणे मंत्रयंत्री । पूर्णागमी ॥ २० ॥ मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ । मृत्य न म्हणे वेदज्ञ । मृत्य न म्हणे सर्वज्ञ । सर्व जाणे ॥ २१ ॥ मृत्य न म्हणे ब्रह्महत्या । मृत्य न म्हणे गोहत्या । मृत्य न म्हणे नाना हत्या । । स्त्रीबाळकादिक ॥ २२ ॥ मृत्य न म्हणे रागज्ञानी । मृत्य न म्हणे ताळज्ञानी । मृत्य न म्हणे तत्वज्ञानी । तत्ववेत्ता ॥ २३ ॥ मृत्य न म्हणे योगाभ्यासी । मृत्य न म्हणे संन्यासी । मृत्य न म्हणे काळासी । वंचूं जाणे ॥ २४ ॥ मृत्य न म्हणे हा सावध । मृत्य न म्हणे हा सिद्ध । मृत्य न म्हणे वैद्य प्रसिद्ध । पंचाक्षरी ॥ २५ ॥ मृत्य न म्हणे हा गोसावी । मृत्य न म्हणे हा तपस्वी । मृत्य न म्हणे हा मनस्वी । उदासीन ॥ २६ ॥ मृत्य न म्हणे ऋषेश्वर । मृत्य न म्हणे कवीश्वर । मृत्य न म्हणे दिगंबर । समाधिस्थ ॥ २७ ॥ मृत्य न म्हणे हठयोगी । मृत्य न म्हणे राजयोगी । मृत्य न म्हणे वीतरागी । निरंतर ॥ २८ ॥ मृत्य न म्हणे ब्रह्मचारी । मृत्य न म्हणे जटाधारी । मृत्य न म्हणे निराहारी । योगेश्वर ॥ २९ ॥ मृत्य न म्हणे हा संत । मृत्य न म्हणे हा महंत । मृत्य न म्हणे हा गुप्त । होत असे ॥ ३० ॥ मृत्य न म्हणे स्वाधेन । मृत्य न म्हणे पराधेन । सकळ जीवांस प्राशन । मृत्यचि करी ॥ ३१ ॥ येक मृत्यमार्गीं लागले । येकीं अर्धपंथ क्रमिले । येक ते सेवटास गेले । वृद्धपणीं ॥ ३२ ॥ मृत्य न म्हणे बाळ तारुण्य । मृत्य न म्हणे सुलक्षण । मृत्य न म्हणे विचक्षण । बहुबोलका ॥ ३३ ॥ मृत्य न म्हणे हा आधारु ।

वर्णावर्ण, कर्मनिष्ठ ब्राह्मण—मृत्यु कोणाला ओळखीत नाहीं (१६). संपन्न, व्युत्पन्न (पंडित), धूर्त, बहुश्रुत, पुराणिक, वैदिक, याज्ञिक, ज्योतिषी, अग्निहोत्री, श्रोत्रिय (श्रुति जाणणारा), वेदज्ञ, शास्त्रज्ञ, सर्वज्ञ, गायक, तत्त्वज्ञानी, योगाभ्यासी, संन्यासी, काळवंचक (योगाभ्यासानें मरण पुढें ढकलणारे), वैद्य, पंचाक्षरी, गोसावी, तपस्वी, सिद्ध, कवीश्वर, हटयोगी, राजयोगी, वीतरागी, ब्रह्मचारी, संत, महंत—मृत्यु कोणाचाच निमिषार्धही विचार करीत नाहीं. त्याला ब्रह्महत्येचें भय वाटत नाहीं, तो गोहत्येला भीत नाहीं, स्त्रीबाळादिकांची त्याला करुणा येत नाहीं. स्वाधीन व पराधीन (यजमान व नोकर) यांच्यांत तो भेद करीत नाहीं. तो सर्व जीवांना पिळून टाकतो, गट्ट करितो (१७–३१). कोणी मृत्यूच्या मार्गाला लागलेले असतात, कोणी अर्धी किंवा सारी वाट चालून आलेले असतात. बाल्य, तारुण्य, वार्धक्य या दशा तो जाणत नाहीं. हा आधार

मृत्य न म्हणे उदारु । मृत्य न म्हणे हा सुंदरु । चतुरांग जाणे ॥ ३४ ॥ मृत्य न म्हणे पुण्यपुरुष । मृत्य न म्हणे हरिदास । मृत्य न म्हणे विशेष । सुकृती नर ॥ ३५ ॥ आतां असो हें बोलणें । मृत्यापासून सुटिजे कोणें । मागें पुढें विश्वास जाणें । मृत्यपंथें ॥ ३६ ॥ चारी खाणी चारी वाणी । चौऱ्यांसी लक्ष जीवयोनी । जन्मा आले तितुके प्राणी । मृत्य पावती ॥ ३७ ॥ मृत्याभेणें पळों जातां । तरी मृत्य सोडिना सर्वथा । मृत्यास न ये चुकवितां । कांहीं केल्या ॥ ३८ ॥ मृत्य न म्हणे हा स्वदेशी । मृत्य न म्हणे हा विदेशी । मृत्य न म्हणे हा उपवासी । निरंतर ॥ ३९ ॥ मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरिहर । मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ॥ ४० ॥ श्रोतीं कोप न करावा । हा मृत्यलोक सकळांस ठावा । उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्यपंथें ॥ ४१ ॥ येथें न मानावा किंत । हा मृत्यलोक विख्यात । प्रगट जाणती समस्त । लहानथोर ॥ ४२ ॥ तथापी किंत मानिजेल । तरी हा मृत्यलोक नव्हेल । याकारणें नासेल । उपजला प्राणी ॥ ४३ ॥ ऐसें जाणोनियां जीवें । याचें सार्थकचि करावें । जनीं मरोन उरवावें । कीर्तिरूपें ॥ ४४ ॥ येरवीं प्राणी लहानथोर । मृत्य पावती हा निर्धार । बोलिलें हें अन्यथा उत्तर । मानूंचि नये ॥ ४५ ॥ गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे । गेले अगाध महिमेचे । मृत्यपंथें ॥ ४६ ॥ गेले बहुत पराक्रमी । गेले बहुत कपटकर्मी । गेले बहुत संग्रामी । संग्रामशूर ॥ ४७ ॥ गेले बहुतां बळांचे । गेले बहुतां काळांचे । गेले बहुतां कुळांचे । कुळवंत राजे ॥ ४८ ॥ गेले बहुतांचे पाळक । गेले बुद्धीचे चाळक । गेले युक्तीचे तार्किक । तर्कवादी ॥ ४९ ॥ गेले विद्येचे सागर । गेले बळाचे डोंगर । गेले धनाचे कुबेर । मृत्यपंथें ॥ ५० ॥ गेले बहुत पुरुषार्थाचे । गेले बहुत विक्रमाचे । गेले बहुत आटोपाचे । कार्यकर्ते ॥ ५१ ॥ गेले बहुत शस्त्रधारी । गेले

(शें-दोनशेंचा पोशिंदा), हा उदार, हा सुंदर, हा हरिदास, हा पुण्यशील असला विचार त्याच्यापाशीं नाहीं. मृत्यूच्या तडाख्यांतून कोणी सुटत नाहीं. मागेंपुढें सर्वांसच मृत्यु घेऊन जातो (३२–३६). चौऱ्यांयशीं लक्ष जन्मयोनींचे सर्व प्राणी मृत्युवश आहेत. त्याच्या भयानें कोणालाही कोठेंही पळून जातां येत नाहीं, त्याला गुंगारा देणें अगदीं अशक्य आहे. फार काय सांगावें ? हरिहर व भगवंताचे अवतार हेही मृत्यु चुकवूं शकत नाहींत. हा ' मृत्युलोक ' म्हणून प्रसिद्ध आहे. जन्मला तो निश्चयानें मेलाच पाहिजे. संशय घेतला म्हणून हा मृत्युलोक नाहीं असें होत नाहीं. हें जाणून जीवानें जन्माचें साफल्य करावें व मागें लोक सत्कीर्ति गात राहतील असेंच वागावें. लहानथोर सर्वांना मृत्यु आहेच आहे (३७-४५). जे जे आले ते ते गेलेच आहेत. भव्य वैभव भोगणारे गेले, दीर्घायुषी गेले. थोर माहात्म्य संपादन करणारे गेले, संग्रामशूर गेले, युक्तिबुद्धितर्कांचे सारे गेले, आहेत व जातील. आटोपाचे (कामाचा उरक असलेले) कार्यकर्ते गेले. पुरुषार्थी,

बहुत परोपकारी । गेले बहुत नानापरी । धर्मरक्षक ॥ ५२ ॥ गेले बहुत प्रतापाचे । गेले बहुत सत्कीर्तीचे । गेले बहुत नीतीचे । नीतिवंत राजे ॥ ५३ ॥ गेले बहुत मतवादी । गेले बहुत कार्यवादी । गेले बहुत वेवादी । बहुतां परीचे ॥ ५४ ॥ गेलीं पंडितांचीं थाटें । गेलीं शब्दांचीं कचाटें । गेलीं वादकें अचाटें । नाना मतें ॥ ५५ ॥ गेले तापसांचे भार । गेले संन्यासी अपार । गेले विचारकर्ते सार । मृत्यपंथें ॥ ५६ ॥ गेले बहुत संसारी । गेले बहुत वेषधारी । गेले बहुत नानापरी । नाना छंद करूनी ॥ ५७ ॥ गेले ब्राह्मणसमुदाय । गेले बहुत आचार्य । गेले बहुत सांगों काय । किती म्हणोनी ॥ ५८ ॥ असो ऐसे सकळही गेले । परंतु येकचि राहिले । जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ ५९ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मृत्यनिरूपणनाम समास नवम ॥ ९ ॥

॥ श्रीराम ॥ संसार म्हणिजे महापूर । माजीं जळचरें अपार । डंखूं धांवती विखार । काळसर्प ॥ १ ॥ आशा ममता देहीं बेडी । सुसरी करिताती तडातोडी । नेऊन दुःखाचे सांकडी– । माजीं घालिती ॥ २ ॥ अहंकारनक्रें उडविलें । नेऊन पाताळीं बुडविलें । तेथुनियां सोडविलें । न वचे प्राणी ॥ ३ ॥ काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना । मदमत्सर बोहटेना । भूलि पडिली ॥ ४ ॥ वासनाधामीण पडिली गळां । घालून वेंटाळें वमी गरळा । जिव्हा लाळी वेळोवेळां । भयानक ॥ ५ ॥ माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें । बुडतांही न सोडी फुंजे । कुळाभिमानें ॥ ६ ॥ पडिलें भ्रांतीचें अंधारें । नागविलें अभिमानचोरें । आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ॥ ७ ॥ बहुतेक आवर्तीं पडिले । प्राणी

परोपकारी, नीतिमंत, प्रतापवंत, नानामतवादी, विवादी, सारे मरणवश आहेत. पंडितांचीं थाटें म्ह. समुदाय गेले. शब्दकचाटी म्ह. वैय्याकरणी गेले. नाना छंदांचे नाना लोक आले आणि गेले. विद्वान् ब्राह्मण गेले, आचार्य गेले, झाडून सारे मृत्युमार्गेच गेले आहेत (४६-५८). असो. सारेच गेले आहेत, पण एक मात्र राहिले आहेत. स्वरूपाकार झालेले आत्मज्ञानी तेवढे मृत्यूला मारून उरले आहेत! (५९) [द० ३, स० ९].

संसार हा महासागर आहे. त्यांत विकारांचीं असंख्य जळचरें आहेत. विषारी काळसर्प जागोजाग दंश करायला टपले आहेत. आशा, ममता ह्या देहाच्या खोड्यांत अडकवणाऱ्या सुसरी प्रियपदार्थांचा वियोग सोसायला लावून दुःखक्लेशांत नेऊन सोडतात. अहंकाररूप मगर प्राण्याला उंच चढवून लगेच रसातळाला नेऊन बुडवतो व तेथून त्याची मुक्तता होत नाहीं. कामाची बळकट मिठी सुटत नाहीं, तिरस्कार म्ह. द्वेषभाव हटत नाहीं, प्राणी भ्रमांत सांपडून त्याचे मदमत्सर ओसरत नाहींत. वासनाधामीण गळ्यांत पडली असून तिच्या पकडींत हा सांपडला आहे व ती भयंकर जीभ आंत बाहेर काढून विष ओकीत आहे. हा अशाही कैचींत प्रपंचाचा भार मस्तकीं घेऊन माझें माझें करीत आहे व बुडत असतांना देखील तो भार न टाकतां कुळाभिमानानें फुगतच आहे! भ्रमाचा गडद अंधार पडला आहे, अहंकार चोरानें याला नागविलें आहे, मीपणरूप भुताची बाधा झाल्यामुळें त्याच भ्रमांत हा बुडाला आहे. बहुतेक जीव भोंवऱ्यांत

वाहातचि गेले । जेंहिं भगवंतासी बोभाइलें । भावार्थबळें ॥ ८ ॥ देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी । येर तें अभाविकें बापुडीं । वाहाताचि गेलीं ॥ ९ ॥ भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला । संकटीं पावे भाविकाला । रक्षितसे ॥ १० ॥ जयास भगवंत आवडे । तयाचें देवासी सांकडें । संसारदुःख सकळ उडे । निजदासाचें ॥ ११ ॥ जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे । धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ १२ ॥ जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी । जाणे भाव अंतरसाक्षी प्राणीमात्रांचा ॥ १३ ॥ जरी भाव असेल माईक । तरी देव होय महाठक । नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ १४ ॥ जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान । भाव होतां किंचित न्यून । आपणहि दुरावे ॥ १५ ॥ दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जेस्यास तैसें भासे । तयाचें सूत्र असे । आपणाचपासीं ॥ १६ ॥ जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें । जरी डोळे पसरूनि पाहावें । तरी तेंहि टवकारे ॥ १७ ॥ भृकुटीस घालून मिठी । पाहातां क्रोधें तेंहि उठी । आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥ जैसा भाव प्रतिबिंबला । तयाचाचि देव जाला । जो जैसें भजे त्याला । तैसाचि वोळे ॥ १९ ॥ भावें परमार्थाचिया वाटा । वाहाती भक्तीचिया पेंठा । भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ॥ २० ॥ भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन जाले । भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहीं ॥ २१ ॥ आपण स्वयें तरले । जनासहि उपेगा आले । कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी

सांपडून प्रवाहाबरोबर वाहतां वाहतां बुडाले आहेत, मात्र ज्या थोड्या सभाग्य जीवांनीं भक्तिभावानें देवाचा धांवा केला, त्यांच्यासाठीं भक्तवत्सल देवांनीं स्वतः उडी घालून त्यांना भवसागरांतून तारून नेलें आहे. बाकीचे अभक्त प्राणी वाहतच गेले आहेत (१–९). देव भावाचा भुकेला आहे, तो भावाला भुलतो, जडभारी पडतांच भाविकांना संकटांत पावतो. ज्याला देव आवडतो त्याचा संकटनिवारणाचा भार देवावर पडतो. भक्ताचें सारें संसारदुःख नाहींसें होतें. परमेश्वराचे जे अंकित त्यांना स्वानंदसुखाचा सोहळा भोगायला मिळतो. तात्पर्य, भाविक जन परम धन्य होत, दैवाचे पुतळे तेच (१०–१२). भाव तसा देव. प्राणिमात्रांचें अंतःकरण पाहणारा देव कोणाचा भाव कसा आहे हें जाणतो. भाव खोटा तर देव महाठक होतो. देवाचें कौतुक हेंच कीं तो जशास तसा आहे. जसें भजन तसें समाधान देतो, भाव कमी होतांच देव दूर होतो. बिंब असेल तसेंच आरशांत प्रतिबिंब पडतें. त्याचें सूत्र आपणाजवळच आहे. आपण जसे हावभाव करूं तसेच, ते आरशांत उमटतात. आपण (बिंब) डोळे वटारले कीं प्रतिबिंबही डोळे वटारून पहातें. भिंवया चढवून आपण पाहिलें कीं तेंही क्रोधपूर्वक पहात आहेसें दिसतें; व आपण हंसलों कीं तेंही हंसतें. भावाचें प्रतिबिंबच देवरूपानें प्रत्यक्ष होतें. जो जसा भजतो तसा देव त्याला वोळतो. परमार्थांत भाव मुख्य आहे, भावानें परमार्थमार्गाला लागलों कीं सारे मार्ग भक्तीच्या पेठेंत नेऊन सोडतात व संतसंगतीनें आपण नेमके मोक्षाच्या चौकांत जाऊन पोंचतों (१३-२०). जे भावपूर्वक भक्तिमार्गाला लागले, ते ईश्वरस्वरूपीं पोंचून पावन होतात व भावार्थबळानें पूर्वजांचा उद्धार करितात. स्वतः तरून लोकांच्या उपयोगीं पडतात व त्यांची कीर्ति ऐकून (किंवा त्याच्या मुखें भगवत्कीर्ति ऐकून) अभाविकही भाविक होतात.

॥ २२ ॥ धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं । तेहिंच येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ २३ ॥ तयांची वर्णूं काय थोरी । जयांचा भगवंत कैवारी । कासे लाऊन उतरी । पार दुःखाचा ॥ २४ ॥ बहुतां जन्मांचे सेवटीं । जेणें चुके अटाटी । तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५ ॥ म्हणोनी धन्य ते भाविक जन । जेंहीं जोडिलें हरिनिधान । अनंत जन्मांतरीचें पुण्य । फळासि आलें ॥ २६ ॥ आयुष्य हेचि रत्नपेटी । माजीं भजनरत्नें गोमटीं । ईश्वरीं अर्पूनियां लुटी । आनंदाची करावी ॥ २७ ॥ हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ । सदासर्वदा संतुष्ट । नैराश्यबोधें ॥ २८ ॥ धरूनी ईश्वराची कास । केली संसाराची निरास । तयां भाविकां जगदीश । सबाह्य सांभाळी ॥ २९ ॥ जया संसाराचें दुःख । विवेकें वाटे परम सुख । संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोन पडती ॥ ३० ॥ जयांचा ईश्वरीं जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा । जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षयी ॥ ३१ ॥ ते अक्षय सुखें सुखावले । संसारदुःखें विसरले । विषयरंगीं वोरंगले । श्रीरंगरंगीं ॥ ३२ ॥ तयांस फावली नरदेहपेटी । केली ईश्वरेंसिं साटी । येरें अभाविकें करंटीं । नरदेह गेला ॥ ३३ ॥ अवचटें निधान जोडलें । तें कवडिच्या बदल नेलें । तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकाचें ॥ ३४ ॥ बहुत तपाचा सांठा । तेणें लाधला परीस गोटा । परी तो ठाईचा करंटा । भोगूंच नेणे ॥ ३५ ॥ तैसा संसारास आला । मायाजाळीं गुंडाळला ।

जे हरिभजनाला लागले त्यांची माय धन्य होय, त्यांनींच जन्माचें सार्थक केलें. ज्यांचा कैवार साक्षात् नारायणानें घेतला व आपल्या कांसेला लावून त्यानें भवसागराच्या पार नेलें त्यांची थोरवी काय वानूं ? अनंत जन्मांच्या शेवटीं यातायात चुकवून भगवंताची भेट करून देणारा हा नरदेह लाभून ज्यांनीं भावबळानें श्रीहरिरूप निजठेवा हस्तगत करून घेतला ते भाविकजन धन्य होत. त्यांचें जन्मोजन्मींचें पुण्य फळलें असेंच म्हटलें पाहिजे. आयुष्यरूप रत्नपेटींत दिव्य भजनरत्नें ठेवून ती पेटीच ईश्वराला अर्पण करून स्वानंद लुटावा (२१-२७). हरिभक्त हा लौकिक वैभव जवळ नसल्यामुळें कनिष्ठ वाटला तरी तो ब्रह्मादि देवांहूनही श्रेष्ठ आहे. कां कीं तो वैराग्यशिरोमणि नैराश्यबोधानें सर्वकाळ संतुष्ट असतो. ईश्वराची कांस धरून ज्यांनीं संसार तुच्छ केला, त्या भाविकांना देव अंतर्बाह्य संभाळतो (आंत षड्रिपूंपासून व बाहेर जगापासून), विवेक जागा असल्यामुळें संसारदुःखच त्यांना परम सुख वाटतें, इतर पामर मूर्ख संसारसुखावरच लुब्ध होऊन पडतात. ज्यांचें अंतरंग प्रेम ईश्वरावर त्यांना स्वानंदसुखाचा भोग घडतो, त्यांचें हरिनिधान अक्षय्य प्राप्त होतें. हें सामान्य जनांच्या कपाळीं कोठून असणार ? हे भक्त शाश्वत सुखोपभोगानें सुखरूप होतात, संसारदुःखें पार विसरून जातात व हे श्रीरंगांत रंगलेले (श्रीरंगरंगी) पुण्यात्मे विषयांच्या रंगाविषयीं (विषयसुखाविषयीं) पूर्ण विरक्त (निरिच्छ) असतात (वोरंगले). त्यांना नरदेह पेटी लाभून त्यांनीं ती देऊन ईश्वर जोडला (साटी + आदलाबदल , देवघेव) ; बाकीचे अभाविक करंटे जन नरदेह व्यर्थ दवडतात हेंच खरें (२८–३३). अकस्मात् अमूल्य रत्न मिळावें व तें कवडीच्या मोबदल्यांत देऊन टाकावें तसे अभाविक लोक बहुमोल नरदेह फुकट घालवितात. थोर तपश्चर्येच्या प्रभावानें परीस हातीं आला तरी मूळचा करंटा असेल तर त्या माणसाला त्याचा भोग घेतां येत नाहीं ; त्याप्रमाणें अभाविक दुर्लभ नरदेह व्यर्थ घालवून मायाजाळांत सांपडतो

अंतीं येकलाचि गेला । हात झाडुनी ॥ ३६ ॥ या नरदेहाचेनि संगती । बहुत पावले उत्तम गती । येकें बापुडीं यातायाती । वरपडीं जालीं ॥ ३७ ॥ या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें । नीच योनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ३८ ॥ कोण समय येईल कैसा । याचा न कळे किं भर्वसा । जैसे पक्षी दाही दिशा । उडोन जाती ॥ ३९ ॥ तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ । पुत्रकळत्रादि सकळ । विघडोन जाती ॥ ४० ॥ पाहिली घडी नव्हे आपुली । वयसा तरी निघोन गेली । देह पडतांच ठेविली । आहे नीच योनी ॥ ४१ ॥ श्वानशुकरादिक नीच याती । भोगणें घडे विपत्ती । तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥ मागां गर्भवासीं आटाटी । भोगितां जालासि रे हिंपुटी । तेथुनियां थोरा कष्टीं । सुटलासि दैवें ॥ ४३ ॥ दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचीं होतीं सर्वें । तैसेंचि पुढें येकलें जावें । लागेल बापा ॥ ४४ ॥ कैंची माता कैंचा पिता । कैंची बहिण कैंचा भ्राता । कैंचीं सुहृदें कैंची वनिता । पुत्रकळत्रादिक ॥ ४५ ॥ हे तूं जाण मावेचीं । आवघीं सोइरीं सुखाचीं । हे तुझ्या सुखदुःखाचीं । सांगाती नव्हती ॥ ४६ ॥ कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसी व्याकुळ । धन कण लक्ष्मी सकळ । जाइजणें ॥ ४७ ॥ कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार । जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ४८ ॥ कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचे सोहळे हावभाव । हें सकळही जाण माव । माईक माया ॥ ४९ ॥ येच क्षणीं मरोन जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें म्हणतोसी । म्हणोनियां ॥ ५० ॥ तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें

व अंतीं हात झाडून आला तसा जातो. या नरदेहाच्या संगतीनें अनेक उद्धरून गेले आहेत व अनेक जन्ममरणाच्या फेऱ्यांत फिरत आहेत. हा मिळाला आहे तर तात्काळ सत्संग धरून याचें कार्य करून घ्यावें. मागें खालच्या योनींत बहुत दुःख भोगलें, आतां कोणते वेळीं कसा प्रसंग ओढवेल याचा नेम नाहीं हें जाणून सावध व्हावें. अंगणांत एकत्र जमलेले पक्षी दशदिशेकडे उडून जातात, तसेंच या लोकींचें वैभव व पुत्रकलत्रमित्रांची जोड केव्हां फुटेल याचा काय नेम आहे? घडी भोगून सरली ती आपली राहिली नाहीं, वय सरत आलें, देह पडतांच पुन्हा श्वानसूकरादि नीच योनी प्राप्त होण्याचा व तेथलीं दुःखें येण्याचा संभव. त्या योनींत कांहीं मोक्षोपाय सांपडावयाचा नाहीं हें सारें मनांत आण व बापा! गर्भवासाचे कष्ट काय आहेत हें विचारून पहा. मागच्या सर्व जन्मांत अनेक आप्त स्वकीय झाले व त्यांना सोडून एकटेंच जावें लागलें आहे, तसेंच पुढें जावें लागेल. या संसारांत कोण कोणाचीं आहेत? आईबाप, बहीणभाऊ, इष्टमित्र, पुत्रकलत्र हीं सारीं मायेचीं आहेत, हीं सुखाचीं सोयरीं आहेत? दुःखाचीं वांटेकरी नव्हत. कैचा प्रपंच? कैचें कुळ? कां त्यांसाठीं व्याकुळ होतोस बरें? धन धान्य सर्व जाणारें (जाईजणें) म्ह. अशाश्वत आहे. माझें घर, माझा संसार, हा भार कां वाहतोस? व यांचा भार जन्मभर वाहिलास तरी शेवटीं यांना तूं सोडून जाणारच ना? तारुण्य, वैभव, सुखविलास सर्व मायिक आहे. याच क्षणीं मेलास तर 'मी माझें' हें फुकट जाऊन ईश्वराला मुकशील याचा

किती । स्त्रीकन्यापुत्र होती । लक्षानलक्ष ॥ ५१ ॥ कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मासी आलीं । तें तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥ तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार । आतां येक भगवंत साचार । धरीं भावार्थबळें ॥ ५३ ॥ येका दुर्भराकारणें । नाना नीचांची सेवा करणें । नाना स्तुती आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५४ ॥ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी । मां जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥ ५५ ॥ अहर्निशीं ज्या भगवंता । सकल जीवांची लागली चिंता । मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ५६ ॥ पृथ्वी धरिली धराधरें । प्रगट होइजे दिनकरें । ऐसी सृष्टी सत्तामात्रें चालवी जो कां ॥ ५७ ॥ ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव । जो सांभाळी सकळ जीव । कृपाळुपणें ॥ ५८ ॥ ऐसा सर्वात्मा श्रीराम । सांडून धरिती विषयकाम । ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥ ५९ ॥ रामेविण जे जे आस । तितुकी जाणावी निराश । माझें माझें सावकाश । सीणचि उरे ॥ ६० ॥ जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा । विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥ ६१ ॥ सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैंचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२ ॥ जयास वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळही त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥ जेथें वासना झोंबोन पडे । तेणेंचि अपाय दुःख जडे । म्हणोनि विषयवासना मोडे । तो येक सुखी ॥ ६४ ॥

विचार कर. मागच्या योनींत आईबाप, स्त्रीपुत्र लक्षावधि झालीं आहेत. कर्मयोगानें जन्म घेऊन एकत्र मिळालीं म्हणून पढतमूर्खा ! तीं आपलीं मानतोस, पण शरीर तुझें नव्हे, तेथें इतरांचा काय पाड ? आतां तरी सावध होऊन एक भगवंत भावबळें आपलासा करून घे (३४–५३). एका पोटासाठीं (दुर्भर=कितीही मिळवलें तरी न भरणारें) अनेक नीचांची मनधरणी करावी, सेवा करावी, स्तुतिस्तोत्रें गावीं, त्यांची आदबी (मर्यादा) राखावी, याप्रमाणें पोटाला घासभर गोळा देतो त्याला शरीर विकावें लागतें, मग ज्यानें जन्माला घातलें त्या परमेश्वराला कसें विसरावें ? रात्रंदिवस जो सकल जीवाची चिंता वाहतो, ज्याचे सत्तेनें मेघ वृष्टि करितात, समुद्र सीमा उल्लंघीत नाहीं, शेष पृथ्वीला स्वशिरावर वाहतो, सूर्य नियमानें प्रकाश देतो, याप्रमाणें केवळ सत्तामात्रानें सारें ब्रह्मांड चालविणारा देवाधिदेव—कीं ज्याच्या चातुर्याचा व कौशल्याचा (लाघव) थांग लागत नाहीं. तो सकळ जीवांचा परकृपेनें सांभाळ करितो. अशा सर्वात्मा श्रीरामाला विसरून जे चित्तांत विषयाचें ध्यान करितात ते प्राणी दुरात्मे ('दुरात्मा म्हणजे दूर आत्मा अंतरला जया') व निकृष्ट होत. रामावांचून जी जी आशा ती दुराशा व ती विफल व्हावयाचीच, माझें माझें करीत बसला तर फळ क्लेश मिळायचेंच. ज्याला शीण पाहिजे त्यानें खुशाल विषयांचें चिंतन करावें, कां कीं विषय न मिळाले कीं जीव तळमळूं लागतो. आनंदघन असा राम सोडून ज्याचें मन विषयचिंतनांत निमग्न झालें त्या विषयलंपट पुरुषाला समाधान (समाधिसुख) कोठचें मिळणार ? ज्याला निव्वळ सुखच पाहिजे त्यानें दुःखपरिणामी अशी स्वजनांची संगति सोडून श्रीरामभजनाला लागावें (५४–६३). वासना झोंबून गळां पडली कीं तिच्या संगतीनेंच सारीं विघ्नें व दुःखें प्राप्त होतात, म्हणून ज्याची विषयवासना समूळ गेली तोच एक खरा सुखी

विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख । पूर्वीं गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५ ॥ गळ गिळितां सुख वाटे । वोढून घेतां घसा फाटे । कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊन पळतां ॥ ६६ ॥ तैसी विषयसुखाची गोडी । गोड वाटे परी ते कुडी । म्हणोनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७ ॥ ऐकोनि बोल भाविक । कैसेंनि घडे जी सार्थक । सांगा स्वामी यमलोक । चुके जेणें ॥ ६८ ॥ देवासीं वास्तव्य कोठें । तो मज कैसेंनि भेटे । दुःखमूळ संसार तुटे । कोणेपरी स्वामी ॥ ६९ ॥ धडपुडी भगवत्प्राप्ती । होऊन चुके अधोगती । ऐसा उपाय कृपामूर्ती । मज दीनास करावा ॥ ७० ॥ वक्ता म्हणे हो येक भावें । भगवद्भजन करावें । तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ ७१ ॥ कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन । भगवद्भजनाचें लक्षण । मज निरोपावें ॥ ७२ ॥ ऐसा म्लानवदनें बोले । धरिले सदृढ पाउलें । कंठ सद्गदित गळाले । अश्रुपात दुःखें ॥ ७३ ॥ देखोनी शिष्याची अनन्यता । भावें बोळला सद्गुरु दाता । स्वानंद तुंबळेल आतां । पुढिले समासीं ॥ ७४ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वैराग्यनिरूपणनाम समास दशम ॥ १० ॥

होय. विषयसंगतींत जें सुख म्हणून वाटतें तेंच दुःखरूप होतें. सेवन करितांना आरंभीं सुख व शेवटीं दुःख असा विषयसुखाचा स्वभाव निश्चित आहे. माशाला गळ गिळितांना गोड वाटतें पण तो गळच त्याला ओढूं लागला कीं त्याचा घसा फाटून तो मरण पावतो. हरिण चारा तोंडांत धरून चाललें पण गाणें कानांवर पडलें कीं नादलुब्धतेमुळें तें खोड्यांत पडतें. असाच विषयसुखाचा प्रकार आहे. तें आधीं गोड वाटतें, पण विषयवासना वाईट (कुडी) आहे. म्हणून ती सोडून रामभजनाची गोडी धरावी (६४–६७). हें सर्व निरूपण ऐकून एका भाविक श्रोत्यानें प्रश्न केला कीं, 'हें सारें खरें, पण देव कोठें आहे ? तो भेटतो कसा ? हा दुःखमूळ संसार व यमयातना चुकून जन्मसाफल्य कसें होतें ? हें सर्व कृपा करून मला सांगावें.' (६८–७०) वक्त्यानें उत्तर केलें, 'एकनिष्ठपणानें भगवद्भजन करावें, म्हणजे या सर्व प्रश्नांचें उत्तर मिळून समाधान होईल.' (७१) 'तर मग भगवद्भजन कसें करावें, मनास कोठ गुंतवावें, भजनाचें लक्षण काय तें मला सांगा' असें दीन होऊन श्रोत्यानें वक्त्यास विचारलें, शिष्यभावानें त्यानें बळकट चरण धरिले, त्याचा कंठ सद्गदित झाला, त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या (७२–७३). ही शिष्याची अनन्यता पाहून कैवल्यदाता श्रीगुरु प्रसन्न झाला व त्यानें नवविधा भक्तीचें निरूपण केलें, पण ते स्वानंदसागराला भरती आणणारें गोड व्याख्यान पुढील दशकांत सांगूं (७४). [द. ३, स. १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ नवविधाभक्तिनाम चतुर्थ दशक ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ जयजयजी गणनाथा । तूं विद्यावैभवें समर्था । अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥ १ ॥ नमूं शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी । मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपें ॥ २ ॥ आतां आठऊं सद्गुरु । जो पराचाहि परु । जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ॥ ३ ॥ श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें । म्हणोनी बोलिलें स्वभावें । ग्रंथांतरीं ॥ ४ ॥ सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन । सच्छास्त्रीं बोलिलें पावन । होइजे येणें ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ (स्कंद ७।५।२३)

श्रवण कीर्तन विष्णोःस्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । ऐसें हे नवविधा ॥ ६ ॥ नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढें प्रांजळ केलें । श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां ॥ ७ ॥ प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराणश्रवण । नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ ८ ॥ कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ॥ ९ ॥ नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे । नाना दानांचे महिमे । ऐकत जावे ॥ १० ॥ नाना माहात्में नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें । नाना

हे गणनाथा ! तूं विद्येच्या ऐश्वर्यानें संपन्न आहेस. अध्यात्मविद्येचें रहस्य माझ्या मुखानें बोलीव. हे वेदमाते शारदे ! सर्व सिद्धि तुझ्या प्रसादानें प्राप्त होतात; तूंच फलद्रुप होऊन मनाला मननमार्गाला लावलें आहेस. तुला वंदन असो. आतां परात्पर सद्गुरु कीं ज्यांच्या कृपेनें ज्ञानविचार कळूं लागतो त्यांचें चिंतन करूं (१–३). भगवद्भजन कसें करावें असें श्रोत्यांनीं विचारिलें आहे त्यांस ग्रंथांतरीं काय सांगितलें आहे तें सांगतों. श्रीमद्भागवत हें सच्छास्त्र आहे. त्यांत (स्कंध ७, अ. ५) प्रल्हादमुखानें भक्तीचे नवविधा प्रकार सांगितले आहेत ते पुढें स्पष्ट करून सांगतों, एकाग्रतेनें ऐकावे. श्रवण, कीर्तन, विष्णुस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन असे भक्तीचे नऊ प्रकार तेथें सांगितले आहेत (४–७). पहिली 'श्रवण' भक्ति. 'हरिकथापुराणश्रवण किंवा अध्यात्मनिरूपण' ही श्रवणभक्ति होय. (परमात्मा सगुणनिर्गुण उभयरूप असल्यामुळें त्याच्या सगुणलीला एकाव्यात व अध्यात्म ऐकावें म्हणजे सगुण चरित्रश्रवणानें भक्तिभावाचें उद्दीपन होतें व अध्यात्मश्रवणानें ज्ञानबोध होतो व याप्रमाणें ज्ञानभक्तीचा लाभ होतो.) ही श्रवणभक्ति होय (८). सगळेंच ऐकावें. कर्ममार्ग, उपासनामार्ग, ज्ञानमार्ग, गुरुभक्तिमार्ग, योगमार्ग, वैराग्यमार्ग हे सर्व ऐकावे. अनेक व्रतांचे, तीर्थांचे, दानांचे, क्षेत्रांचे महिमे

तपें पुरश्चरणें। ऐकत जावीं ॥ ११ ॥ दुग्धाहारी निराहारी। फळाहारी पर्णाहारी। तृणाहारी नानाहारी। कैसे ते ऐकावे ॥ १२ ॥ उष्णवास जळवास। सीतवास आरण्यवास। भूगर्भ आणी आकाशवास। कैसे ते ऐकावे ॥ १३ ॥ जपी तपी तामस योगी। नाना निग्रह हटयोगी। शाक्तआगम आघोरयोगी। कैसे ते ऐकावे ॥ १४ ॥ नाना मुद्रा नाना आसनें। नाना देखणीं लक्षस्थानें। पिंडज्ञानें तत्वज्ञानें। कैसीं तीं ऐकावीं ॥ १५ ॥ नाना पिंडांची रचना। नाना भूगोळरचना। नाना सृष्टीची रचना। कैसी ते ऐकावी ॥ १६ ॥ चंद्र-सूर्य-तारा-मंडळें। ग्रहमंडळें मेघमंडळें। येकवीस स्वर्गें सप्त पाताळें। कैसीं तें ऐकावीं ॥ १७ ॥ ब्रह्माविष्णुमहेशस्थानें। इन्द्रदेवऋषिस्थानें। वायोवरुणकुबेरस्थानें। कैसीं तें ऐकावीं ॥ १८ ॥ नव खंडें चौदा भुवनें। अष्ट दिग्पाळांचीं स्थानें। नाना वनें उपवनें गहनें। कैसीं तें ऐकावीं ॥ १९ ॥ गण गंधर्व विद्याधर। येक्ष किन्नर नारद तुंबर। अष्ट नायका संगीतविचार। कैसा तो ऐकावा ॥ २० ॥ रागज्ञान ताळज्ञान। नृत्यज्ञान वाद्यज्ञान। अमृतवेळ प्रसंगज्ञान। कैसें तें ऐकावें ॥ २१ ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा। सामुद्रिक लक्षणें सकळ कळा। बत्तीस लक्षणें नाना कळा। कैशा त्या ऐकाव्या ॥ २२ ॥ मंत्र मोहरे तोटके सिद्धी। नाना वल्ली नाना औषधी। धातु रसायण बुद्धी। नाडिज्ञानें ऐकावीं ॥ २३ ॥ कोण्या दोषें कोण रोग। कोणा रोगास कोण प्रयोग। कोण्या प्रयोगास कोण योग। साधे तो ऐकावा ॥ २४ ॥ रवरवादि कुंभपाक। नाना यातना येमलोक। सुखदुःखादि स्वर्गनर्क। कैसा तो ऐकावा ॥ २५ ॥ कैशा नवविधा भक्ती। कैशा चतुर्विधा मुक्ती। कैसी पाविजे उत्तम गती। ऐसें हें ऐकावें ॥ २६ ॥ पिंडब्रह्मांडाची रचना। नाना तत्वविवंचना। सारासार विचारणा। कैसी ते ऐकावी ॥ २७ ॥ सायोज्यता मुक्ती कैसी

ऐकत असावे. अनेक मंत्र, अनेक साधनें, अनेक तपें पुरश्चरणें ऐकत असावींत. दुग्धाहारी, निराहारी, फळपर्णाहारी, तृणाहारी कैसे ते ऐकावे. उष्णवास, जळवास, शीतवास, अरण्यवास, आकाशवास, भूगर्भवास (पृथ्वीच्या पोटांत पुरून घेऊन साधन करणें) हे सर्व कैसे ते ऐकावे. जपी, तपी, नानानिग्रही, हटयोगी, शाक्तमार्ग भूतप्रेतसमंधादि साधन करणारे अघोरपंथी, अनेक मुद्रा व आसनें करणारे; पिंडज्ञान, तत्त्वज्ञान, भूगोलरचना, नानाविध सृष्टिरचनेचे प्रकार, चंद्रसूर्य तारामंडळांचें, ग्रहमंडळांचें व मेघमंडळांचें वर्णन करणारे नानाविधग्रंथ, ब्रह्मादि देवांचीं स्थानें, नव खंडें व चौदा भुवनें, नानाविध वनोपवनें यांचीं वर्णनें हे सर्व कैसे ते ऐकावे (९–१९). यक्षगंधर्वादि अतिमानुष योनींचीं वर्णनें, संगीत, रागज्ञान, तालज्ञान, नृत्यज्ञान, वाद्यज्ञान, शुभकाळवेळज्ञान, नानाप्रसंगज्ञान, सामुद्रिक ज्ञान, मंत्रौषधि, अनेक तोडगे, नानारोग व तन्निवारक प्रयोग, स्वर्गनरकादि सर्व लोकांचें ज्ञान, औषधीज्ञान, नाडीपरीक्षाज्ञान, इ. 'चौदा विद्या चौसष्ट कला' सर्व कांहीं ऐकावें (२०–२५). नवविधा भक्ति कोणती, चतुर्विधा मुक्ति कोणती, उत्तम गति कशी होते, हें सर्व ऐकून घ्यावें. पिंडब्रह्मांडरचना, नानातत्त्वांचा

होते । कैसें पाविजे मोक्षातें । या कारणें नाना मतें । शोधीत जावीं ॥ २८ ॥ वेद शास्त्रें आणी पुराणें । माहावाक्यांचीं विवरणें । तनुचतुष्टयनिर्शनें । कैसीं तें ऐकावीं ॥ २९ ॥ ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें । असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती ॥ ३० ॥ सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां तें निर्गुण अध्यात्में शोधावीं । श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ ३१ ॥ सगुण देवाचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्वें यंत्रें । हे दोनी परम पवित्रें । ऐकत जावीं ॥ ३२ ॥ जयंत्या उपोषणें पूजाविधानें । मंत्र यंत्र जप ध्यानें । कीर्ति स्तुती स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ॥ ३३ ॥ ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें । विभक्ती सांडून भक्तीचें । मूळ शोधावें ॥ ३४ ॥ श्रवणभक्तीचें निरूपण । निरोपिलें असे जाण । पुढें कीर्तनभजनाचें लक्षण । बोलिलें असे ॥ ३५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्य-संवादे श्रवणभक्तिनिरूपणनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें । त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ॥ १ ॥ सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ति वाढवावी । अखंड वैखरी वदवावी । यथायोग्य ॥ २ ॥ बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रन्थांतर । भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ३ ॥ आपुलिया सुखस्वार्थी । केलीच करावी हरिकथा । हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ॥ ४ ॥ नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा । हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ॥ ५ ॥ मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी । सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ॥ ६ ॥

विचार, सारासार म्ह० ब्रह्ममायानिरूपण, मोक्षप्राप्तीचा उपाय हे सर्व माहीत असावे व यासाठीं 'नानामतें शोधीत जावीं' (२६–२८). वेद, शास्त्रें, पुराणें, महावाक्यांचीं विवरणें, चौदेहांच्या निरसनाचे प्रकार हें ऐकावें (२९). असो. हें सर्व कांहीं ऐकावें; परंतु त्यांतील सार शोधून घ्यावें व असार जाणून त्यागावें. याचें नांव श्रवणभक्ति. सगुणचरित्रें ऐकावीं व निर्गुण अध्यात्में शोधावीं-हीं दोन्ही परम पवित्र आहेत. जयंत्या, उपोषणें, मंत्र-यंत्र-जपध्यानें, नानाप्रकारचीं भजनें व स्तवनें ऐकत जावीं (३०–३३). याप्रमाणें सर्व ऐकून सगुण चरित्रें व अध्यात्मनिरूपणें मनीं धरावीं व विभक्ति (वेगळेपण) सोडून भक्तीचें (तादात्म्यतेचें) मूळ शोधावें (३४). श्रवणभक्ति सांगितली, आतां कीर्तनभक्ति ऐका (३५). [द. ४, स. १]

सगुण हरिकथा करावी, भगवत्कीर्ति वाढवावी, वाणीनें हरिनामगुणकीर्तन करावें ही कीर्तन भक्ति होय. बहुत पाठांतर करावें, निरूप्य विषयांचा अर्थ कंठांत ठेवावा व (असा अभ्यास दृढ झाला म्हणजे) कीर्तनास उभें रहावें. हरिकथा निरंतर करावी, त्यावांचून राहूं नये; मात्र (दुसऱ्या कोणत्याही क्षुद्र कामना चित्तांत न ठेवतां) आपल्या सुखस्वार्थासाठींच हरिकथा करावी. नित्य नवा अभ्यास ठेवावा, बहु उद्योग करून हव्यास धरून कीर्तनसाहित्य संपादावें व हरिकीर्तनानें ब्रह्मांड भरून टाकावें. कीर्तनाची मनापासून आवड धरावी, त्याची चित्तांत अत्यंत गोडी असावी, कीर्तनास अति तत्पर असावें (१–६).

भगवंतास कीर्तन प्रिय । कीर्तनें समाधान होय । बहुत जनासी उपाय । हरिकीर्तनें कलियुगीं ॥ ७ ॥ विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं आळंकारभूषणें । ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी ॥ ८ ॥ यशकीर्तिप्रतापमहिमा । आवडीं वर्णावा परमात्मा । जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होय ॥ ९ ॥ कथाअन्वय लापणिका । नामघोष करताळिका । प्रसंगें बोलाव्या अनेका । धातमाता नेमस्त ॥ १० ॥ ताळ मृदंग हरिकीर्तन । संगीत नृत्य तानमान । नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावें ॥ ११ ॥ करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें । श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ १२ ॥ कंप रोमांच स्फुराणें । प्रेमाश्रुसहित गाणें । देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ॥ १३ ॥ पदें दोहडे श्लोक प्रबंद । धाटी मुद्रा अनेक छंद । बीरभाटीव विनोद । प्रसंगें करावें ॥ १४ ॥ नाना नवरसिक शृंगारिक । गद्यपद्याचें कौतुक । नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥ १५ ॥ भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण । साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥ १६ ॥ प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी । निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ १७ ॥ पूर्वपक्ष त्यागून सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त । बहुधा बोलणें अव्यवस्त । बोलोंचि नये ॥ १८ ॥ करावें वेदपरायण । सांगावें जनासी पुराण । मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ॥ १९ ॥ ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें । गुरुपरंपरा

कीर्तनानें परमात्मा संतुष्ट होतो, स्वतःच्या जीवाला समाधान होतें व बहुत जनांस उद्धाराचा मार्ग लागतो. हे तीनही लाभ या कलियुगांत कीर्तनानें होतात (७). कीर्तनांत देवाचीं अनेक ध्यानें वर्णावींत. देवाच्या अंगावर सुंदर वस्त्रालंकार घालून त्याचें रम्य रूप ध्यानीं धरून व तें लक्षून बोलावें. देवाचा यशकीर्तिप्रतापमहिमा वर्णावा-असा कीं तो ऐकून भगवद्भक्तांना सुखाचा डोल यावा (८-९). कथेचा अन्वय-धागा, संबंध-न सोडतां शब्द (लापणिका) बोलावे व टाळी वाजवून नामघोष करावा व करवावा. प्रसंगें म्ह. मधून मधून (भक्तिज्ञानाच्या उद्बोधक अशा) कल्पित गोष्टी (धात) व घडलेल्या गोष्टी (मात) नेमस्त म्ह. थोडक्यांत सांगाव्या. त्या गोष्टींत वाहवूं नये (१०). ताळ, मृदंग, तानमान सर्व असावें; पण कथानुसंधान न सोडतां बोलावें, कथेंत सप्रेमभरित होऊन देवाची करुणा भाकावी, व त्या प्रेमाच्या प्रवाहांत घडघडाटानें कीर्तन चालवून श्रोत्यांना तन्मय करावें. चित्त कोरडें नसावें. कंप, रोमांच, स्फुरणें, सहज प्रगट होतील असे प्रेमाश्रुसहित गुणानुवाद करावे, व देवापुढें लोटांगण घालावें (११-१३). कीर्तनाच्या ओघांत अनेक प्रेमळ पदें, दोहरे, श्लोक, प्रबंद, अनेक धाटीचे व अनेक छंदाचे म्हणावेत व प्रसंगानें वीररसात्मक भाषणें व क्वचित् सभ्य विनोदही असावा. शास्त्राधारें गद्यपद्याचे नाना रसात्मक प्रकार बोलावेत (१४-१५). कीर्तनप्रसंगीं भक्तिज्ञानवैराग्याचीं लक्षणें सांगावीं, नीतिन्यायाचें मंडण करावें, स्वधर्मरक्षणाचे उपाय सुचवावेत, साधनमार्ग संभाळून अध्यात्मनिरूपण करावें; हें सर्व प्रांजळ म्ह. स्पष्ट, संदेहरहित असें बोलावें. सगुणकीर्ति व अध्यात्मविवरण प्रसंग पाहून करावें. पूर्वपक्ष मोडून सिद्धांताचें बोलणें बोलावें, पण नेमस्त बोलावें म्ह. बहकूं नये, अव्यवस्थित बोलूं नये (१६-१८). वेदपारायण करावें, जनांस पुराण सांगावें, मायाब्रह्मीचें विवरण संपूर्ण करावें (१९). आदरपूर्वक ब्राह्मण्य रक्षावें. उपासनामार्ग चालवावे व निष्ठेनें गुरुपरंपरा सांभाळावी. वैराग्यापासून

निर्धारें । चळोंच नेदावीं ॥ २० ॥ करावें वैराग्य-रक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण । परमदक्ष विचक्षण । सर्वही सांभाळी ॥ २१ ॥ कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे । नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ २२ ॥ सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण । सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ २३ ॥ असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे प्रत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ २४ ॥ सकळ रक्षून ज्ञान सांगें । जेणें वेदाज्ञा न भंगे । उत्तम सन्मार्ग लागे । प्राणिमात्रांसी ॥ २५ ॥ असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन । या नांव भगवद्भजन । दुसरी भक्ती ॥ २६ ॥ कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती । कीर्तनें भगवत्प्राप्ती । यदर्थीं संदेह नाहीं ॥ २७॥ कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होय सत्पात्र । हरिकीर्तनें प्राणिमात्र । सुशीळ होती ॥ २८ ॥ कीर्तनें अव्यग्रता घडे । कीर्तनें निश्चय सांपडे । कीर्तनें संदेह उडे । श्रोतयांवक्तयांचा ॥ २९ ॥ सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण । तेणें नारद तोचि नारायण । बोलिजेत आहे ॥ ३० ॥ म्हणोनी कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा । सकळ तीर्थें आणि जगदात्मा । कीर्तनीं वसे ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कीर्तन-भजननिरूपण-नाम समास द्वितीय ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥ मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन । आतां ऐका 'विष्णोः स्मरण' । तिसरी भक्ती ॥ १ ॥ स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावें । समाधान ॥ २ ॥ नित्यनेम प्रातःकाळीं ।

चळूं नये. ज्ञानलक्षणें अंगीं बाणवावीं. जो चतुर व दक्ष आहे तो हें संभाळीत असतो. श्रोत्यांच्या मनांत संशय वाढतील, त्यांचें समाधान मोडेल व नीतिन्यायसाधनांत बिघाड होईल असें कीर्तनांत कांहींही बोलूं नये (२०–२२). सगुणाचीं चरित्रें गाणें याचें नांव कीर्तन व अद्वैत-प्रतिपादन याचें नांव निरूपण. अद्वैत सांगतांनाही सगुणप्रेम मोडूं नये. असो. वक्तृत्वाचा अधिकार फार मोठा आहे, तो खचित लहान माणसाचा नाहीं. वक्ता अनुभवाचाच पाहिजे, म्हणजे तो सकळ रक्षून—सर्व बाजू संभाळून—ज्ञान सांगेल कीं जेणेंकरून वेदाज्ञाभंग नै होतां मनुष्यमात्रास सन्मार्ग लागेल (२३–२५). अथवा हें ज्याला झेंपणार नाहीं त्यानें त्यांत न पडतां देवाचे सप्रेम गुणानुवाद गावे. हीदेखील कीर्तनभक्तिच होय (२६). कीर्तनानें महापातकें नष्ट होतात, उत्तम गति मिळते, भगवत्प्राप्ति होते. कीर्तनानें वाणी पवित्र होते, मनुष्याची पात्रता वाढते, प्राणिमात्र सुशील होतात. कीर्तनानें चित्तव्यग्रता मोडून चित्त एकाग्र होतें, निश्चय म्ह. आत्मबुद्धीचा निश्चय सांपडतो, श्रोते-वक्ते निःसंदेह होतात. नारद सर्वकाळ कीर्तन करीत असल्यामुळेंच नारायणरूप मानले जातात. म्हणून कीर्तनाचा महिमा अगाध आहे. कीर्तनानें परमात्मा संतुष्ट होतो. सर्व तीर्थें व देव कीर्तनांत खडे असतात (२७–३१) [द. ४, स. २]

तिसरी नामस्मरणभक्ति होय. नामीचें म्ह. ज्याचें नामस्मरण करायचें त्या देवाचें स्मरण करावें, त्याचें नाम अखंड गावें व समाधान पावावें ही स्मरणभक्ति होय. नित्यनेमानें सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं—सर्वच काळीं नामस्मरण करावें.

माध्यानकाळीं सायंकाळीं । नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥ सुखदुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ ४ ॥ हर्षकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं । विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ५ ॥ कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट । अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥ चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ७ ॥ संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती । नामस्मरणची स्थिती । सांडूंच नये ॥ ८ ॥ वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां । उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ९ ॥ आधीं अवदसा मग दसा । अथवा दसेउपरि अवदसा । प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ १० ॥ नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥ भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगृहो ब्राह्मणसमंध । मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ १२ ॥ नामें विषबाधा हरती । नामें चेडें चेटकें नासती । नामें होय उत्तम गती । अंतकाळीं ॥ १३ ॥ बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिण काळीं वृद्धापकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥ नमाचा महिमा जाणे शंकर । जनां उपदेशी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ॥ १५ ॥ उफराट्या नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठीं । भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ १६ ॥ हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला । नारायणनामें पावन जाला । अजामेळ ॥ १७ ॥

दुःखचिंतेनें चित्त व्यग्र असतां किंवा सुखांत आनंदांत असतां नामावांचून राहूं नये. सुखकाळीं व संकटकाळीं, पर्वकाळीं व कार्यारंभीं, निद्राविश्रांतिकाळीं नामस्मरण करावें. कांहीं संकट कोडें (जडभारी) पडलें असतां संसाराच्या नाना खटपटींत असतां, अवस्था लागतां म्ह. उदासीनता आली असतां नामस्मरण करावें. सर्व संसारकार्यें करीत असतां किंवा उपभोग-काळींही नाम विसरूं नये. काळचक्राप्रमाणें संपत्काळ येवो वा विपत्काळ येवो, नामस्मरणाची स्थिति कधींच सोडूं नये. सत्तासामर्थ्य अंगीं असतां व उत्कट भाग्यश्रीचा भोग घडत असतांहि नाम विसरूं नये. आधीं अवदशा आणि मग सुदशा किंवा आधीं सुस्थिति व मग दुःस्थिति—कसाही प्रसंग आला तरी नाम सोडूं नये (१–१०). विघ्नें नामानें दूर होतात व उत्तम पद प्राप्त होतें. भूतपिशाचसमंधादि पीडा, मंत्रचळ म्ह. मंत्रप्रयोगांतल्या चुकीमुळें लागणारें वेड, अथवा नानाप्रकारची व्यग्रता नामनिष्ठेनें नाहींशी होऊन जाते. नामानें विषबाधा हरते, चेडें-चेटकें नष्ट होतात, व अंतकाळीं सद्गति मिळते (११–१३). बाल्य, तारुण्य, वार्धक्य, सर्वकाळीं नामस्मरण करावें. नाममहिमा शंकर जाणतात व काशीक्षेत्रीं प्राण्यांस राममंत्रोपदेश करून ते सोडवितात, आणि म्हणून तर काशीला मुक्तिक्षेत्र असें म्हणतात. रामाऐवजीं 'मरा मरा' असें उरफाटें नांव घेऊनही वाल्ह्याकोळ्याचे वाल्मीक ऋषि झाले व त्यांनीं शतकोटि रामायण रामावतारापूर्वींच लिहून ठेविलें. हरिनामानें प्रल्हाद तरला व अनेक आघातांपासून सुटला. नारायणनामानें सेतुबंधप्रसंगीं समुद्रावर पाषाण तरले. नामानें

नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । महापापी तेचि जाले । परमपवित्र ॥१८॥ परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां यमें । बाधिजेना ॥ १९ ॥ सहस्रनामांमधें कोणीयेक । म्हणतां होतसे सार्थक । नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ॥ २० ॥ कांहींच न करूनि प्राणि । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळीं ॥२१॥ नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर । महांदोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥२२॥ अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला । हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ २३ ॥ चहूं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर । जड मूढ पैलपार । पावती नामें ॥२४॥ म्हणोनी नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें । तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनाम समास तृतीय ॥ ३ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण । आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती ॥ १ ॥ पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचा-मनोभावें । सद्गुरुचे पाय सेवावे । सद्गतीकारणें ॥ २ ॥ या नांव पादसेवन । सद्गुरुपदीं अनन्यपण । निरसावया जन्ममरण । यातायाती ॥ ३ ॥ सद्गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाव तों नाहीं । याकारणें लवलाहीं । सद्गुरुपाय सेवावे ॥ ४ ॥ सद्वस्तु दाखवी सद्गुरु । सकळ सारासारविचारु । परब्रह्माचा निर्धारु । अंतरीं बाणे ॥ ५ ॥ जे वस्तु दृष्टीस दिसेना । आणी मनास

असंख्य भक्त उद्धरून गेले, महापापी तेच नामबळानें पुण्यवान झाले (१४–१८). देवाचीं अनंत नामें आहेत. त्याच्या सहस्रनामांपैकीं कोणत्याही एका नामाचा जप केला तरी सार्थक होतें. पुण्यश्लोकाचें नाम घेणाराही पुण्यश्लोकच होतो. दुसरें कोणतेंही साधन न करितां केवळ नामस्मरणानेंही परमात्मा संतुष्ट होतो व तो चक्रपाणी स्वभक्तांचा सांभाळ करितो. निरंतर नामस्मरण करीत आहे तर तें पुण्यशरीरच आहे. दोषांचे डोंगर पूर्वीं झाले असले तरी ते नामप्रतापानें भस्म होऊन जातात. नाममहिमा अगाध आहे, तो वर्णन करितां येणार नाहीं, नामानें बहुत जीव उद्धरले आहेत, प्रत्यक्ष शंकर रामनामस्मरणानें हलाहलविषापासून सुटले आहेत. चारही वर्णांच्या सर्व लोकांस नामस्मरणाचा अधिकार आहे, नामाच्या ठिकाणीं लहान-थोर हा भेद नाहीं. जड-मूढ नामानें भवसागर उतरून जातात. म्हणून देवाचें रूप मनांत आठवावें व अखंड नाम स्मरावें. तिसरी नामभक्ति ह्याप्रमाणें निरूपिली आहे (१९–२५). [द. ४, स. ३]

कायेनें, वाचेनें व मनानें सद्गुरुचरणाची मोक्षप्राप्त्यर्थ सेवा करणें ह्याचें नांव ' पादसेवन ' भक्ति होय. जन्म-मृत्यूची यातायात चुकविण्यासाठीं सद्गुरूला अनन्य शरण असावें. सद्गुरूच्या कृपेवांचून संसाराच्या महासागरांतून तरून जाण्याचा दुसरा मार्ग नाहीं. म्हणून उठाउठी सद्गुरुचरण सेवावे (१–४). ब्रह्मस्वरूपाची ओळख सद्गुरूच करवितात ; सारासारविचार त्यांच्या कृपेनें होऊन परब्रह्मवस्तूचा निर्धार बाणतो (५). वस्तु चर्मचक्षूला दिसत नाहीं, तिचें मनास आकलन होत

तेही भासेना । संगत्यागेंविण येना । अनुभवासी ॥ ६ ॥ अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागें अनुभव न दिसे । हें अनुभवीयासीच भासे । येरां गथागोवी ॥ ७ ॥ संगत्याग आणी निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण । सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तही येकरूप ॥ ८ ॥ याहीवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें । सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागे ॥ ९ ॥ वेद वेदगर्भ वेदांत । सिद्धभाव गर्भसिद्धांत । अनुभव अनुर्वाच्य धादांत । सत्य वस्तु ॥ १० ॥ बहुधा अनुभवाचीं आंगें । सकळ कळती संतसंगें । चौथे भक्तीचे प्रसंगें । गोप्य तें प्रगटे ॥ ११ ॥ प्रगट वसोनि नसे । गोप्य वसोनि भासे । भासाऽभासाहून अनारिसे । गुरुगम्य मार्ग ॥ १२ ॥ मार्ग होये अंतरिक्ष । जेथें सर्वही पूर्वपक्ष । पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ॥ १३ ॥ लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें । तें गे तेंचि आपण व्हावें । त्रिविधा प्रचिती ॥ १४ ॥ असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें । सत्संगेंकरून सत्योत्तरें । प्रत्यया येती ॥ १५ ॥ सत्य पाहातां नाहीं असत्य । असत्य पाहातां नाहीं सत्य । सत्याऽसत्याचें कृत्य । पाहणारापासीं ॥ १६ ॥ पाहणार पाहणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जालें । तरी मग जाणावें बाणलें । समाधान ॥ १७ ॥ नाना साधनें

नाहीं, व संगत्याग झाल्यावांचून म्ह. असंग झाल्यावांचून तिचा अनुभवही होत नाहीं (६). अनुभव घ्यावयाला जातां संगत्याग होत नाहीं (कारण अनुभव घ्यावयाचा म्हटलें म्हणजे अनुभव, अनुभविता व अनुभाव्य ही त्रिपुटी उत्पन्न होते) व संगत्याग झाल्याविणा अनुभव दिसत नाहीं. हें अनुभवी जो आहे त्यालाच कळतें, वरकडांस हा सारा गोंधळच वाटावयाचा (७). संगत्याग, आत्मनिवेदन, विदेहस्थिति, अलिप्तपणा, सहजावस्था, उन्मनी, विज्ञान हे सप्तही एकरूप आहेत. समाधान म्ह. समाधिसुख किंवा स्वरूपस्थिति दर्शविणारीं हीं संकेतचिन्हें आहेत. एका समाधानाचींच हीं सात नांवें आहेत. हींच नांवें काय पण वेद, वेदगर्भ, वेदांत, सिद्धभाव, रहस्य, अनिर्वाच्यपण, उघडा (धादांत) अनुभव हींही इतर नांवें सद्वस्तु ओळखण्याचींच चिन्हें आहेत, अनुभवाचीं हीं सर्व अंगें पादसेवनभक्तींत उमजूं लागतात, व गोप्य (गुह्य) उकलतें, कळून येतें, पादसेवनभक्तींत हा मार्ग दिसूं लागतो. म्हणून ह्याला गुरुगम्य मार्ग म्हणतात. हा उघडा असून दिसत नाहीं व दिसत असून गुप्त आहे म्हणून ह्याला प्रगट ना गुप्त (भासाभासाहून अनारिसा) असें म्हणतात. हा मार्ग आहे पण हा अंतरिक्ष मार्ग आहे म्ह. आंत (अंतः) पाहतां-पाहतां (ईक्ष) दिसत जाणारा आहे (अंतरिक्ष म्ह. आकाश. ह्यालाच पूर्वी (द. १, स. ९, ओंवी ५) ‘ आकाशमार्गी गुप्त पंथ ’ असें म्हटलें आहे. स्थूळांत सूक्ष्म, सूक्ष्मांत कारण, कारणाच्या पलीकडे ज्ञान, त्यापलीकडे द्रष्टा व त्याच्याही पलीकडे सद्वस्तु असा आंत विवेकदृष्टीनें पाहतां-पाहतां आढळणारा हा मार्ग आहे म्हणून ह्याला अंतरिक्ष पंथ किंवा आकाशमार्गी गुप्त पंथ असें म्हटलें आहे.) जेथून पाहतां शास्त्रें, साधनें सर्वही पूर्वपक्षांत येतात, तो साक्षी होऊन पाहूं जातां अलक्ष्य आहे म्ह. लक्षिला जात नाहीं. लक्ष्याचें जें लक्ष्य व ध्यानाचें जें ध्येय तें त्रिविधप्रचीतीनें आपणच होऊन जावयाचें आहे. (शास्त्रसिद्धांत, गुरूचा उपदेश व स्वतःचा अनुभव हे तिन्ही एकवटले म्हणजे ही त्रिविधप्रचीति झाली). असो. हीं सारीं अनुभवाचीं द्वारें सत्संगतीनें व स्वतःच्या सारासारविचारानें निश्चयात्मक कळून येतात (८–१५). सत्य म्ह. ब्रह्म पाहतां असत्य म्ह. माया नाहीं, व माया असतां ब्रह्म नाहीं. सत्य अथवा असत्य ह्याचा संबंध पाहणाराकडेच येतो. पाहणारा म्ह. द्रष्टा व पाहणें म्ह. दर्शन ज्याला म्ह. द्रष्ट्याला लागलें (द्रष्ट्याच्या ठायीं लीन झालें) अर्थात् त्रिपुटी मावळली कीं समाधान तात्काळ बाणतेंच. अनेक साधनें केलीं तीं सद्गुरु-

पाहतां । बाणतीं सद्गुरुकरितां । सद्गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ॥ १८ ॥ प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याअभ्यास । अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ॥ १९ ॥ जें अभ्यासें अभ्यासितां नये । जें साधनें असाध्य होये । तें हें सद्गुरुविण काये । उमजों जाणे ॥ २० ॥ याकारणें ज्ञानमार्ग । कळाया धरावा सत्संग । संत्सगेंविण प्रसंग । बोलोंचि नये ॥ २१ ॥ सेवावे सद्गुरूचे चरण । या नांव पादसेवन । चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ॥ २२ ॥ देव ब्राह्मण महानुभाव । सत्पात्र भजनाचे ठाव । ऐसिये ठाईं सद्भाव । दृढ धरावा ॥ २३ ॥ हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षाया कारणें । परंतु सद्गुरुपाय सेवणें । या नांव पादसेवन ॥ २४ ॥ पादसेवन चौथी भक्ती । पावन करितसे त्रिजगतीं । जयेकरितां सायुज्यमुक्ती । साधकास होये ॥ २५ ॥ म्हणोनी थोरांहूनि थोर । चौथे भक्तीचा निर्धार । जयेकरितां पैलपार । बहुत प्राणी पावती ॥ २६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पादसेवनभक्तिनिरूपणनाम समास चतुर्थ ॥ ४ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । चौथे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । पांचवी भक्ती ॥ १ ॥ पांचवी भक्ति तें अर्चन । म्हणिजे देवतार्चन । शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ॥ २ ॥ नाना आसनें उपकर्णें । वस्त्रें आळंकार भूषणें । मानसपूजा मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ती ॥ ३ ॥ देवब्राह्मणअग्नीपूजन । साधुसंतअतीतपूजन । यतिमहानुभावगाइत्रीपूजन । या नांव पांचवी भक्ती ॥ ४ ॥ धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्रलेपसत्पात्रपूजन । आपले गृहींचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ती ॥ ५ ॥ शिळासप्तांकित नवांकित । शालिग्राम शकलें चक्रांकित । लिंगें सूर्यकांत सोमकांत ।

संगतींतच सफल होतात, सद्गुरूवांचून सन्मार्ग अन्य नाहीं (१६–१८). नाना प्रयोग केले, साधन सायास केले, सतत परिश्रमानें विद्याभ्यास केले तरी ह्यानें कांहीं गुरुगम्य प्राप्त होत नाहीं. साधनांना व अभ्यासाला जें असाध्य आहे तें काय सद्गुरूवांचून प्राप्त होणार आहे ? म्हणून सन्मार्ग कळण्यासाठीं सत्संग धरावा. सत्संगावांचून कांहींच साध्य होत नाहीं. देव, ब्राह्मण व संत-सज्जन ह्यांच्या ठायीं हरिभजनोपाय सांपडतो – ह्यांच्या ठायीं सद्भावच ठेविला पाहिजे. पण हें बोलणें लोकाचाराचें झालें. खरें सांगावयाचें म्हणजे सद्गुरुचरणच दृढ धरिले पाहिजेत व हीच पादसेवनभक्ति होय. ह्या चौथ्या भक्तीच्या योगानेंच त्रैलोक्य पावन झालें आहे, सायुज्य मुक्तीला पोहोंचविणारी हीच भक्ति आहे म्हणून थोरांत थोर अशी ही पादसेवन भक्ति आहे, हिच्या सेवनानें बहुत प्राणी भवनदीपार गेले आहेत (१९–२६). [द. ४, स. ४]

चौथ्या भक्तीचें निरूपण झालें. आतां पांचवी अर्चनभक्ति ऐका. अर्चन म्हणजे देवांची पूजा. पूजा शास्त्रोक्त केली पाहिजे. अनेक प्रकारचीं आसनें, उपकरणें, वस्त्रालंकारभूषणें, मानसपूजा, मूर्तिध्यान हें सर्व विधिपूर्वक करावें. देव, ब्राह्मण, अग्नि, साधु-संत, अतिथि, संन्यासी, गायत्री (धेनु) ह्यांचा यथोचित पूजासत्कार करावा. धातुपाषाणमृत्तिकेच्या देवतामूर्ति, तसबिरी, ह्यांचें आदरपूर्वक पूजन करावें. शालिग्राम, चक्रें, लिंगें, बाण, भैरव, भगवती, मल्हारी, मुंज्या, नृसिंह, बनशंकरी

बाण तांदळे नर्बदे ॥ ६ ॥ भैरव भगवती मल्लारी । मुंज्या नृसिंह बनशंकरी । नाग नाणी नानापरी । पंचायतनपूजा ॥ ७ ॥ गणेशशारदाविठ्ठलमूर्ती । रंगनाथजगन्नाथतांडवमूर्ती । श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ८ ॥ मच्छकूर्मवऱ्हावमूर्ति । नृसिंहवामनभार्गवमूर्ती । रामकृष्णहयग्रीवमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ९ ॥ केशवनारायणमाधवमूर्ती । गोविंदविष्णुमधुसूदन मूर्ती । त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती । हृषीकेश पद्मनाभ ॥ १० ॥ दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती । प्रद्युम्नअनिरुधपुरषोत्तममूर्ती । अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती । जनार्दन आणी उपेंद्र ॥ ११ ॥ हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंतजगदात्माजगदीमूर्ती । शिवशक्तींच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ १२ ॥ अश्वत्थनारायण सूर्यनारायण । लक्ष्मीनारायण त्रिमल्लनारायण । श्रीहरीनारायण आदिनारायण । शेषशायी परमात्मा ॥ १३ ॥ ऐशा परमेश्वराच्या मूर्ती । पाहों जातां उदंड असती । त्यांचें अर्चन करावें भक्ती । पांचवी ऐसी ॥ १४ ॥ याहि वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम । उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ॥ १५ ॥ जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी । पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावीं ॥ १६ ॥ नाना तीर्थां क्षेत्रांस जावें । तेथें त्या देवाचें पूजन करावें । नाना उपचारीं अर्चावें । परमेश्वरासी ॥ १७ ॥ पंचामृतें गंधाक्षतें । पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें । धूपदीप असंख्यातें । निरांजनें कर्पुराचीं ॥ १८ ॥ नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबूलप्रकार । दक्षणा नाना आळंकार । दिव्यांबरें बनमाळा ॥ १९ ॥ शिबिका छत्रें सुखासनें । माहि मेघडंब्रें सूर्यापानें । दिंड्या पताका निशाणें । टाळ घोळ मृदंग ॥ २० ॥ नानावाद्यें नानाउत्साव । नानाभक्तसमुदाव । गाती हरिदास सद्भाव । लागला भगवंतीं ॥ २१ ॥ वापी कूप सरोवरें । नाना देवाळयें सिखरें । राजांगणें मनोहरें । वृंदावनें भुयरीं ॥ २२ ॥ मठ

इ. आपल्या घरीं ज्या देवतांना वाड-वडील पूजीत आले आहेत त्यांचें पूजन करावें. ही अर्चन भक्ति होय (१—७). गणेश, शारदा, विठ्ठल, रंगनाथ, शंकर, गरुड, हनुमंत, मत्स्य-कूर्मादि दशावतार, केशव-नारायणादि चोवीस मूर्ति, शिवशक्तीच्या बहुत प्रकारच्या मूर्ति, अश्वत्थ, सूर्य, लक्ष्मी हरिहर, शेषशायी – अशा परमेश्वराच्या ज्या अनंत मूर्ति आहेत त्यांचें पूजन करावें (८—१५). ह्याशिवाय घरीं जे कुळधर्म कुळाचार चालत आहेत ते सर्व यथास्थित पाळावेत. अनेक तीर्थ-क्षेत्रें पाहून तेथील देवतांचें पूजन करावें. यथामीलितोपचारांनीं परमेश्वराचें पूजन करावें, पंचामृतें, गंधाक्षता, पुष्पें, परिमळद्रव्यें, धूपदीप, कापुरार्त्या, नाना खाद्यें, सुंदर नैवेद्य, फळें, तांबूल, दक्षिणा, अलंकार, वस्त्रें, सर्व कांहीं साहित्य सिद्ध असावें (१६—१९). पालखी, छत्री, अबदागीर, दिंड्या, पताका, निशाणें, टाळ, घोळ, मृदंग, नाना वाद्यें ह्या साहित्यांत चुकूं नये; भक्तभाविकांचे समुदाय मिळून महोत्सव करावे व भगवंताचे गुणानुवाद सप्रेमें गावे (२०—२१). मंदिराभोंवतीं

मंडपा धर्मशाळा । देवद्वारीं पडशाळा । नाना उपकर्णें नक्षत्रमाळा । नाना वस्त्रसामग्री ॥ २३ ॥ नाना पडदे मंडप चांदोवे । नाना रत्नघोष लोंबती बरवे । नाना देवाळईं समर्पावे । हस्ती घोडे शकटें ॥ २४ ॥ अळंकार आणी अळंकारपात्रें । द्रव्यें आणी द्रव्यपात्रें । अन्नोदक आणी अन्नोदकपात्रें । नाना प्रकारींचीं ॥ २५ ॥ वनें उपवनें पुष्पवाटिका । तापस्यांच्या पर्णकुटिका । ऐसी पूजा जगन्नायका । यथासांग समर्पावी ॥ २६ ॥ शुक शारिका मयूरें । बदकें चक्रवाकें चकोरें । कोकिळा चितळें सामरें । देवाळईं समर्पावीं ॥ २७ ॥ सुंगधमृगें आणी मार्जारें । गाई म्हैसी वृषभ वानरें । नाना पदार्थ आणी लेंकुरें । देवाळईं समर्पावीं ॥ २८ ॥ काया वाचा आणी मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें । सद्भावें भगवंत अर्चणें । या नांव अर्चनभक्ती ॥ २९ ॥ ऐसेंचि सद्गुरूचें भजन । करून असावें अनन्य । या नांव भगवद्भजन । पांचवी भक्ती ॥ ३० ॥ ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करीत जावी । मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ३१ ॥ मनें भगवंतास पूजावें । कल्पून सर्वही समर्पावें । मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३२ ॥ जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे । येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ३३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अर्चनभक्तिनाम समास पंचम ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । पांचवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । साहावी भक्ती ॥ १ ॥ साहावी भक्ती तें वंदन । करावें देवासी नमन । संत साधु आणी सज्जन । नमस्कारीत जावे ॥ २ ॥ सूर्यासी करावे नमस्कार । देवासी करावे नमस्कार । सद्गुरुसी करावे नमस्कार । साष्टांग भावें ॥ ३ ॥ साष्टांग नमस्कारास अधिकारु । नाना प्रतिमा देव गुरु ।

वापीकूपसरोवरें, शिखरें, वृंदावनें, मठ, मंडप, पर्णशाळा, बासनांसकट नानावस्त्रें, पडदे, चांदवे, हत्ती, घोडे, शकट, जें जें अनुकूल असेल तें तें देवालयाला अर्पण करावें. नानाप्रकारचे सुंदर वस्त्रालंकार, अन्नोदक व अन्नोदकाचीं लहान-मोठीं भांडीं देवालयाला अर्पावीं. देवालयाभोंवतीं सुंदर वनोपवनें, पुष्पवाटिका, पर्णशाळा उभाराव्या. ह्या प्रकारें जगन्नायकाची पूजा यथासांग करावी. शुक, सारिका, मोर, चक्रवाक, चकोर, कोकिळा इ. पक्षी, व गाई, म्हशी इ. पशु देवालयीं समर्पण करावे (२२–२८). तात्पर्य, कायावाचामन, चित्तवित्तजीवप्राण सर्व वेंचून सद्भावपूर्वक भगवंताचें अर्चन करावें. ही अर्चनभक्ति होय. देवाप्रमाणेंच गुरूची अनन्यभक्ति करावी. अशी पूजा घडणार नाहीं तर मानसपूजा करून वरील सर्व पदार्थ मनानें देवाला अर्पावेत. देवाला मानसपूजाही प्रिय आहेच. मनानें देवाला पूजावें, व जें जें आपणांस प्रिय तें तें कल्पून देवाला अर्पण करावें ही मानसपूजा होय (२९–३३). [द. ४, स. ५]

देव, साधुसंत व सज्जन ह्यांना वंदन करणें ही सहावी वंदनभक्ति होय. सूर्य, देव व सद्गुरु ह्यांना साष्टांग नमस्कार घालावे. देव, प्रतिमा व गुरु ह्यांना साष्टांग नमस्कार घालावे व इतरांस यथाधिकार नमन करावें. ही वंदनभक्ति होय.

अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ॥ ४ ॥ छपन्न कोटी वसुमती । मधें विष्णुमूर्ती असती । तयांस नमस्कार प्रीती । साष्टांग घालवे ॥ ५ ॥ पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती । तैसाचि नमावा मारुती । नित्यनेमें विशेष ॥ ६ ॥

॥ श्लोक ॥ शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा । एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ॥

भक्त ज्ञानी आणी वीतरागी । माहानुभाव तापसी योगी । सत्पात्रें देखोनि वेगीं । नमस्कार करावे ॥ ७ ॥ वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणी विद्वज्जन । याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे ॥ ८ ॥ जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान । या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ९ ॥ गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती । नाना देव सांगों किती । पृथकाकारें ॥ १० ॥ सर्व देवांस नमस्कारिलें । तें येका भगवंतास पावलें । येदर्थीं येक वचन बोलिलें । आहे तें ऐका ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥ आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं । सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥

या कारणें सर्व देवांसी । नमस्कारावें अत्यादरेंसी । अधिष्ठान मागितां देवांसी । परम सौख्य वाटे ॥ १२ ॥ देवदेवांचीं अधिष्ठानें । सत्पात्रें सद्गुरूचीं स्थानें । या कारणें नमस्कार करणें । उभय मार्गीं ॥ १३ ॥ नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे । नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासीं ॥ १४ ॥ नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्षमती । नमस्कारें मोडलीं जडती । समाधानें ॥ १५ ॥ सीसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड । या कारणें अखंड । देव भक्त वंदावे ॥ १६ ॥ नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे । नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकांवरी ॥ १७ ॥ निशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर । आणी मुख्य परमेश्वर ।

हरिहरांच्या मूर्ति, सूर्य व मारुति ह्यांचें पुण्यकारक दर्शन घ्यावें व नित्यनेमानें ह्यांना साष्टांग नमस्कार घालावे (१–६). भक्त, ज्ञानी, वैराग्यशील पुरुष, महात्मे, तापसी, योगी—तात्पर्य जेथें विशेष गुण दिसतील तेथें सद्गुरूचें अधिष्ठान आहे म्हणून साष्टांग नमस्कार घालावे. वेदशास्त्रज्ञ, पुराणिक, पंडित व विद्वान् ह्यांना नमस्कार करावे (७–९). गणेश शारदा व हरिहर ह्यांच्या अनेक मूर्ति व सर्व देवदेवतांना वंदावें, तें मुख्य परमेश्वरास पावतें. देवांचीं अधिष्ठानें व सद्गुरूंचीं स्थानें जे सत्पात्र पुरुष त्यांना अगत्य वंदावें (१०–१३). नमस्कारानें लीनता वाढते, विकल्प मोडतात व साधु-संतांशीं सख्य घडतें. नमस्कारानें चित्ताचे दोष जातात, अन्याय क्षमिले जातात व समाधान बिघडलें असलें तर पुन्हां जडतें. मस्तक नमविणें ह्यासारखा दंड नाहीं म्हणून देवभक्त अखंड वंदावे. ह्यानें ते प्रसन्न होऊन त्यांची कृपा उचंबळते, गुरुदेव साधकांवर प्रसन्न होतात. नमस्कार निःशेष करितां म्ह. अहंकाराचा शेष किंवा बिंदुही न ठेवतां केला असतां दोषांचे डोंगर

कृपा करी ॥ १८ ॥ नमस्कारें पतीत पावन । नमस्कारें संतांसी शरण । नमस्कारें जन्ममरण । दुरी दुरावे ॥ १९ ॥ परम अन्याय करूनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला । तरी तो अन्याय क्षमा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ २० ॥ याकारणें नमस्कारापरतें । आणीक नाहीं अनुसरतें । नमस्कारें प्राणियातें । सद्बुद्धि लागे ॥ २१ ॥ नमस्कारास वेचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे । नमस्कारास कांहींच नलगे । उपकरण सामग्री ॥ २२ ॥ नमस्कारा ऐसे नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें । नाना साधनीं साक्षेपें । कासया सिणावें ॥ २३ ॥ साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली । सुगम पंथें नेऊन घाली । जेथील तेथें ॥ २४ ॥ या कारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ । येथें सांगितली स्पष्ट । साहावी भक्ती ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वंदनभक्तिनाम समास षष्ठ ॥ ६ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । साहवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । सातवी भक्ती ॥ १ ॥ सातवें भजन ते दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें । सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ॥ २ ॥ देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें । चढते वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ३ ॥ भंगलीं देवाळयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं । सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतनचि कार्यें ॥ ४ ॥ नाना रचना जीर्ण जर्जर । त्यांचे करावे जीर्णोद्धार । पडिलें कार्य तें सत्वर । चालवीत जावें ॥ ५ ॥ गज रथ तुरंग सिंहासनें । चौकिया सिबिका सुखासनें । मंचक डोल्हारे विमानें । नूतनचि करावीं ॥ ६ ॥ मेघडंब्रें छत्रें चामरें । सूर्यापानें निशाणें अपारें । नित्य नूतन

भस्म होतात व मुख्य देवाची कृपा होते. नमस्कारानें पतित तेच पावन होतात, संतांसी अनन्यता होऊन जन्म-मरणांपासून जीव मुक्त होतो. थोर अपराध करून आल्यावरही साष्टांग नमस्कार घातला म्हणजे श्रेष्ठांना क्षमा करावी लागते ; म्हणून नमस्कारापेक्षां शरणागतांस दुसरा मार्ग नाहीं. नमस्कारानें सद्बुद्धि विकास पावते. नमस्काराला कांहीं खर्च नाहीं, कष्ट नाहींत व साहित्य लागत नाहीं. नमस्कारासारखें सोपें कांहीं नाहीं, मात्र नमस्कार अनन्यपणें म्ह. निष्कपट होऊन केला पाहिजे (१४–२३). साधकानें नमस्कार घातला म्ह. तो शरण आला कीं त्याची चिंता साधूंना लागून ते त्याला जेथल्या तेथें म्ह. स्वस्वरूपीं स्थित करितात. श्रेष्ठ प्रसन्न होतात. अशी ही सहावी भक्ति आहे (२४–२५). [द. ४, स. ६]

सातवी दास्यभक्ति होय. देवद्वारीं सदा सेवेला तत्पर असावें, पडेल तें देवाचें कार्य उत्साहानें करावें, देवाचें वैभव सांभाळावें, त्यांत न्यून पडूं देऊं नये व देवाच्या भजनाचा रंग वाढवावा ही दास्यभक्ति होय. (१–३). देवालयांचा जीर्णोद्धार करावा, तलाव वगैरे मोडले असतील ते दुरुस्त करावे, सोपे व धर्मशाळा नवीन बांधून चावींत व मोडतोड झाली असेल ती नवी करावी. हत्ती, घोडे, रथ, चौक्या, शिबिका, सिंहासनें, मंचक, डोल्हारे, विमानें, मेघडंब्रे, छत्रचामरें,

अत्यादरें । सांभाळित जावीं ॥ ७ ॥ नाना प्रकारींचीं यानें । बैसावयाचीं उत्तम स्थानें । बहुविध सुवर्णासनें । यत्नें करीत जावीं ॥ ८ ॥ भुवनें कोठड्या पेट्या मांदुसा । रांझण कोहळीं घागरी बहुवसा । संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अतियत्नें करावा ॥ ९ ॥ भुयेरीं तळघरें आणी विवरें । नाना स्थळें गुप्तद्वारें । अनर्घ्य वस्तूंचीं भांडारें । यत्नें करीत जावीं ॥ १० ॥ अळंकारभूषणें दिव्यांबरें । नानारत्नें मनोहरें । नाना धातु सुवर्णपात्रें । यत्नें करींत जावीं ॥ ११ ॥ पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांचीं बनें । पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ॥ १२ ॥ नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा । नाना वाद्यें नाट्यशाळा । गुणी गायक बहुसाल ॥ १३ ॥ स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा । निद्रिस्तांकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ॥१४॥ नाना परिमळद्रव्यांचीं स्थळें । नाना खाद्यफळांची स्थळें । नाना रसांचीं नाना स्थळें । यत्नें करींत जावीं ॥ १५ ॥ नाना वस्तांचीं नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें । देवाचें वैभव वचनें । किती म्हणोनी बोलावें ॥ १६ ॥ सर्वां ठाईं अतिसादर । आणी दास्यत्वासहि तत्पर । कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ॥ १७ ॥ जयंत्या पर्वें महोत्साव । असंभाव्य चालवी वैभव । जें देखतां स्वर्गींचे देव । तटस्थ होती ॥ १८ ॥ ऐसें वैभव चालवावें । आणी नीच दास्यत्वही करावें । पडिलें प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ॥ १९ ॥ जें जें कांहीं पाहिजे । तें तें तत्काळचि दीजे । अत्यंत आवडीनें कीजे । सकळ सेवा ॥ २० ॥ चरणक्षाळणें स्नानें आचमनें । गंधाक्षतें वसनें भूषणें । आसनें जीवनें नाना सुमनें । धूप दीप नैवेद्य ॥ २१ ॥ शयनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुशीतळें । तांबूल गायनें रसाळें ।

सूर्यापानें, निशाणें, नानाविध यानें, बैठकीचीं स्थानें, कोठड्या, पेट्या व मांदुसा, शीतलोदकाचे रांजण, घागरी, भुयारीं, तळघरें, विवरें, गुप्तद्वारें, अमूल्य वस्तूंचीं भांडारें, अलंकार व दिव्यवस्त्रें, अनेक सुंदर रत्नें, सुवर्णादि नाना धातूंचीं नाना पात्रें ह्या सर्व प्रकारांनीं देवमंदिराचें ऐश्वर्य वाढवावें (४–११). देवालयाभोंवतीं रम्य पुष्पवाटिका व वनोपवनें उभारावीं व वृक्ष-वेलींना पाणी पोहोंचेल असे पाट सोडावे (१२). अनेक तऱ्हेच्या पशु-पक्ष्यांच्या शाळा बांधाव्या, अनेक वाद्यें वा नाट्यशाळा तयार करून गायक व इतर गुणी जनांच्या नेमणुका करून द्याव्या. स्वयंपाकघरें, भोजनशाळा, सामानाच्या कोठ्या, धर्मशाळा, निद्रेसाठीं पडशाळा, इ. स्थळें विशाळ बांधावीं. सुगंधी तेलें, अत्तरें, केशर-कस्तुरी वगैरे सुगंधी द्रव्यें ठेवावयाचीं स्थळें, खाद्यफळांचीं स्थळें, दधि-दुग्धादि रसांचीं नाना स्थळें मोठ्या यत्नानें उभारावींत. स्थानें जीर्ण झालीं असतील तर दुरुस्त करावीं, नसतील तर नूतन बांधावींत. तात्पर्य, देवाचें वैभव हरतऱ्हेनें वाढवावें. तें शब्दांनीं किती सांगावें ? (१३–१६). देवाच्या सर्व कार्यास अति तत्पर असावें, व मोठेपणा पार विसरून सर्व प्रकारचें दास्य करावें. जयंत्या, पर्वें, महोत्सव थाटानें फार मोठ्या प्रमाणावर करावे कीं ते पाहून स्वर्गींचे देवही सानंदाश्चर्यभरित व्हावे. देवाचें ह्याप्रमाणें अपार ऐश्वर्य वाढवून आपण पडेल तें अतिक्षुद्र काम असलें तरी करावें. जेव्हां जें लागेल तें प्रेमानें व तत्परतेनें पुढें करावें. पूजनाचें, स्नानआचमनगंधाक्षतादि व धूपदीपनैवेद्यादि सर्व साहित्य पुरवावें. शयनस्थळीं शीतोदक, तांबूलादि ठेवावे व रम्य गायनें

रागरंगें करावी ॥ २२ ॥ परिमळद्रव्यें आणी फुलेलें । नाना सुगंधेल तेलें । खाद्य फळें बहुसालें । सन्निधचि असावीं ॥ २३ ॥ सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं । वसनें प्रक्षाळून आणावीं । उत्तमोत्तमें ॥ २४ ॥ सकळांचें करावें पारपत्य । आल्यांचें करावें आतिथ्य । ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ॥ २५ ॥ वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं । अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ॥ २६ ॥ ऐसी हे सातवी भक्ती । निरोपिली येथामती । प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ॥ २७ ॥ ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्गुरूचें । प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करीत जावें ॥ २८ ॥ इतिश्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दास्यभक्तिनिरूपणनाम समास सप्तम ॥ ७ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । आठवी भक्ती ॥ १ ॥ देवासी परम सख्य करावें । प्रेमप्रीतीनें बांधावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥ देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती । येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ३ ॥ भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन । प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ४ ॥ आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावें । मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ५ ॥ देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें । अन्यन्यभावें जीवें-प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ॥ ६ ॥ सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता । निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्याचि सांगाव्या ॥ ७ ॥ देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी । सर्व अर्पावें सेवटीं ।

करावीं. परिमळद्रव्यें, फुलेलें (अत्तरें), खाद्यें, फळें जवळ ठेवावीं. पाण्याचीं भांडीं भरावीं, सडासंमार्जन करावें, उंची वस्त्रें धुवून आणावीं. जे जे लोक येतील त्यांचें पारपत्य करावें म्ह. सप्रेम समाचार घेऊन आतिथ्य करावें. देवापुढें कारुणास्तोत्रें म्हणावीं कीं जीं ऐकून सर्वांचीं अंतरें प्रसन्न व्हावीं. अशा प्रकारें दास्यभक्ति करावी (१७–२६). ही प्रत्यक्ष घडली नाहीं तर मानसपूजा करावी व जशी देवाची तशीच सद्गुरूची करावी (२७–२८). [द. ४, स. ७]

आतां आठव्या सख्यभक्तीचें लक्षण ऐका. देवाशीं परम सख्य करावें, त्याला प्रेमसूत्रानें बांधावें. त्याला जें प्रिय तें करावें. हें सख्य भक्तीचें लक्षण होय. देवाला प्रिय काय आहे ? भक्तिभाव, भजन, निरूपण, प्रेमळ कीर्तन हें देवाला फार प्रिय आहे म्हणून आपण हेंच करावें. कोणाच्याही मनासारखें झालें म्हणजे निश्चयानें सख्य घडतें (१–५). देवाचें सख्य जोडण्यासाठीं आपलें सौख्य सोडून द्यावें, अनन्यभावें जीवभावें व प्रसंगीं शरीरही वेंचावें. संसाराची चिंता न करितां देवाचेंच चिंतन करावें, कथा-वार्ता देवाच्याच सांगाव्या. देवाच्या सख्यत्वासाठीं जिवलगांशीं विरोध झाला तरी पत्करावा,

प्राण तोहि वेंचावा ॥ ८ ॥ आपुलें आवघेंचि जावें । परी देवासीं सख्य राहावें । ऐसी प्रीती जीवें भावें । भगवंतीं लागावी ॥ ९ ॥ देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण । परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १० ॥ ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता । पांडव लाखाजोहरीं जळतां । विवरद्वारें काढिले ॥ ११ ॥ देव सख्यत्वें राहे आपणासी । तें तों वर्म आपणाचि पासीं । आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें ॥ १२ ॥ आपण असतां अन्यन्यभावें । देव तत्काळचि पावे । आपण त्रास घेतां जीवें । देवही त्रासे ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥ ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्थथैव भजाम्यहम् ॥

जैसें जयाचें भजन । तैसाचि देवहि आपण । म्हणोनी हें आवघें जाण । आपणापासीं ॥ १४ ॥ आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे । तरी गोष्टी आपणाकडे । सहजचि आली ॥ १५ ॥ मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना । चंद्र वेळेसि उगवेना । तरी चकोर अनन्य ॥ १६ ॥ ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्त्व । भगवंतावरील ममत्व । सांडूंचि नये ॥ १७ ॥ सखा मानावा भगवंत । माता पिता गणगोत । विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्मा ॥ १८ ॥ देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही । परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ॥ १९ ॥ म्हणोनि ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें । अंतरीं सदृढ धरावें । परमेश्वरासी ॥ २० ॥ आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें । ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥ देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित । इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥ २२ ॥ देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।

सर्वांचा त्याग करावा व शेवटीं प्राणही अर्पण करावा. आपल्या सर्वस्वाची हानि झाली तरी पत्करावी पण देवाशीं सख्य राहावें अशा परमप्रीतीनें देव वश करावा. देव हाच आपला प्राण करून त्याशीं कधींही अंतर पाडूं नये (६–१०). अशा सख्य भक्तीनें देव बांधून टाकावा म्हणजे तो भक्ताची चिंता वाहतो. पाहा बरें ! पांडव लाखाजोहरींमध्यें जळत असतांना त्यानें विवरद्वारानें त्यांना बाहेर काढिलें कीं नाहीं ? देव सख्यत्वानें आपणापाशीं राहील ह्याचें वर्म आपणाजवळच आहे. आपण जसे शब्द उच्चारावे तसाच प्रतिध्वनि होतो, म्हणून आपण देवाशीं अनन्य राहिलों तर देव तत्काळ पावतो, व आपण मनांतून त्याचा कंटाळा केला तर तोही उदासीन राहतो. जसें आपलें भजन तसाच देवही वळतो, म्हणून हें सर्व आपल्याकडेच येतें. आपल्या मनासारखें न झाल्यामुळें निष्ठा उणी झाली तरी दोष आपलाच. आपली निष्ठा स्थिर असावी. मेघ वेळेला वळला नाहीं तरी चातक अनन्यच राहतो, पाहिजे तेव्हां चंद्रोदय झाला नाहीं तरी चकोराची चंद्रावरील निष्ठा ढळत नाहीं, असें देवाचें सख्य अढळ असावें. माता-पिता, गण-गोत, धन-वित्त सर्व कांहीं देव व्हावा. (११–१८). देवावेगळें कोणी नाहीं असें सर्वच बोलतात, पण त्यांची निष्ठा कांहीं तशी नसते; म्हणून असें न करितां देवाशीं खरें सख्य करावें म्हणजे देवाला अंतरीं सदृढ धरावें (१९–२०). आपल्या मनोरथाचा भंग झाला म्हणून देवावर रागावणें हें कांहीं सख्यभक्तीचें लक्षण नव्हे. आपल्या इच्छेसाठीं देव अंतरूं नये तर देवाचें जें मनोगत तेंच आपलें उचित

मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ॥ २३ ॥ पाहातां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायसी । माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ॥ २४ ॥ देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला । शरणांगतांस देव जाला । वज्रपंजरु ॥ २५ ॥ देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसी तारी । देव होये साहकारी । अनाथांचा ॥ २६ ॥ देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी । धाविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ॥ २७ ॥ देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु । देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ॥ २८ ॥ देव प्रीती राखों जाणे । देवासि करावें साजणें । जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ॥ २९ ॥ सख्य देवाचें तुटेना । प्रीती देवाची विटेना । देव कदा पालटेना । शरणांगतांसी ॥ ३० ॥ म्हणोनि सख्य देवासीं करावें । हितगुज तयासीच सांगावें । आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३१ ॥ जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारु । म्हणोनि सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरुसीं असावा ॥ ३२ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सख्यभक्तिनिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

॥ श्रीराम ॥ मागां जालें निरूपण । आठवे भक्तीचें लक्षण । आतां ऐका सावधान । भक्ति नवमी ॥ १ ॥ नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें । तेंहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनि ॥ २ ॥ ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण । करावें तत्वविवरण । म्हणिजे कळे ॥ ३ ॥ मी भक्त ऐसें म्हणावें । आणी विभक्तपणेंचि भजावें । हें आवघेंचि

आहे असें समजावें. आपली वेगळी इच्छा न ठेवतां देवाच्या इच्छेनें चालावें, देव करील तें मानावें म्हणजे दयाळु देव ह्या अनन्यतेला भुलून सहजच वळतो. देवाच्या कृपेपुढें आईचेंही प्रेम काय किंमतीचें आहे ? महदापत्तिकाळीं बाळाला मारणारी एखादी आई सांपडेलही ; पण देवानें कोणा भक्ताला कधीं मारिल्याचें पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आहे काय ? अनन्यभक्ताला देव वज्रपंजर होतो, देव त्याला पाठीशीं घालतो, त्याचा पक्ष घेतो, त्याचा उद्धार करितो. देव अनाथांचा, पतितांचा वाली आहे. देव अंतरसाक्षी आहे, गजेंद्रासाठीं ऐनप्रसंगीं देव धांवलाच आहे ना ? (२१–२७). देव कृपेचा सागर आहे, करुणेचा मेघ आहे, देव भक्ताला कधींच विसरत नाहीं, विसंबत नाहीं. प्रेम राखणें देव जाणतो म्हणून देवाशींच सख्य करावें. जिवाचे जिवलग दुसरे कोणी कामास येत नाहींत. देवाचें सख्य अतुट आहे, त्याची प्रीति एकदां लागली कीं अवीट आहे, अनन्याशीं देव पालटत नाहीं (२८–३०). म्हणून देवाशींच सख्य करावें, त्यालाच हितगुज सांगावें, हें सख्य भक्तीचें लक्षण आहे. देव तसा गुरु असें शास्त्रवचन आहे ह्यास्तव गुरूशींही सख्य असें अनन्य ठेवावें (३१–३२). [दं. ४, स. ८]

नवमी भक्ति म्ह. आत्मनिवेदन. तें आतां स्पष्ट सांगतों. आत्मनिवेदन म्हणजे ' देवासी वाहावें आपण '. देव कोण, आपण कोण व वाहावें कसें ? ' करावें तत्त्व विवरण म्हणजे कळे ! ' मी ' भक्त ' असें स्वतःला म्हणवावें आणि ' विभक्तपणानें ' भजावें हें विलक्षण होय. लक्षण असून विलक्षण (विपरीत लक्षण) ज्ञान असून अज्ञान, भक्त असून

जाणावें । विलक्षण ॥ ४ ॥ लक्षण असोन विलक्षण । ज्ञान असोन अज्ञान । भक्त असोन विभक्तपण । तें हें ऐसें ॥ ५ ॥ भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हणिजे भक्त नव्हे । विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ ६ ॥ तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा । आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ७ ॥ मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्वझाडा । विचार पाहतां उघडा । आपण नाहीं ॥ ८ ॥ तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे । आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहजचि जालें ॥ ९ ॥ तत्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे । प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ॥ १० ॥ येक मुख्य परमेश्वर । दुसरी प्रकृति जगदाकार । तिसरा आपण कैंचा चोर । आणिला मध्यें ॥ ११ ॥ ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिलीच लागे देहअहंता । परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नाहीं ॥ १२ ॥ पाहतां तत्वविवंचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना । विश्वाकारें व्यक्ती नाना । तत्वें विस्तारलीं ॥ १३ ॥ तत्वें साक्षित्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचीतीं । आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ॥ १४ ॥ आत्मा येक स्वानंदघन । आणी अहमात्मा हें वचन । तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥ १५ ॥ सोहं हंसा हें उत्तर । याचें पाहावें अर्थांतर । पाहातां आत्मयाचा विचार । आपण कैंचा तेथें ॥ १६ ॥ आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य ।

विभक्त तें असें असतें ! भक्त म्हणजे विभक्त नव्हे व विभक्त म्हणजे भक्त नव्हे ? विचार केल्यावांचून हें कांहींच उमगावयाचें नाहीं ; म्हणून विचार करावा, देव कोण तों ओळखावा व आपला आपण अंतर्यामीं शोध घ्यावा (१–७). आतां 'मी कोण' ह्याचा निश्चय करितांना ज्या तत्त्वांचा पिंडब्रह्मांडविस्तार झाला आहे त्यांचा विचार करावा (पुढें द. १७, स. ८ व ९ येथें तत्त्वांचा उलगडा होईल.) व ज्या ज्या तत्त्वांचा पिंड बनला आहे तीं तीं तत्त्वें विवेकानें त्या त्या मूळ तत्त्वांत मिळवावीं म्ह. आपण तीं तत्त्वें नाहीं, 'मी' त्या तत्त्वांत नाहीं – असें स्वच्छ समजतें. तत्त्वझाडा झाला म्हणजे मी तत्त्वें नाहीं, तत्त्वांहून 'मी' म्हणावयाला वेगळें कांहींच नाहीं असें कळतें. ह्याप्रमाणें पिंडांतलीं तत्त्वें मूळ तत्त्वांत विवेक सोडून दिलीं कीं 'मी' उरत नाहीं व ह्याप्रमाणें आत्मनिवेदन सहजच होतें. हा दृश्य जगदाकार तत्त्वरूप आहे व विवेकानें त्याचा निरास होतो. प्रकृतीचा निरास झाल्यावर 'एकमेवाद्वितीय' आत्माच उरतो. तेथें 'मी' म्हणावयाला कोण आहे ? एक मुख्य परमेश्वर असून दुसरी जगदाकार प्रकृति (ही दृश्याचा प्रपंच लावण्यासाठीं केवळ मानिली आहे) आहे, तिसरा 'मी किंवा आपण' हा मध्येंच कुठला चोर आणिला आहे ! असें हें सिद्ध असून मिथ्या अहंता देहास लागते, पण विचारानें पाहिलें असतां 'अहं' 'मी' 'आपण' हें कांहींच नाहीं. पिंड-ब्रह्मांडाची रचना व तत्त्वांचा विचार ह्यांचा शोध घेतां तत्त्वांच्याच व्यक्ति झाल्या आहेत असें ठरतें (८–१३). मी तत्त्वांचा साक्षी आहें अर्थात् त्यांहून निराळा आहें व निराळेपण (साक्षित्व) सुद्धां तत्त्वरूप असल्यामुळें आत्मप्रतीतींत शिल्लक राहत नाहीं ; तात्पर्य आदि-अंतीं एक आत्माच आहे, मी (आपण) तेथें नाहीं. आत्मा एकमेवाद्वितीय आहे व 'अहमात्मा' हें श्रुतीचें अभेदाचें वचन आहे, मग 'आपण' तेथें वेगळा कोठें उरतो ? (१४–१५). 'सः अहं अहं सः' ह्याच्या अर्थाचें मनन करून आत्मविचार पाहावा म्हणजे 'आपण' नाहींच. आत्मा निर्गुण निरंजन

म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥ १७ ॥ आत्मा म्हणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत । तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ॥ १८ ॥ आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण । निखळ निर्गुणीं आपण । कोण कैंचा ॥ १९ ॥ त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद । वस्तु ठाईंची अभेद । आपण कैंचा ॥ २० ॥ निरसितां जीवशिवउपाधी । जीवशिवचि कैंचे आधीं । स्वरूपीं होतां दृढबुद्धि । आपण कैंचा ॥ २१ ॥ आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव । या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २२ ॥ या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियाचें समाधान । नवमे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ॥ २३ ॥ पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमध्यें जगदीश । नवविधा भक्तीमध्यें विशेष । भक्ति नवमी ॥ २४ ॥ नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण । हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥ ऐसी हे नवविधा भक्ती । केल्यां पाविजे सायुज्यमुक्ती । सायुज्यमुक्तीस कल्पांतीं । चळण नाहीं ॥ २६ ॥ तिहीं मुक्तींस आहे चळण । सायुज्यमुक्ती अचळ जाण । त्रैलोक्यास होतां निर्वाण । सायुज्यमुक्ती चळेना ॥ २७ ॥ अवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती । तयांमध्यें तीन नासती । चौथी अविनाश ॥ २८ ॥ पहिली मुक्ती ते सलोकता । दुसरी ते समीपता । तिसरी ते सरूपता । चौथी सायुज्यता मुक्ती ॥ २९ ॥ ऐसिया चत्वार मुक्ती । भगवद्भजनें प्राणी पावती । हेंचि निरूपण प्रांजळ श्रोतीं । सावध पुढें परिसावें ॥ ३० ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदनभक्तीनाम समास नवम ॥ ९ ॥

असून त्याशीं अनन्य व्हावयाचें व अनन्य म्हणजे अन्य नाहीं मग तेथें आपण कैंचा उरतो? आत्मा म्हणजे केवळ अद्वैत कीं जेथें द्वैत व अद्वैत कांहींच नाहीं तेथें 'मी'पणाचा संबंध कसा लागेल? आत्मा गुणागुणातीत निर्गुण, त्या निर्गुणाच्या ठिकाणीं 'आपण' कसचा? 'तत्त्वमसि' ह्या महावाक्यांतील त्वंपद (जीव) व तत्पद (परमात्मा) ह्यांचा भासमान भेद 'असि'पदानें दूर केल्यावर व सर्व भेदाभेदनिरास झाल्यावर वस्तु जी मूळचीच अभेद आहे तीच उरते — तेथें 'मी' कोठें आहे? जीव-शिवांच्या उपाधींचा निरास झाल्यावर जीव-शिवच उरत नाहींत व स्वरूपीं दृढबुद्धि झाल्यावर 'मी'ला कोठें शोधावयाचें? 'आपण' मिथ्या असून देव सत्य आहे व देव-भक्तांचा अभेद आहे ह्या म्हणण्याचें रहस्य अनुभवीच जाणतील. आत्म-निवेदन ह्याला म्हणतात. ज्ञात्याचें समाधान हें आहे (१६-२३). पंचभूतांत मुख्य आकाश, सर्व देवांत परमेश्वर, त्याप्रमाणें नवविधाभक्तींत आत्मनिवेदन भक्ति मुख्य होय. आत्मनिवेदन झाल्यावांचून जन्म-मरण टळत नाहीं. ह्या मुख्य भक्तीनें सायुज्यमुक्ति मिळते. सायुज्यमुक्तीला कल्पांतींही चळण नाहीं. बाकीच्या तीन मुक्ति — सलोकता, समीपता व सरूपता — ह्या चंचल अर्थात् नाशिवंत आहेत; पण त्रैलोक्याचा नाश झाला तरी सायुज्यता मुक्ति अविनाश आहे. भगवद्भजनानें यथाधिकार ह्या चारही मुक्ति मिळतात (२४–३०). [द. ४, स. ९]

॥ श्रीराम ॥ मुळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार । तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदशकीं बोलिला ॥ १ ॥ तो अहंकार वायुस्वरूप । तयावरी तेजाचें स्वरूप । तया तेजाच्या आधारें आप । आवर्णोदक दाटलें ॥ २ ॥ तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा धरिली फणिवरें । वरती छप्पन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे ॥ ३ ॥ इयेवरी परिघ सप्त सागर । मध्य मेरु महाथोर । अष्ट दिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिला ॥ ४ ॥ तो सुवर्णाचा माहा मेरु । पृथ्वीस तयाचा आधारु । चौन्यासी सहस्र विस्तारु । रुंदी तयाची ॥ ५ ॥ उंच तरी मर्यादेवेगळा । भूमीमधें सहस्र सोळा । तयाभोंवता वेष्टित पाळा । लोकालोकपर्वतांचा ॥ ६ ॥ तयाऐलिकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ । धर्म आणी तमाळनीळ । पुढें गेले ॥ ७ ॥ जेथें जावया मार्ग नाहीं । मार्गीं पसरले महाअही । सितसुखें सुखावले तेही । पर्वतरूप भासती ॥ ८ ॥ तयाऐलिकडे सेवटीं जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण । तेथें महातापसी निर्वाण । देहत्यागार्थ जाती ॥ ९ ॥ तयाऐलिकडे बद्रि-केदार । पाहोन येती लहानथोर । ऐसा हा अवघा विस्तार । मेरुपर्वताचा ॥ १० ॥ तया मेरुपर्वतापाठारीं । तीन शृंगें विषमहारी । परिवारें राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ११ ॥ ब्रह्मशृंग तो पर्वताचा । विष्णुशृंग तो मर्गजाचा । शिवशृंग तो स्फटिकाचा । कैळास नाम त्याचें ॥ १२ ॥ वैकुंठ नाम विष्णुशृंगाचें । सत्यलोक नाम ब्रह्मशृंगाचें । अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ॥ १३ ॥ तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेतिस कोटी

ब्रह्म हें मूळचें निराकार पण तेथें ' एकोऽहं बहु स्याम् ' हा स्फुरणरूप अहंकार उद्भवला व तेथून पंचभूतें प्रथम सूक्ष्म व नंतर स्थूल उत्पन्न झालीं इ० विचार पुढें ज्ञानदशकांत म्ह० आठव्या दशकांत सांगण्यांत येईल (१). तो अहंकार प्रथम वायुस्वरूप, त्यापुढें तेजोरूप, नंतर आपरूप झाला. त्या आवरणोदकाच्या (आपाच्या) आधारें शेषानें ही पृथ्वी धारण केली. त्या पृथ्वीवर छप्पन्नकोटि विस्तार झाला. पृथ्वीला सप्तसागरांचा वेढा पडला, मध्यें मेरुपर्वत उभा राहून त्याभोंवतीं आठ दिशांना अष्ट दिक्पाळांचें वेष्टन झालें. त्या सुवर्णाच्या महामेरूचा पृथ्वीस आधार झाला. त्याची रुंदीच ८४ हजार. त्याची खोली पृथ्वींत १६ हजार असून त्याच्या सभोंवार लोकालोक पर्वतांचा वेढा पडलेला. त्याच्या अलीकडे हिमालय पर्वत कीं जेथें पांडवांनीं देहत्याग केला आणि फक्त धर्मराज व श्रीकृष्ण त्यापुढें गेले. तेथें जावयाला वाट नाहीं. वाटेंत सर्प पडलेले असून थंडगार वायूच्या सेवनानें सुखावून ते पर्वतासारखे प्रचंड पडलेले आहेत. त्याच्या अगदीं अलीकडे बद्रिकाश्रम व बद्रिनारायण हे प्रसिद्ध आहेत. तेथें मोठमोठे तपस्वी शेवटीं देहत्याग करण्यासाठीं जात असतात. त्याच्या अगदीं अलीकडे बद्रिकेदार आहे. तेथपर्यंत तर लहान-थोर स्त्री-पुरुष सर्व जात असतात. मेरुपर्वताचा हा सारा विस्तार आहे (२–१०). त्याच्या पठारावर माथ्यावरच्या विस्तृत व सपाट जमिनीवर तीन वांकडीं-तिकडीं शिखरें आहेत. त्यांवर ब्रह्मा, विष्णु व महेश आपापल्या परिवारांसह (अनुचरांसह) राहिले आहेत. ब्रह्मशृंगाला सत्यलोक म्हणतात, विष्णुशृंगाला वैकुंठ म्हणतात व तो सर्व मरगजाचा (पांचेचा) आहे, शिवशृंगाला कैलास म्हणतात, तो सारा शुभ्र स्फटिकमय आहे, सत्यलोकाच्या खालीं इंद्राची अमरावती आहे. तेथें गण, गंधर्व, अष्ट लोकपाळ, तेहतीस कोटि देव (कोटि म्ह० जाति, तेहतीसांपैकीं आठ वसु, बारा

देव सकळ । चौदा लोक सुवर्णाचळ । अंतरें वेष्टित राहिले ॥ १४ ॥ तेथें
कामधेनूंचीं खिल्लारें । कल्पतरूंचीं बनें अपारें । अमृताचीं सरोवरें । ठाईं ठाईं
उचंबळती ॥ १५ ॥ तेथें उदंड चिंतामणी । हिरेपरिसांचिया खाणी । तेथें
सुवर्णमये धरणी । लखलखायमान ॥ १६ ॥ परम रमणीये फांकती किळा ।
नवरत्नांचिया पाषाणसिळा । तेथें अखंड हरुषवेळा । आनंदमय ॥ १७ ॥
तेथें अमृताचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें । अष्ट नायका गंधर्वगायनें ।
निरंतर ॥ १८ ॥ तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधी तरी असेचिना ।
वृधाप्य आणी मरण येना । कदाकाळीं ॥ १९ ॥ तेथें येकाहूनि येक सुंदर ।
तेथें येकाहूनि येक चतुर । धीर उदार आणी शूर । मर्यादेवेगळे ॥ २० ॥
तेथें दिव्यदेह ज्योतिरूपें । विद्युल्लतेसारिखीं स्वरूपें । तेथें यश कीर्ति प्रतापें ।
सीमा सांडिली ॥ २१ ॥ ऐसें तें स्वर्गभुवन । सकळ देवांचें वस्तें स्थान ।
तया स्थळाचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ॥ २२ ॥ येथें ज्या देवाचें भजन
करावें । तेथें ते देवलोकीं राहावें । स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें
॥ २३ ॥ लोकीं राहावें ते सलोकता । समीप असावें ते समीपता । स्वरूपचि
व्हावें ते सरूपता । तिसरी मुक्ती ॥ २४ ॥ देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स
कौस्तुभ लक्ष्मी नाहीं । सरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५ ॥ सुकृत
आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती । आपण देव ते असती ।
जैसे तैसे ॥ २६ ॥ म्हणोनि तिनी मुक्ति नासिवंत । सायुज्यमुक्ती ते शाश्वत ।
तेहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ॥ २७ ॥ ब्रह्मांड नासेल कल्पांतीं ।
पर्वतासहित जळेल क्षिति । तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ती कैंच्या

आदित्य, अकरा रुद्र, प्रजापति व वषट्कार असे आहेत), आणि सप्त स्वर्ग व सप्त पाताळें हे सर्व त्या सुवर्णपर्वताला (मेरूला) वेष्टून आहेत. कामधेनूंचे कळप, कल्पतरूंचीं मोठ-मोठालीं दांगे ऊर्फ बनें, अमृताचीं सरोवरें हीं तेथें चोहोंकडे पसरलेलीं असून चिंतामणींच्या राशी व हिरेपरिसांच्या खाणी विपुल आहेत. सारी जमीनच मुळीं सुवर्णाची व दैदीप्यमान आहे नवरत्नांचे पाषाण व शिळा असंख्य असून त्यांच्या रम्य प्रभा सर्वत्र पडल्या आहेत. तेथें सर्वांचा सर्व वेळ आनंदांतच जात असतो. अमृताचीं भोजनें, दिव्यपरिमळानें दरवळलेलीं गंधसुमनें, अष्टनायकांचीं मधुर गायनें, ह्यांची तेथें रेलचेल आहे. तेथें तारुण्य हटत नाहीं. रोगव्याधींचें तर नांवच नको, म्हातारपण व मरण कोणालाच नाहीं ! तेथें एकापेक्षां एक शूर, चतुर, धीर, उदार व सुंदर. त्यांचीं तीं ज्योतिरूप बिजलीसारखीं देदीप्यमान सुंदर रूपें — सर्वांचें यशकीर्तिप्रताप अफाट — असें त्या स्वर्गलोकाचें ऐश्वर्य आहे. सर्व देवांची वस्ती तेथें आहे. त्या स्थानाची महती वर्णावी तितकी अपुरीच होणार आहे (११–२२). ज्या देवाचें भजन त्या देवाच्या स्थानीं राहणें ह्याला सलोकतामुक्ति म्हणतात. समीप असणें ही समीपता व आपल्या प्रियदेवाच्या रूपासारखें रूप मिळणें ही सरूपता. सलोकता व सरूपता ह्यांत द्वैत उघडच आहे. सरूपता ही द्वैतांतली आहे. उदाहरण - विष्णुभक्त विष्णुरूप झाला तरी श्रीवत्स, कौस्तुभ व लक्ष्मी हीं विष्णूचीं चिन्हें दुसऱ्या कोणालाच मिळावयाचीं नाहींत. पुण्य आहे तोंवर देवलोकीं राहूं देतात, पुण्यक्षय झाला कीं लगेच गचांडी मिळून मर्त्यलोकीं यावें लागतें. म्हणून ह्या तीनही मुक्ति विनाशी आहेत; फक्त सायुज्यता मुक्ति अविनाशी व शाश्वत आहे. महाप्रळयीं ब्रह्मांड

तेथें ॥ २८ ॥ तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ती तेही अचळ । सायुज्यमुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९ ॥ निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायुज्यता । सायुज्यता म्हणिजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ॥ ३० ॥ सगुण भक्ति ते चळे । निर्गुण भक्ती ते न चळे । हें आवघें प्रांजळ कळे । सद्गुरु केलियां ॥ ३१ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुक्तिचतुष्टये नाम चतुर्थ दशके समास दशम ॥ १० ॥

बुडेल तेव्हां पृथ्वी, तीवरचा मेरुपर्वत, ते देव, त्यांचे लोक व त्यांच्या मुक्ति सर्वच नाहींशा होतील. हें सर्व चंचल जाईल. निश्चळ परब्रह्म तेवढें शाश्वत आहे. त्यांशीं अनन्यता म्ह० सायुज्यता ही शाश्वत आहे. सगुण व त्याची भक्ति चंचल. निर्गुण व निर्गुणभक्ति निश्चळ. हें सर्व सद्गुरूला शरण गेल्यानें उमजतें (२३–३१). [द० ४, स० १०]

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ सार्थ श्रीदासबोध ॥

॥ दशक पांचवा मंत्रांचा ॥ ५ ॥

॥ श्रीराम ॥ जय जयजी सद्गुरु पूर्णकामा । परमपुरुषा आत्मयारामा । अनिर्वाच्य तुमचा महिमा । वर्णिला नवचे ॥ १ ॥ जें वेदांसी सांकडें । जें शब्दासी कानडें । तें सच्छिष्यासी रोकडें । अलभ्य लाभ ॥ २ ॥ जें योगियांचें निजवर्म । जें शंकराचें निजधाम । जें विश्रांतीचें निजविश्राम । परम गुह्य अगाध ॥ ३ ॥ तें ब्रह्म तुमचेनि योगें । स्वयें आपणचि होइजे आंगें । दुर्घट संसाराचेनि पांगें । पांगिजेना सर्वथा ॥ ४ ॥ आतां स्वामिचेनि लडिवाळपणें । गुरुशिष्यांचीं लक्षणें । सांगिजेती तेणेंप्रमाणें । मुमुक्षें शरण जावें ॥ ५ ॥ गुरु तों सकळांसी ब्राह्मण । जरी तो जाला क्रियाहीन । तरी तयासीच शरण । अनन्यभावें असावें ॥ ६ ॥ अहो या ब्राह्मणाकारणें । अवतार घेतला नारायणें । विष्णूनें श्रीवत्स मिरविणें । तेथें इतर ते किती ॥ ७ ॥ ब्राह्मणवचनें प्रमाण । होती शूद्रांचे ब्राह्मण । धातुपाषाणीं देवपण । ब्राह्मणांचेनि मंत्रें ॥ ८ ॥ मुंजीबंधनाविरहित । तो शूद्रचि निभ्रांत । द्विजन्मी म्हणोन सतंत । द्विज ऐसे नाम त्यांचें ॥ ९ ॥ सकळांसी पूज्य ब्राह्मण । हे मुख्य वेदाज्ञा प्रमाण । वेदविरहित तें अप्रमाण । अप्रिय भगवंता ॥ १० ॥ ब्राह्मणीं योग-याग-व्रतें-दानें । ब्राह्मणीं सकळ तीर्थाटणें । कर्ममार्ग ब्राह्मणाविणें । होणार नाहीं ॥ ११ ॥ ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत ।

पूर्णकाम, परमपुरुष, आत्माराम अशा श्रीसद्गुरूंना वंदन असो. तुमची थोरवी अवर्णनीय आहे म्ह० शब्दांनीं सांगतां येत नाहीं. जें योगीजनांचें निजधाम, जें शंकराचें विश्रांतिस्थान, जें वेदशास्त्रांना अगम्य (कानडें) असें ब्रह्म तुमची कृपा झाली असतां शिष्य सहज आपणच अंगानें होऊन राहतो व संसारजंजाळांत अडकून पडत नाहीं (१–४). आतां स्वामींच्या प्रसादानें गुरु-शिष्यांचीं लक्षणें सांगतों, तीं पाहून मुमुक्षूनें शिष्याधिकार अंगीं आणावा व सद्गुरूस शरण जावें (५). गुरु तर सर्व ज्ञातींस ब्राह्मणच असला पाहिजे, मग तो क्रियाहीन असला तरी त्यालाच शरण जावें. ब्राह्मणांसाठीं महाविष्णूनें अवतार घेतला व भृगुलत्ता भूषण म्हणून उरीं वाहिली. विष्णूपुढें इतरांचा पाड काय ? ब्राह्मणमुखानें निघणाऱ्या मंत्रांमुळें शूद्रांचे ब्राह्मण होतात व धातु-पाषाणांच्या मूर्तीला देवपण येतें. मौंजीबंधन होईपर्यंत जो शूद्र असतो तो लगेच द्विज म्हणून प्रतिष्ठा पावतो. सकळांस ब्राह्मण पूज्य आहे ही वेदाज्ञाही प्रमाण मानिली पाहिजे, कां कीं वेदविरहित जें-जें कांहीं तें-तें अप्रमाण व देवास अप्रिय आहे. योग-याग, व्रत-दानें, तीर्थयात्रा, कर्ममार्गाचीं विधानें—हीं

पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्येंकरूनि ॥ १२ ॥ ब्राह्मणपूजनें शुद्ध वृत्ती । होऊन जडे भगवंतीं । ब्राह्मणतीर्थें उत्तम गती । पावती प्राणी ॥ १३ ॥ लक्षभोजनीं पूज्य ब्राह्मण । आन यातीसि पुसे कोण । परी भगवंतासी भाव प्रमाण । येरा चाड नाहीं ॥ १४ ॥ असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडें किती । जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ॥ १५ ॥ अंत्यज शब्दज्ञाता बरवा । परी तो नेऊन काय करावा । ब्राह्मणसन्निध पूजावा । हें तों न घडे कीं ॥ १६ ॥ जें जनावेगळें केलें । तें वेदें अव्हेरिलें । म्हणोनी तयासि नाम ठेविलें । पाषांडमत ॥ १७ ॥ असो जे हरिहरदास । तयांस ब्राह्मणीं विश्वास । ब्राह्मणभजनें बहुतांस । पावन केलें ॥ १८ ॥ ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्गुरु करावा । ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्गुरुवीण नाहीं ॥ १९ ॥ स्वधर्मकर्मीं पूज्य ब्राह्मण । परी ज्ञान नव्हे सद्गुरुविण । ब्रह्मज्ञान नस्तां सीण । जन्ममृत्य चुकेना ॥ २० ॥ सद्गुरुवीण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं । अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहतचि गेले ॥ २१ ॥ ज्ञानविरहित जें जें केलें । तें तें जन्मासि मूळ जालें । म्हणोनि सद्गुरूचीं पाउलें । सदृढ धरावीं ॥ २२ ॥ जयास वाटे देव पाहावा । तेणें सत्संग धरावा । सत्संगेंविण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २३ ॥ नाना साधनें बापुडीं । सद्गुरुविण करिती वेडीं । गुरुकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ॥२४॥ कार्तिकस्नानें माघस्नानें । व्रतें उद्यापनें दानें । गोरांजनें धूम्रपानें । साधिती पंचाग्नी ॥ २५ ॥ हरिकथा पुराणश्रवण । आदरें करिती निरूपण । सर्व तीर्थें परम कठिण । फिरती प्राणी ॥ २६ ॥ झळफळीत देवतार्चनें । स्नानसंध्या

कांहींच ब्राह्मणांशिवाय होत नाहींत. ब्राह्मण वेदोनारायण आहेत. त्यांच्या आशीर्वादानें मनोरथ पूर्ण होतात, त्यांच्या पूजनानें चित्त निर्मळ होऊन देवाकडे वळतें, ब्राह्मणस्वरूप तीर्थांत प्राण्यांस सद्गति मिळते. लक्षभोजन घालावयाचें असतां ब्राह्मणच मानिले जातात, अन्य जातींना तेथें कोण विचारतो ? तथापि देवाला भाव प्रिय आहे, दुसरें कांहीं तो पाहत नाहीं. असो. ब्राह्मणांना देव मानतात मग मानवांची कथा काय ? ब्राह्मण मूढमति असला तरी तो जगद्वंद्यच होय. अत्यंज शब्दनिष्णात असला म्हणून कांहीं ब्राह्मणांबरोबर कोणी त्याला पूजीत नाहीं. बरें कोणीं तसें केलें तरी लौकिकास सोडून झालेलें हें कर्म वेदबाह्य आहे अर्थात् हें पाखांड मत आहे. असो. जे हरिहरदास (भक्त) आहेत त्यांची ब्राह्मणांवर निष्ठा असतेच, ब्राह्मणपूजनानें अनेक जीव पावन झाले आहेत (६--१८). आतां ब्राह्मणपूजनानेंच देवाची जोड होते तर मग सद्गुरु कशाला करावा असें कोणी म्हणेल तर त्याला उत्तर असें कीं ब्रह्मज्ञान हें मात्र सद्गुरूशिवाय प्राप्त होणारच नाहीं. धर्मकर्मांत ब्राह्मणांची पूज्यता सांगितली, पण ब्रह्मज्ञानास सद्गुरुच पाहिजे. सद्गुरुवांचून ज्ञान होत नाहीं व ज्ञानावांचून जन्म-मरण चुकत नाहीं. ब्रह्मज्ञानावांचून होणारीं सर्व कर्में जन्माला कारण होतात म्हणून सुटकेसाठीं सद्गुरूलाच शरण जावें. संत-सद्गुरुकृपेवांचून देव जोडत नाहीं (१९--२३). गुरुकृपेवांचून इतर साधनें बापुडीं (क्षुद्र) व कष्टदायक आहेत. कार्तिक-माघांतलीं प्रातःस्नानें, व्रतें व व्रतांचीं उद्यापनें, दान-धर्म, गोरांजनें (देह अग्नींत टाकणें), धूम्रपानें (झाडाला उलटें टांगून घेऊन व खालीं केलेला धूर पिऊन तप करणें), पंचाग्निसाधनें (भर उन्हाळ्यांत मस्तकीं सूर्याचा प्रखर ताप व चहूंकडे चार

दर्भासनें । टीळेमाळा गोपीचंदनें । ठसे श्रीमुद्रांचे ॥ २७ ॥ अर्घ्यपात्रें संपुष्ट गोकर्णें । मंत्रयंत्रांचीं तांम्रपर्णें । नाना प्रकारींचीं उपकर्णें । साहित्याशोभा ॥ २८ ॥ घंटा घणघणा वाजती । स्तोत्रें स्तवनें आणी स्तुती । आसनें मुद्रा ध्यानें करिती । प्रदक्षिणा नमस्कार ॥ २९ ॥ पंचायतनपूजा केली । मृत्तिकेचीं लिंगें लाखोली । बेलें नारिकेळें भरिलीं । संपूर्ण सांग पूजा ॥ ३० ॥ उपोषणें निष्ठानेम । परमसायासीं केलें कर्म । फळचि पावती वर्म । चुकले प्राणी ॥ ३१ ॥ यज्ञादिकें कर्में केलीं । हृदईं फळाशा कल्पिली । आपले इच्छेनें घेतली । सूति जन्माची ॥ ३२ ॥ करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास । रिद्धिसिद्धि सावकास । वोळल्या जरी ॥ ३३ ॥ तरी सद्गुरुकृपेविरहित । सर्वथा न घडे स्वहित । यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ३४ ॥ जंव नाहीं ज्ञानप्राप्ती । तंव चुकेना यातायाती । गुरुकृपेवीण अधोगती । गर्भवास चुकेना ॥ ३५ ॥ ध्यानधारणा मुद्राआसन । भक्तिभाव आणी भजन । सकळही फोल ब्रह्मज्ञान । जंव तें प्राप्त नाहीं ॥३६॥ सद्गुरुकृपा न जोडे । आणी भलतीचकडे वावडे । जैसें आंधळें चाचरोन पडे । गारीं आणी गडदरीं ॥ ३७ ॥ जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान । तैसें सद्गुरुवचनें ज्ञान-। प्रकाश होय ॥ ३८ ॥ सद्गुरुविण जन्म निर्फळ । सद्गुरुविण दुःख सकळ । सद्गुरुविण तळमळ । जाणार नाहीं ॥ ३९ ॥ सद्गुरुचेनि अभयकरें । प्रगट होइजे ईश्वरें । संसारदुःखें अपारें । नासोन जाती ॥ ४० ॥ मागें जाले थोर थोर । संत महंत मुनेश्वर । तयांसहि ज्ञान-विज्ञानविचार । सद्गुरुचेनी ॥ ४१ ॥ श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अति तत्पर गुरुभजनीं । सिद्ध साधु आणि संतजनीं । गुरुदास्य केलें ॥ ४२ ॥ सकळ

कुंडांत भडकलेला अग्नि ह्याप्रमाणें पांच अग्नींच्या तापांत राहून तप करणें), कथापुराणश्रवण, तीर्थयात्राभ्रमण, सर्व प्रकारचीं पूजासाहित्यें जमवून संपूर्ण पूजाविधि करणें, उपोषणें व नित्यनेमाचे देहकष्ट, यज्ञयागादिकर्में इ० अनेक प्रकारचीं साधनें केलीं तरी तीं फळ देतात. पण जन्माची सूति (विसार, बयाणा) ही त्याबरोबर घ्यावी लागते. नाना सायास कष्ट करून वरील साधनें केलीं, चौदा विद्या अभ्यासिल्या व रिद्धि-सिद्धिही वश झाल्या तरी सद्गुरुकृपेवांचून मोक्षलाभ होत नाहीं व जन्म-मरण टळत नाहीं. यातायात टळते ज्ञानानेंच व ज्ञानदाता सद्गुरुविण कोणी नाहीं. ध्यान-धारणा, मुद्रा, आसन साधलें व शाब्दिक ज्ञान झालें तरी सारें सद्गुरुकृपेविण व्यर्थ आहे (२४–३६). सरळ मार्ग चुकल्यानें अंध जसा खांच-खळग्यांत अडखळून पडावा, त्याप्रमाणें सद्गुरुकृपा न जोडतां वरील जीव वृथासाधनांच्या कचाटींत सांपडतात (३७). डोळ्यांत अंजन घातल्यावर जसा भूमिगर्भगत ठेवा दिसतो, तसें सद्गुरुवचनाबरोबर शिष्याच्या अंतरीं ज्ञानप्रकाश पडतो. सद्गुरुप्रसाद न झाल्यास जन्म फुकट जातो, तळमळ नाहींशी होत नाहीं. सद्गुरूचा वरदहस्त मस्तकीं पडतांच ईश्वर आविर्भूत होतो व सकलदुःखनाश होतो. मागें थोर-थोर संत-महंत अनेक झाले, त्यांनाही ज्ञानविज्ञानविचार सद्गुरुकडूनच कळलेला आहे. श्रीराम-कृष्णादि अवतारही गुरुभजनीं तत्पर होते. सर्व सृष्टीचे चालक हरि-हर-ब्रह्मादिक हेही सद्गुरुपदींचे रंक असून

सृष्टीचे चाळक । हरिहरब्रह्मादिक । तेही सद्गुरुपदीं रंक । महत्वा न चढेती ॥ ४३ ॥ असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरुविण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ॥ ४४ ॥ आतां सद्गुरु ते कैसे । नव्हेती इतरां गुरुऐसे । जयांचे कृपेनें प्रकाशे । शुद्ध ज्ञान ॥ ४५ ॥ त्या सद्गुरूची वोळखण । पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असे श्रोतीं श्रवण । अनुक्रमें करावें ॥ ४६ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुरुनिश्चयनाम समास प्रथम ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥ जे करामती दाखविती । तेहि गुरु म्हणिजेती । परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥ १ ॥ सभामोहनें भुरें चेटकें । साबरमंत्रकौटालें अनेकें । नाना चमत्कार कौतुकें । असंभाव्य सांगती ॥ २ ॥ सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग । दृष्टिबंधनें लागवेग । अभिलाषाचा ॥ ३ ॥ साहित्य संगीत रागज्ञान । गीतनृत्य तानमान । नानावाद्यें सिकविती जन । तेहि येक गुरु ॥ ४ ॥ विद्या सिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी । कां पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती ॥ ५ ॥ जे यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर । तेही गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती ॥ ६ ॥ आपली माता आणि पिता । तेहि गुरुचि तत्वता । परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ॥ ७ ॥ गाईत्रीमंत्राचा उचारु । सांगे तो साचार कुळगुरु । परी ज्ञानेंविण पैलपारु । पाविजेत नाहीं ॥ ८ ॥ जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधार निरसी । जीवात्मया शिवात्मयासी । ऐक्यता करी ॥ ९ ॥ बिघडले देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत । तया देवभक्ता येकांत । करी तो सद्गुरु ॥ १० ॥ भवव्याघ्रें घालूनि उडी । गोवत्सास तडातोडी । केली देखोनि सीघ्र सोडी ।

गुरुदास्याशिवाय हे महत्पदास चढलेच नाहींत. असो. ज्याला मोक्ष पाहिजे त्यानें सद्गुरूस शरण गेलेंच पाहिजे, सद्गुरूवांचून कल्पांतींही मोक्ष मिळावयाचा नाहीं (३८–४४). आतां सद्गुरु हे इतर सामान्य गुरूंसारखे नव्हत, त्यांच्या कृपेनें ब्रह्मज्ञानाचा लाभ होतो. आतां सद्गुरूची ओळख करून देऊं (४५–४६). [द० ५, स० १]

करामती दाखवून रंजन करणारे, सभेची नजरबंदी करणारे, चेटीं-चेटकें करणारे, नाना चमत्कारांच्या गप्पा सांगणारे, औषधीप्रयोग किंवा सोन्याची धातु बनविण्याचा उपाय सांगणारे, नुसत्या नजरेनें इष्टवस्तु प्राप्त करून घेण्याचा शीघ्र उपाय सांगणारे, साहित्य (अलंकारशास्त्र) व संगीत व रागज्ञान देणारे, नृत्य-वाद्यादि कला शिकविणारे, पंचाक्षरी विद्या किंवा ताडे-तोडे सांगणारे — तात्पर्य, पोट भरावयाचे नाना व्यापार शिकविणारे गुरु बहुत आहेत; पण मोक्षदाता सद्गुरु ह्या सर्वांहून अगदीं वेगळा आहे. फार काय ? आपले आई-बाप हेही आपले गुरूच आहेत, पण भवसागराच्या पार नेणारा सद्गुरु वेगळाच आहे. मुंजीच्या वेळीं गायत्रीमंत्र देणारे कुळगुरुही गुरुच खरे पण भवपार नेणारे ज्ञानदाते सद्गुरु निराळे आहेत (१–८). आतां सद्गुरु ओळखावयाची खूण सांगतों. जो ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून अज्ञान दूर करितो, व जीव-परात्म्याची ऐक्यता करितो, देव-भक्त किंवा जीव-शिव ह्यांचा भेद मोडून एकांत करितो तो सद्गुरु होय. भवव्याघ्रानें मध्येंच उडी घालून

तो सद्गुरु जाणावा ॥ ११ ॥ प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुखवले । ऐसे जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ॥ १२ ॥ वासनानदीमहापुरीं । प्राणी बुडतां ग्लांती करी । तेथें उडी घालूनि तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥ गर्भवास अतिसांकडी । इच्छाबंधनाची बेडी । ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्गुरु स्वामी ॥ १४ ॥ फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार । तोचि गुरु माहेर अनाथांचें ॥ १५ ॥ जीव येकदेशी बापुडें । तयास ब्रह्मचि करी रोकडें । फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ॥ १६ ॥ जें वेदांचे अभ्यंतरीं । तें काढून अपत्यापरी । शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्गारवचनें ॥ १७ ॥ वेदशास्त्र महानुभाव । पाहातां येकचि अनुभव । तोचि येक गुरुराव । ऐक्यरूपें ॥ १८ ॥ संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी । वेदविरहित टवाळी । करूं नेणे ॥ १९ ॥ जें जें मन अंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी । तो गुरु नव्हे भिकारी । झडे आला ॥२०॥ शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन । ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ॥ २१ ॥ जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥ येक द्रव्याचे विकिले । येक शिष्याचे आखिले । अति दुराशेनें केले । दीनरूप ॥ २३ ॥ जें जें रुचे शिष्या मनीं । तैसीच करी मनधरणी । ऐसी कामना पापिणी । पडली गळां ॥ २४ ॥ जो गुरु भीडसारु । तो अधमाहून अधम थोरु । चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ॥ २५ ॥ जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहरी । आणी सेखीं भीड करी । घातघेणा ॥ २६ ॥ तैसा गुरु

जीववत्साला भिववून शिवस्वरूप गायीपासून दूर केलें असतां त्यांची गांठ घालून देणारा सद्गुरु होय. मायाजाळांत सांपडून संसारदुःखानें तप्त झालेल्या जीवांस मुक्त करणारा सद्गुरुच होय. वासनानदीच्या महापुरांत गटंकळ्या खात असलेल्या व त्यामुळें दीन झालेल्या जीवांस सद्गुरुच सोडवितात. गर्भवासाच्या दुःखापासून नानाविध वासनांच्या मागें लागून घाबरलेल्या जीवांस ज्ञान देऊन सद्गुरु बंधमुक्त करितात. शब्दार्थाची स्पष्ट फोड करून आंतील सारभूत परमात्मवस्तु दाखविणारे अनाथांचे माय-बाप सद्गुरुच होत. एकदेशीपणाच्या कल्पनेनें दीन झालेल्या जीवास तात्काळ 'तत्त्वमसि' ह्या महावाक्याचें रहस्य पटवून ब्रह्मरूपता देणारे श्रीगुरुच होत. वेदांच्या अंतरंगांत गूढ असलेल्या परमामृताचें शिष्याला वचनमात्रानें पान करविणारे सद्गुरूवांचून दुसरे कोण आहेत ? वेदशास्त्रें व संत ह्यांचा अनुभव एकच आहे व त्या अनुभवाशीं एकरूपता पावणें हेंच सद्गुरुस्वरूप होय (९–१८). सकल संदेह निःशेष झाडून स्वतः स्वधर्माचरण करितात व वेद-बाह्याला स्पर्श करीत नाहींत, असें श्रीगुरूंचें आचरण असतें. शास्त्र बाजूस ठेवून मनाला येईल तसें मोकाट वागणारा तो गुरु नव्हे, तो विषयलालची भिकारी होय. शिष्याला साधनमार्गाला लावीत नाहींत, त्याजकडून इंद्रियदमन करवीत नाहींत असे गुरु अडक्याला तीन मिळाले तरी टाकावे ! ज्ञानबोधानें अविद्योच्छेद करितो व इंद्रियजय करवितो तोच सद्गुरु होय. शिष्यापासून द्रव्य घेऊन त्याचे अंकित झालेले व त्याच्या मनधरणीस्तव त्याला आवडतें तेंच सांगणारे आशेचे गुलाम असे भीडसारु गुरु अत्यंत अधम, चोरटे, ठक होत असें समजावें. दुराचारी व भीडखाऊ व घातकी वैद्य रोग्याचा सर्वस्वीं नाश

नसावा । जेणें अंतर पडे देवा । भीड करूनियां गोवा । घाली बंधनाचा ॥ २७ ॥ जेथें शुद्ध ब्रह्मज्ञान । आणी स्थूळ क्रियेचें साधन । तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ॥ २८ ॥ देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकिती कर्णद्वारें । इतुकेंच ज्ञान तें पामरें । अंतरलीं भगवंता ॥ २९ ॥ बाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण । तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें मुमुक्षें ॥ ३० ॥ अद्वैतनिरूपणीं अगाध वक्ता । परी विषई लोलंगता । ऐसिया गुरुचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ ३१ ॥ जैसा निरूपणसमयो । तैसेंचि मनही करी वायो । कृतबुद्धीचा जयो । जालाच नाहीं ॥ ३२ ॥ निरूपणीं सामर्थ्यसिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी । नाना चमत्कारें बुद्धी । दंडळूं लागे ॥ ३३ ॥ पूर्वीं ज्ञाते विरक्त भक्त । तयांसि सादृश्य भगवंत । आणी सामर्थ्यही अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥ ३४ ॥ ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञानचि नुस्तें वेर्थ । ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ॥ ३५ ॥ निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे । दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥ ३६ ॥ बहुत ज्ञातीं नागवलीं । कामनेनें वेडीं केलीं । कामना इच्छितांच मेलीं । बापुडीं मूर्खें ॥ ३७ ॥ निःशेष कामनारहित । ऐसा तो विरुळा संत । अवघ्यांवेगळें मत । अक्षई ज्याचें ॥ ३८ ॥ अक्षई ठेवा सकळांचा । परी पांगडा फिटेना शरीराचा । तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ॥ ३९ ॥ सिद्धि आणी सामर्थ्य जालें । तेणें देहास महत्व आलें । पुढें बेंचाड

करितो तसा देव दुरावणारा व भिडेनें शिष्यास गोत्यांत घालणारा गुरु उपयोगाचा नाहीं (१९—२७). ज्यापाशीं विमल ब्रह्मज्ञान आहे व बाह्य आचरणाचा साधनमार्गेही स्वच्छ आहे तोच सद्गुरु स्वसुखनिधान जें ब्रह्मस्वरूप त्याशीं ऐक्य करण्यास समर्थ आहे (२८). बाहेरचे भपके (देखणें) दाखवून कानांत मंत्र फुंकण्यापलीकडे ज्ञान नसणारे पामर स्वतःच देवाला दुरावलेले असतात. गुरुप्रचीति, शास्त्रप्रचीति व आत्मप्रचीति ह्या तीनही प्रचीति सद्गुरूपाशीं ऐक्यता पावतात, व अशालाच मुमुक्षूनें शरण जावें. अद्वैतनिरूपण उत्तम करितो पण चित्त विषयासक्त आहे अशा गुरूपासून सार्थकतेचा मार्ग सांपडणार नाहीं. प्रसंग येईल तसें मन लाचार करून आवडेलसें निरूपण करणारा व स्वतः निश्चयरूप न झालेला गुरु कामाचा नाहीं. निरूपणसामर्थ्य व वक्तृत्वशक्ति अप्रतिम आहे पण साधु-संतांचे चमत्कार करण्याची सामर्थ्यसिद्धि मला कधीं प्राप्त होईल अशा आशेनें भरलेला व त्यामुळें मन अस्वस्थ झालेला गुरु उपयोगाचा नाहीं. पूर्वीं मोठ-मोठे ज्ञाते भक्त ईश्वराच्या बरोबरीचे होऊन गेले, त्यांच्या ठिकाणीं सिद्धिचमत्कार करण्याचें सामर्थ्य होतें तसें माझ्या ठिकाणीं कधीं येईल, माझें हें ज्ञान व्यर्थ आहे (कारण ह्याची पाहिजे तशी दुसऱ्यावर छाप बसत नाहीं) असा सिद्धिसामर्थ्याचा अभिलाष चित्तीं धरणारास भगवत्प्राप्ति होत नाहीं. भगवंत तर त्यालाच भेटतात कीं ज्याच्या चित्तांत दुराशेचा लवलेश नाहीं. दुराशा धरणारे शब्दज्ञाते कामिक गुरु काय कामाचे ? पुष्कळ ज्ञाते कामनेनें वेडे झालेले बुडाले आहेत, कामनांचें चिंतन करितां-करितांच मेले आहेत. निःशेष कामनारहित असे निष्काम संत विरळ आहेत, विषयी पामर जनांहून त्यांचें अगदीं वेगळें मत असतें (त्यांना देवावेगळी कसलीच लवमात्रही कामना नसते). आत्मरूप निजधन सर्वांचेंच आहे पण देहबुद्धि (देहाचा पांगडा — पराधीनता, ममत्व) न गेल्यामुळें देवाचा मार्ग चुकून इतर लोक भलतीकडेच जातात (हे विरळ संत मात्र

बळकावलें । देहबुद्धीचें ॥ ४० ॥ सांडूनि अक्षई सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख । कामनेसारिखें दुःख । आणीक कांहींच नाहीं ॥ ४१ ॥ ईश्वरेंविण जे कामना । तेणेंचि गुणें नानायातना । पावते होती पतना । वरपडे प्राणी ॥ ४२ ॥ होतां शरीरास अंत । सामर्थ्यही निघोन जात । सेखीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥ ४३ ॥ म्हणोनि निःकामता-विचारु । दृढबुद्धीचा निर्धारु । तोचि सद्गुरु पैलपारु । पाववी भवाचा ॥ ४४ ॥ मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान । निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ॥ ४५ ॥ याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ । विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ॥ ४६ ॥ याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथा निरूपण । जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७ ॥ जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार । नवविधाभक्तीचा आधार । बहुत जनांसी ॥ ४८ ॥ म्हणोनि नवविधा भजन । जेथें प्रतिष्ठिलें साधन । हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं वोळखावें ॥ ४९ ॥ अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन । तेथें बहु भक्तजन । विश्रांति पावती ॥ ५० ॥ नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार । कर्मेंविण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ५१ ॥ म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन । कथानिरूपण श्रवणमनन । नीतिन्याय मर्यादा ॥ ५२ ॥ यामध्यें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे । म्हणोनी सर्वही विलसे । सद्गुरुपासीं ॥ ५३ ॥ तो बहुतांचा पाळणकर्ता । त्यास बहुतांची असे

अक्षय्य निजधन संभाळून असतात म्हणून गुरुत्वाचे अधिकारी हेच होत). सिद्धिसामर्थ्यानें फार तर देहाला महत्त्व येतें, पण त्यामुळें देहबुद्धीचें जाळें (जुंबाड) अधिक बळकट होत जातें. शाश्वत निजसुख सोडून सामर्थ्याच्या मागें लागणारे मूर्ख होत. कामना दुःखाचें कोठार आहे. कामनेसारखें दुःख दुसरें कोणतेंच नाहीं. कामना ईश्वराचीच धरावी, अन्य-विषयक कामना यातना मात्र देतात व प्राणी पतनाला प्राप्त (वरपडे) होतात. सामर्थ्य मोठ्या अट्टाहासानें मिळविलें तरी देहाचा अंत होतांच सामर्थ्यही निघून जातें व कामनेमुळें हा देवाला मात्र अंतरतो (२९–४२). तात्पर्य, निष्कामता पूर्ण बाणलेला व आत्मबुद्धि दृढ असलेलाच पुरुष सद्गुरु होय व तोच भवांतून तारक होतो. सद्गुरूचें मुख्य लक्षण हें आहे कीं त्याच्यापाशीं विमळ ब्रह्मज्ञान असतें, आत्मनिश्चयजन्य समाधान असतें व तो अखंड स्वरूपाकार असतो, ह्याशिवाय त्याचें वैराग्य तीक्ष्ण असतें, त्याची वृत्ति उदासीन (कामनारहित) असते, त्याचा स्वधर्माचार निर्मळ असतो. ह्याशिवाय सद्गुरुसन्निध अध्यात्मश्रवण, हरिकथानिरूपण (सगुणलीलांचें श्रवण व अध्यात्माचें विवरण) म्ह० परमार्थाचें विवरणच होत असतें. तेथें सारासारविचार चालतो म्हणून जनांच्या उद्धाराचा मार्ग सांपडतो. नवविधा भक्तीनें बहुत जन उद्धरतात व सद्गुरु-जवळ हा साधनमार्ग लाभतो. आंत विमल ब्रह्मज्ञान व बाहेर निष्ठेचें भजन म्ह. क्रियासाधन ह्या दोन्ही गोष्टी जेथें असतात तेथें भक्त-भाविकास विश्रांति मिळते. उपासनेचा आधार नाहीं असला परमार्थ निराधार होय. सत्कर्माचरण नसेल तर अनाचार माजून प्राणी भ्रष्ट होतात. म्हणून ब्रह्मज्ञान, वैराग्य, भजन, स्वधर्माचार, साधन, कथा-निरूपण, श्रवण-मनन, नीति-न्याय-मर्यादेचें वर्तन — ह्यांमध्यें एक कमी असेल तर तितका न्यूनपणाच होय, पण सद्गुरूपाशीं हें सर्व असतें. सद्गुरु बहुतांचा उद्धारकर्ता असल्यामुळें त्याला सर्वांची काळजी असते व शिष्यांच्या अधिकाराप्रमाणें त्यांना मार्ग दाखविण्याचीं सर्व साधनें समर्थ सद्गुरूपाशीं असतात (४३–५४). साधनांवांचून उभारलेला परमार्थ तितकाच लवकर मोडून जातो. म्हणून संत-सद्गुरु

चिंता । नानासाधनें समर्था । सद्गुरुपासीं ॥ ५४ ॥ साधनेंविण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुता सवेंच भ्रष्टे । याकारणें दुरीद्रष्टे । महानुभाव ॥ ५५ ॥ आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती । कोण पुसे ॥ ५६ ॥ कर्म उपासनेचा अभाव । तेथें भकाधेसि जाला ठाव । तो कानकोंडा समुदाव । प्रपंची हांसती ॥ ५७ ॥ नीच यातीचा गुरु । तोही कानकोंडा विचारु । ब्रह्मसभेसी जैसा चोरु । तैसा दडे ॥ ५८ ॥ ब्रह्मसभे देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां । अथवा प्रसाद सेवितां । प्रायश्चित्त पडे ॥ ५९ ॥ तीर्थप्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली । गुरुभक्ति ते सटवली । येकायेकी ॥ ६० ॥ गुरूची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्वतां । तेथें ब्राह्मण्य रक्षूं जातां । गुरुक्षोभ घडे ॥ ६१ ॥ ऐसीं साकडीं दोहींकडे । तेथें प्रस्तावा घडे । नीच-यातीस गुरुत्व न घडे । याकारणें ॥ ६२ ॥ तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें । बहुतजनांसी भ्रष्टवावें । हें तों दूषणचि कीं ॥ ६३ ॥ आतां असो हा विचारु । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ॥ ६४ ॥ जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूचें लक्षण । तथापी सांगों वोळखण । होय जेणें ॥ ६५ ॥ येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तंत्रगुरु । येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ॥ ६६ ॥ येक कुळगुरु येक मानिला गुरु । येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु । येक असद्गुरु येक यातिगुरु । दंडकर्ते ॥ ६७ ॥ येक मातागुरु येक पितागुरु ।

दूरदर्शीप्रमाणें सर्व साधनें जवळ ठेवतात. आचार व उपासना सोडून परमार्थाची प्रतिष्ठा करणारे भ्रष्ट व अभक्त असतात. त्यांच्या महंतीला पुसतो कोण ? ती महंती तुच्छ होय. कर्म-उपासना सुटली कीं मग काय वाटेल तें बहकण्यास मार्ग खुला झाला, व अशा संप्रदायास प्रपंची जनही तुच्छतेनें हंसतात व मग हे संप्रदायी कानकोंडे होऊन राहतात. नीच जातीचा गुरु करणें हेंही त्यांतलेंच होय, कां कीं अशा गुरूला ब्रह्मसभेस उजळ माथ्यानें जातां येत नाहीं. हा चोरासारखा अंग चोरीतच जातो. ब्राह्मणसमुदायासमोर त्याचें शिष्यांना तीर्थ घेतां येत नाहीं व प्रसाद (मागून भोजन करणें) घेतला तर प्रायश्चित्त घ्यावें लागतें. तीर्थप्रसाद न घेतल्यास गुरूची नीचता शिष्यांनींच प्रगट केली असें होऊन गुरुभक्तीचा क्षय होतो व घेतल्यास ब्राह्मणक्षोभ होतो. गुरुभक्तीचें महत्त्व राखावें तर ब्राह्मणक्षोभ होतो, ब्राह्मण्य रक्षावें तर गुरुक्षोभ होतो. असें दुहेरी संकट उभें राहून पश्चात्तापाची पाळी येते. म्हणून नीच जातीस गुरुत्व देतां येत नाहीं. तथापि एखाद्याची अशा गुरू-च्याच ठिकाणीं श्रद्धा बसली तर त्यानें आपणच एकीकडे होऊन खुशाल भ्रष्टावें, पण बहुजनांस तो भ्रष्टवूं लागेल तर तो मात्र महादोष होईल. तात्पर्य, ब्राह्मणानें स्वजातीचाच गुरु केला पाहिजे, नाहीं तर भ्रष्टाकार निश्चयानें घडतोच (५५–६५). सर्व उत्तम गुणांचा आगर सद्गुरुच होय. नुसते गुरु अनेक असतात. सामान्यतः १७ प्रकारचे गुरु आहेत :— एक गुरु (पहिला अक्षर ओळख करून देणारा गुरु), एक मंत्रगुरु (गायत्रीमंत्र किंवा राम-कृष्णादि नाममंत्र सांगणारा), एक यंत्रगुरु (यंत्र-विद्या – सुतारकामादि शिकविणारा), एक तंत्रगुरु (तांत्रिक यज्ञांतील क्रियाकलापादि शिकविणारा), एक वस्तादगुरु (मल्लविद्या देणारा), एक राजगुरु (राजा प्रजांचा पिता ह्या दृष्टीनें राजगुरु हा सर्वांचा गुरुच होय), एक कुळगुरु (कुळाचे उपाध्याय), एक मानिला गुरु (आपल्या बुद्धीनें एकलव्यानें द्रोणाचार्यांस गुरु मानिलें तसा), एक विद्यागुरु (शब्दशास्त्र शिकविणारा), एक अविद्यागुरु (साबरी मंत्रादि शिकविणारा), एक असद्गुरु (पातक मार्गांत नेणारा), एक दंडकर्ता